Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १८० * * नागपूर *

रविवार, दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## मतदानावेळी माजी आमदाराचे कपडे फाडले

■ **वृत्तसंस्था, रोहतक, दि. ५:**
हरियाणातील रोहतक जिल्ह्यातील मेहम विधानसभा मतदारसंघातील हरियाणा जनसेवक पक्षाचे (एचजेपी) उमेदवार माजी आमदार बलराज कुंडू यांच्यावर काही लोकांनी हल्ला केला. हाणामारीत त्यांचे कपडे फाटले आणि खासगी सचिव जखमी झाले. वाद वाढत गेल्याने समर्थकांनी कुंडू यांना बाहेर काढले.

माजी मंत्री आनंद सिंह डांगी यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप करत कुंडू यांनी डीसी अजय कुमार आणि बहू अकबरपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मात्र, आनंद डांगी यांनी आरोप फेटाळून लावले असून बलराज कुंडू यांनी स्वतःचे कपडे फाडल्याचे सांगितले.




## थोडक्यात

### २ दहशतवादी ठार



■ **श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील गुगलधरमध्ये नियंत्रण रेषेवर (एलओसी) घुसखोरीचा प्रयत्न सुरक्षा दलांनी हाणून पाडला. लष्कर आणि पोलिसांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे.
भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने सांगितले की, लष्कर आणि पोलिसांनी एक संशयास्पद क्रियाकलाप पाहिला. यानंतर संयुक्त कारवाई सुरू करण्यात आली. यादरम्यान दहशतवाद्यांनी गोळीबार केला. सुरक्षा दलांनी केलेल्या प्रत्युत्तरात दोन दहशतवादी ठार झाले. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. सध्या कारवाई सुरू आहे.
गेल्या महिन्यातही लष्कर आणि पोलिसांनी संयुक्त कारवाईत काही दहशतवाद्यांना यमसदनी धाडले.

### इंडिगोच्या देशभरातील बुकिंग सिस्टममध्ये गडबड

■ **नवी दिल्ली :** इंडिगो एअरलाइनच्या संथ नेटवर्कमुळे बुकिंग प्रणाली आणि वेबसाइटवर परिणाम झाला आहे. त्यामुळे विमानतळावरील विमानसेवा आणि ग्राउंड सेवेवर परिणाम झाला आहे. चेक-इन प्रक्रियाही मंदावली आहे, ज्यामुळे विमानतळांवर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. इंडिगोने सांगितले की, त्यांची टीम या प्रकरणावर काम करत आहेत.

# माझे स्वप्न विकसित महाराष्ट्र..

**प्रधानमंत्री मोदींचे प्रतिपादन ▪ बंजारा नगारा वस्तुसंग्रहालयाचे लोकार्पण ▪ काँग्रेसवर सडकून टीका**







■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ/वाशिम, दि. ५:**
पंतप्रधान नरेंद्र मोदी पोहादेवी येथे येणारे पहिले पंतप्रधान ठरले आहे. त्यांनी या दौऱ्यात पोहरादेवी मंदिरात आरती केली.
या दरम्यान त्यांच्या हस्ते बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवी येथे इतिहास, परंपरा, संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या विरासत-ए - बंजारा नगारा वस्तुसंग्रहालयाचे लोकार्पण झाले.
या वेळी पारंपारिक बंजारा पद्धतीने मोदींचे स्वागत करण्यात आले. मोदींनी देखील नगारा वाजवत या स्वागताला प्रतिसाद दिला. या वेळी मोदींनी काँग्रेस आणि महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली.
काँग्रेसचे सरकार आले तर राज्यात शेतकऱ्यांसाठी सुरु असलेल्या योजना बंद करण्याचे काम ते करतील, तेलंगाणामध्ये काँग्रेसचे सरकार आल्यानंतर त्यांनी सर्वात आधी सर्व लोककल्याणकारी योजना बंद केल्याचा आरोप मोदींनी केला.
दिल्लीत ड्रग्ज रॅकेटचा मुख्य सुत्रधार काँग्रेसचा नेता आहे, या पैशांतून ▶▶ पान ८ वर

### किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता जारी



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पीएम किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता जारी केला. ९.४ कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी २ हजार रुपयांचा हप्ता पाठवला.
एकूण २० हजार कोटींहून अधिक रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ९१.५ लाख शेतकऱ्यांना २००० कोटी रुपयांहून अधिकचा थेट लाभ मिळाला आहे.
या योजनेंतर्गत सरकार शेतकऱ्यांना प्रत्येकी २००० रुपयांच्या ३ हप्त्यांमध्ये दरवर्षी ६ हजार रुपये देते. पहिला हप्ता एप्रिल-जुलैदरम्यान, दुसरा हप्ता ऑगस्ट-नोव्हेंबरदरम्यान आणि तिसरा हप्ता डिसेंबर-मार्चदरम्यान जारी केला जातो.

### ठाकरेंच्या काळात रुपयाही मिळाला नाही

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना या कामाची सुरुवात झाली. मात्र, मधल्या काळात सरकार बदलल्यानंतर या कामाला एकही रुपया मिळाला नसल्याचा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. आपले सरकार आल्यानंतर पुन्हा मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे काम आपल्या सरकारने केल्याचे ते म्हणाले.
लाडकी बहिण योजना कोणीही कधीच बंद करु शकत नसल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. मोदींच्या नेतृत्त्वात ▶▶ पान ८ वर

## टेम्पो चालकाच्या घरी घेतला राहुल गांधींनी जेवणाचा आनंद



■ **वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. ५:**
काँग्रेस नेते राहुल गांधी आज कोल्हापूरच्या दौऱ्यावर पोहोचले. त्यांनी कोणत्याही हॉटेलवर न जाता शहरालगतच्या उचगावातील एका टेम्पो चालकाच्या घरी भेट दिली.
तिथे त्यांच्यासोबत घरगुती जेवणाचा आस्वाद घेऊन ते पुढच्या कार्यक्रमाला निघून गेले. त्यांच्या या अचानक दौऱ्यामुळे या कुटुंबीयांच्या आनंदाला पारावर उरला नव्हता.
राहुल गांधी यांच्या हस्ते आज कोल्हापुरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे अनावरण झाले. ते शनिवारी सकाळी कोल्हापूर विमानतळावर पोहोचले. त्यानंतर ते एका हॉटेलवर व नंतर थेट कार्यक्रमस्थळी जाणे अपेक्षित होते.
पण राहुल यांनी त्याला फाटा देत विमानतळावरून थेट कोल्हापूरच्या उचगाव येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकातील अजित तुकाराम संधे यांच्या घरी पोहोचले.
अजित संधे हे एक टेम्पो चालक आहेत. साधारण काँग्रेस कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. राहुल गांधी जवळपास अर्धा तास त्यांच्या घरी थांबले. तिथे त्यांनी संधे कुटुंबीयांसोबत सकाळचा नाश्ता घेतला. यावेळी त्यांनी त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पाही मारल्या.
राहुल यांच्या या भेटीची काही वेळातच पंचक्रोशीत चर्चा रंगली. त्यानंतर तिथे मोठी गर्दी जमा झाली. त्यानंतर काही वेळाने राहुल संधे कुटुंबीयांचा निरोप घेऊन आपल्या पूर्वनियोजित कार्यक्रमस्थळी निघून गेले.

**स्वतः केला स्वयंपाक**

अजय संधे यांनी राहुल यांच्या भेटीवर आनंद व्यक्त केला. ते एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, राहुल गांधी आमच्याकडे येणार आहेत, याची आम्हाला कल्पना नव्हती. ▶▶ पान ८ वर



# अजित पवारांना आणखी एक धक्का बसणार?

## रामराजे निंबाळकरांनी कार्यकर्त्यांना जमायला सांगितलं, शरद पवार गटात प्रवेश करणार?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात महायुतीच्या नेत्यांच्या भक्कम मोळीतील एक-एक काठी सुटी करण्याचा शरद पवारांचा खेळ अजूनही सुरुच आहे. कारण महायुतीमधील आणखी एक सामर्थ्यवान नेता शरद पवार यांच्या गळाला लागण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत माढा मतदारसंघात भाजपच्या रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्याविरोधात उघडपणे दंड थोपटणारे अजित पवार गटातील ज्येष्ठ नेते आणि विधानपरिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर शरद पवार गटात (रँर्१ ढ६१ उेंस्र) प्रवेश करण्याची दाट शक्यता आहे. याबाबत आजच रामराजे नाईक निंबाळकर



यांच्याकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, रामराजे नाईक निंबाळकर यांनी शनिवारी रात्री फलटण येथील खटके वस्ती येथे कार्यकर्त्यांचा मेळावा बोलावला आहे. या मेळाव्यात रामराजे नाईक निंबाळकर कार्यकर्त्यांशी सल्लामसलत करुन त्यांच्याच कलाने निर्णय घेतील, अशी माहिती आहे. परंतु, रामराजे नाईक निंबाळकर यांनी घड्याळाची साथ सोडून तुतारी हाती घेण्याचा निर्णय पक्का केल्याची माहिती आहे. रामराजे यांच्यासोबत विद्यमान आमदार दीपक चव्हाण देखील अजित पवार यांची साथ सोडतील, असे सांगितले जात आहे. अजित पवार यांनी एका कार्यक्रमात नुकतीच फोनवरुन दीपक चव्हाण यांची विधानसभेची उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, त्यानंतरही दीपक चव्हाण यांनी अजित पवार यांची साथ सोडल्यास हा अजित पवार यांच्यासाठी दुहेरी धक्का ठरेल.

कालच भाजपचे इंदापूर मतदारसंघातील नेते हर्षवर्धन पाटील यांनी भाजपची साथ सोडत शरद पवार गटात प्रवेश केला होता. हर्षवर्धन पाटील यांना आपल्या गोटात आणून शरद पवार यांनी अजितदादा गटाच्या दत्ता भरणे यांच्याविरोधात तगडा उमेदवार पक्षात जोडला होता. हा भाजप आणि अजित पवार गट दोघांसाठी मोठा धक्का ठरला होता.

अजितदादा गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी रामराजे नाईक निंबाळकर हे शरद पवार गटात जाण्याचे वृत्त फेटाळून लावले. ते म्हणाले की, ही अत्यंत चुकीची माहिती आहे. रामराजे नाईक निंबाळकर यांचा आजचा मेळावा कार्यकर्त्यांशी हितगुज करण्यासाठी घेतलेला नाही. याचा अर्थ रामराजे निंबाळकर आणि दीपक चव्हाण शरद पवार गटात जाणार, असा होत नाही. तुतारी हे काय वैश्विक चिन्हं झालं आहे का? महायुतीचे नेते जरुर इतर पक्षांमध्ये जात आहेत. पण शरद पवार गटात बंपर भरती वगैरे सुरु नाही. रामराजे नाईक निंबाळकर यांनी यापूर्वीही काहीही चर्चा होऊ दे, मी दुसरीकडे जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल वेळ पडल्यास त्यांच्याशी चर्चा करतील, असे अमोल मिटकरी यांनी सांगितले.

# पूर्णा नदीवर दहा साखळी बंधारे

## ५३४ कोटींच्या खर्चाला सरकारची मान्यता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील पूर्णा नदीवरील दहा साखळी बंधारे बांधण्यात येणार आहेत. या कामांसाठी ५३४ कोटी रुपयांच्या खचार्ला राज्य मंत्रिमंडळाने शुक्रवारी मान्यता दिली. तसेच, बकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

छ. संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड हा आत्महत्याग्रस्त तालुका आहे. शेतकयांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तसेच त्यांच्या सक्षमीकरणासाठी येथील शेतकरी दोन पिके घेणारा निर्माण व्हावा, याकरिता सिंचनव्यवस्थेच्या बळकटीकरणाच्या अनुषंगाने पूर्णा नदीवर बंधारे बांधण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार शासनाने १० बंधारे बांधण्याचा निर्णय घेतला. या साखळी बंधाऱ्यांमुळे सिंचन क्षेत्रात मोठी वाढ होऊन पीक उत्पादनासाठी शाश्वत सिंचनाची साधने उपलब्ध होतील. तसेच दुष्काळावर मात करून जलस्रोतांचे मोठे बळकटीकरण होण्यास होईल. भूजल पातळीत मोठी वाढ होईल, असे म्हटले होते.

सरकारने त्यानुसार सहा उच्च पातळी बंधारे आणि चार कोल्हापूरी असे दहा बंधारे बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या बंधाऱ्यामुळे सिल्लोड तालुक्यातील १२ गावांमधील १ हजार ४२२ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मौजे ब्राह्मणवाडे येथील किकवी प्रकल्पाच्या कामास गती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. किकवी पेयजल प्रकल्पाचे माती धरण, सांडवा, पाणी पुरवठा काम विद्यूत विमोचक आणि अनुषंगीक कामांना मान्यता दिली. या कामांची विखंडीत केलेली निविदा मुळ अटी व शतीर्नुसार पुनरूज्जिवीत करण्यात येईल, असा सरकारचा दावा आहे.

### शिवसेनेचे माजी आमदार सीताराम दळवी यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावान शिलेदार म्हणून ओळखले जाणारे शिवसेनेचे माजी आमदार सीताराम दळवी यांचे शनिवारी वृद्धापकाळाने अंधेरी येथे निधन झाले. निधनासमयी ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर संध्याकाळी उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले.

सीताराम दळवी हे १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार म्हणून तत्कालीन अंधेरी मतदारसंघातून निवडून आले होते. त्याआधी ते मुंबई महापालिकेवर नगरसेवक म्हणून निवडून गेले होते. शिवसेनेच्या उभारणीच्या काळापासून ते संघटनेत कार्यरत होते. शिवसेनेच्या अनेक सामाजिक, राजकीय आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. दळवी यांच्या निधनाबद्दल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस हे दळवी यांचे मूळ गाव असून त्यांचे अंधेरी पूर्व येथे अखेरपर्यंत वास्तव्य होते.


# झोपड्यांवर कारवाई करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करणार

## राज्य सरकारची उच्च न्यायालयात माहिती

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

पवई येथील जयभीम नगरमधील झोपड्यांवरील कारवाईबाबत विशेष तपास पथकाने (एसआयटी) सादर केलेल्या अहवालाच्या आधारे कारवाई करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला जाईल. तसेच, एसआयटीतर्फे नंतर या प्रकरणाची चौकशी केली जाईल, अशी माहिती राज्य सरकारतर्फे शुक्रवारी उच्च न्यायालयात देण्यात आली. त्याची दखल घेऊन एसआयटीतर्फे केल्या जाणाऱ्या चौकशीवर आपल्यातर्फे देखरेख ठेवण्यात येईल, असे न्यायलयाने स्पष्ट केले.

राज्य मानवाधिकार आयोगाचे कोणतेही आदेश नसताना महानगर पालिकेने जयभीमनगरमधील झोपड्यांवर पाडकाम कारवाई केल्याचा अहवाल एसआयटीने आठवड्याच्या सुरूवातीला न्यायालयात सादर केला होता. शिवाय, संबंधित जमीन खासगी मालकीची असल्याचेही अहवालात म्हटले होते. त्याची दखल घेऊन, ऐन पावसाळ्यात खासगी



जमिनीवरील बांधकामे पाडलीच कशी? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला होता. तसेच, हे एक मोठे षडयंत्र असून या प्रकरणी पोलीस, महापालिका किंवा विकासक यांची भूमिका तपासण्याची गरज व्यक्त करताना झोपडीधारकांनी केलेल्या तक्रारीच्या आधारे कारवाई करणाऱ्यांविरोधात गुन्हा नोंदवणार का ? अशी विचारणा एसआयटीला केली होती.

या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे शुक्रवारी प्रकरणाची सुनावणी झाली. त्यावेळी, एसआयटीने दाखल केलेल्या अहवालाच्या आधारे कारवाई करणाऱ्याविरोधात पवई पोलिसांत गुन्हा दाखल केला जाईल. एसआयटीच्या अधिकाऱ्यातर्फे झोपडीधारक तक्रारदार महिलेचा जबाब नोंदवण्यात येईल.

त्यानंतर, प्रकरण पुढील तपासासाठी एसआयटीकडे वर्ग केले जाईल, अशी माहिती मुख्य सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाला दिली. न्यायालयानेही त्याची दखल घेऊन तक्रारदार महिलेला तिचा जबाब नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात उपस्थित राहण्याचे आदेश दिले. या वेळी प्रकरणाबाबतचा कायदेशीर मुद्दा ऐकण्याची विनंती महापालिकेच्या वतीने न्यायालयाकडे करण्यात आली. मात्र, प्रकरण एसआयटीकडे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे, एसआयटीतर्फे केल्या जाणाऱ्या तपासावर न्यायालयाकडून तूर्त देखरेख ठेवली जाणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, प्रकरणाची सुनावणी १८ नोव्हेंबर रोजी ठेवली.

दरम्यान, ऐन पावसाळ्यात जयभीमनगर येथील ६५० झोपड्यांवर महानगरपालिकेने पोलीस बंदोबस्तात कारवाई केली होती. या कारवाईविरोधात रहिवाशांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, प्रकरणाच्या चौकशीसह कारवाई करणाऱ्या महापालिका आणि पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली होती. न्यायालयाने गुन्हे विभागाचे सह आयुक्त लखमी गौतम यांच्या देखरेखीखाली एसआयटीची स्थापना केली होती. त्यानंतर, मानवाधिकार आयोगाने पाडकामाबाबत आदेश दिल्याची कागदपत्रे शोधूनही सापडलेली नाहीत. शिवाय, बेकायदा झोपड्यांबाबत कोणी तक्रार केली हेही चौकशीत आढळून आलेले नाही, असे न्यायालयाने स्थापन केलेल्या एसआयटीने न्यायालयात सादर केलेल्या अहवालात म्हटले होते.

### अहिल्यानगर नामांतराची अधिसूचना जारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

अहमदनगरला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर केंद्र सरकारने शिक्कामोर्तब केले आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने शुक्रवारी अहिल्यानगर नामांतराची अधिसूचना जारी करण्यात आली. त्यानुसार आता अहमदनगर शहर हे अहिल्यानगर म्हणून ओळखले जाईल. तर महसूल विभागाची अधिसूचना जारी होईपर्यंत जिल्हा आणि तालुक्याचे नाव अहमदनगर असे राहणार आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने अहमदनगरचे नाव अहिल्यानगर असे करण्यास अनुमती दिल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात ४ ऑक्टोबर रोजी राजपत्र प्रसिद्ध केले. आता महसूल विभागाकडून अहमदनगर तालुका आणि जिल्ह्याच्या नामांतराबाबत नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवल्या जातील.या हरकती आणि सूचना प्राप्त झाल्यानंतर महसूल विभागाकडून अहमदनगर तालुका आणि जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर असे करण्याबाबत अधिसूचना जारी केली जाईल. या कायदेशीर प्रक्रियेला आणखी सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

# दुचाकींची समोरासमोर धडक; दोन ठार, दोघे जखमी

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ५ :

दुचाकींची समोरासमोर धडक होऊन घडलेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले. हा अपघात शनिवारी दुपारी शिरजगाव कसबा-देऊरवाडा मार्गावरील वळणावर घडला.

कुणाल नरेश भुते (१८) व शेख मुस्ताक शेख गौसुद्दीन (३२) दोघेही रा. देऊरवाडा अशी मृतांची तर विनोद रामकृष्ण फिसके (३५) रा. देऊरवाडा व सारंग नामदेव संभे (१८) रा. शिरजगाव कसबा अशी जखमींची नावे आहेत. शनिवारी दुपारी शिरजगाव कसबा-देऊरवाडा मार्गावरील वळणावर दोन भरधाव दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दुचाकीवरील कुणाल व शेख मुस्ताक यांचा मृत्यू झाला. तर विनोद व सारंग हे दोघे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच शिरजगाव कसबा पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व गंभीर जखमी विनोद व सारंगला उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. त्यानंतर मृतदेहांना शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. शिरजगाव पोलिसांनी अपघाताची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

नैसर्गिक मृत्यू किंवा आजाराने मृत्यू होणाऱ्यांच्या तुलनेत रस्त्यावर होणाऱ्या वाहन अपघातात मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या सहा महिन्यांत १४६ प्राणांतिक अपघात होऊन त्यांत १६६ जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात अलीकडच्या काळात राष्ट्रीय, राज्य महामार्गाचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. त्यामुळे वाहनांचा वेगही वाढला आहे. अनेकदा दुचाकी वाहनचालक वाहतूक नियम न पाळता वाहने चालवितात. त्यातून अपघातांची संख्या वाढली आहे.

अपघाती मृत्यूसंख्या लक्षात घेता दरदिवशी सरासरी अपघातात एकाचा मृत्यू तर तिघे जखमी होतात. अपघातामुळे होणारे नुकसान दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच आहे. त्यामुळे प्रत्येक वाहनचालकाने वाहतूक नियमांचे तंतोतत पालन करून अपघात टाळण्याची गरज आहे. जिल्ह्यात रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त पोलिसांच्या वाहतूक शाखा, प्रादेशिक परिवहन विभागाकडून वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातात.

# पोलीस दलाच्या नावाचे एक्सवर बनावट खाते

■ महासागर प्रतिनिधी,
नवी मुंबई, दि. ५ :

नवी मुंबईत मागील दोन वर्षात ऑनलाईन चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असून या चोरट्यांनी उच्चशिक्षित आणि धनिकांना आपले लक्ष्य केले आहे. कोट्यावधी रुपयांची चोरी ऑनलाईन चोरीचे सत्र सूरु असून दिवसाला एकतरी चोरीच्या घटना नोंद केल्या जात आहेत. मात्र या चो-या रोखण्यासाठी नवी मुंबई पोलीस असमर्थ ठरले असून गुरुवारी नवी मुंबई पोलीसांनी स्वताच नवी मुंबई पोलीसांच्या नावाने बनावट एक्स खाते सूरु केलेल्या व्यक्ती विरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला. त्यामुळे ऑनलाईन चोर हे पोलीसांवर शिरजोर झाल्याचे चित्र आहे.

नवी मुंबई पोलीस दलाचे परिवर्तन काळानुरुप आधुनिक पोलीस दलात करण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी कंबर कसली आहे. यासाठी आयुक्त भारंबे यांनी काही महाविद्यालयांमधील सायबर सूरक्षा विषयाच्या प्राध्यापकांच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचा-यांचे शिकवणीवर्ग सूरु करण्याचा प्रयोग केला. प्रत्येक पोलीस ठाण्यात किमान दोन तरी अधिकारी आणि चार कर्मचा-यांना तरी सायबर सूरक्षेचे ज्ञान असणे गरजेचे असल्याचा हा प्रयोग नवी मुंबईत पहिल्यांदा करण्यात आला.

नवी मुंबई पोलीस दलाला आयुक्त भारंबे यांच्याकाळात पहिल्यांदा सायबर सेल मध्यवर्ती पोलीस ठाणे सूरु झाले. वर्षभरात या सायबर पोलीस ठाण्यात सुद्धा ऑनलाईन चोरी व अपहाराचे २२१ गुन्हे दाखल आहेत. मोठमोठ्या उद्योगपती किंवा नामांकित व्यक्तीच्या नावाने ही चोरी भामट्यांकडून केली जाते.

गुरुवारी सायबर सूरक्षा पोलीस ठाण्यात पोलीसांनी दिलेल्या फीयार्दीमध्ये मागील चार वर्षांपासून एका अनोळखी भामट्याने एक्स या ॲपवर नवी मुंबई पोलीस दलाचे आणि पोलीस आयुक्तांच्या नावाचे बनावट खाते सूरु केल्याचे पोलीसांच्या निदर्शनास आले. तसेच या भामट्याने इन्स्टाग्रामवर सुद्धा नवी मुंबई पोलीस दलाच्या नावाने बनावट खाते सूरु केले आहे.

पोलीसांच्या सायबर सूरक्षा विभाग नियमितपणे समाज माध्यमांवरील विविध संकेतस्थळ आणि विविध समाजमाध्यमांच्या ॲपवर पोलीसांच्या नावाने नागरिकांना फसविण्यासाठी अशी बनावट खाती सूरु आहे का याचा मागोवा घेत असतात. याच मागोवा घेत असताना पोलीसांच्या सायबर विभागाला संबंधित खाती आढळल्याने पोलीसांनी स्वताहून या प्रकरणी गुन्हा नोंदविला. या खात्यावर कोणत्याही नागरिकाची फसवणूक झाल्याची तक्रार पोलीसांकडे कोणी केली नव्हती अशी माहिती सायबर सूरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गजानन कदम यांनी दिली.

# पुण्यात बजरंग दलाकडून दांडिया कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न : सुप्रिया सुळे

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ५ :

देशभरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गरबा, दांडियासाठी मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु, अशा कार्यक्रमांना काही संघटना विरोध करत असल्याचं पुढे येत आहे. आता पुण्यातील एक कार्यक्रम बजरंग दलाने बंद पाडण्याचा प्रयत्न केल्याचा दावा राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. याबाबत त्यांनी बजरंग दलाला इशारा दिला आहे.

बारामती येथील चिराग गार्डन येथे नवरात्रीच्या निमित्ताने सुरू असलेला दांडियाचा कार्यक्रम बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी बंद पाडण्याचा प्रयत्न केला. बारामतीत अशा पद्धतीने



गुंडगिरी कधीच झाली नाही. हे ह्मोरल पोलिसींग यापूर्वीही आम्ही खपवून घेतले नव्हते आणि यापुढेही घेणार नाही. अशा प्रकारचे उद्योग करणाऱ्यांवर पोलिसांनी कायद्याने कठोर कारवाई करावी, असं आवाहन सुप्रिया सुळे यांनी केलं आहे.

तसंच, नवरात्रोत्सवात दांडिया आणि गरबा खेळण्याच्या ठिकाणी महिलांच्या छेडछाडीचे प्रकार घडल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी पोलीस ठाणे, गुन्हे शाखेतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी पायी गस्त घालण्याचे आदेशही पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. नवरात्र उत्सवामध्ये दांडिया खेळण्याच्या ठिकाणी आणि आजूबाजूच्या परिसरात आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात यावा. हद्दीतील उद्याने, मोकळी मैदाने, सार्वजनिक गर्दीची ठिकाणे या जागी गस्त घालावी. गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरे फिरणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशाही सूचना पोलीस आयुक्त चौबे यांनी दिल्या.

दरम्यान, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी देशभरातील विविध ठिकाणी असे कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न केला आहे. इंदूरमधील भवरकुवा परिसरात गेल्या ३५ वर्षांपासून नवरात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाचे आयोजक फिरोज खान यांच्यावर लव्ह जिहादचा प्रचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा उपयोग हिंदू महिला आणि मुस्लीम पुरुषांमधील संबंध वाढवण्यासाठी केला जातो, असा आरोप स्थानिक बजरंग दलाने केला आहे. यासंदर्भात त्यांनी पोलिसांकडे तक्रारही केली आहे.

# पाच वर्षाच्या मुलावर अल्पवयीनांकडून अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ५ :

कोंढवा भागातील बोपदेव घाटात तरुणीवर सामुहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली. त्यानंतर कोंढवा भागात पाच वर्षांच्या मुलावर अल्पवयीनांनी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. अल्पवयीन मुलावर अत्याचार केल्याप्रकरणी दहा, अकरा, तसेच तेरा वर्षाच्या मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित मुलाच्या पालकांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगा आणि गुन्हा दाखल करण्यात आलेली अल्पवयीन मुले एकाच सोसायटीत राहायला आहेत. पाच वर्षांचा मुलगा सोसायटीच्या आवारात खेळत होता. त्यावेळी मुलांनी सोसायटीच्या आवारात खेळणाऱ्या मुलाला मोबाइलवरील अश्लील चित्रफीत मुलाला दाखविले. मुलाशी अश्लील कृत्य केले. त्यानंतर पीडित मुलाशी अल्पवयीनांना पुन्हा अश्लील कृत्य केले. मुलांकडून दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे पाच वर्षांच्या मुलांनी या प्रकाराची माहिती पालकांना दिली. पालकांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. कोंढवा पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास सुरू आहे.

वानवडी भागातील दोन शाळकरी मुलींशी व्हॅनचालकाने अश्लील कृत्य केल्याची घटना नुकतीच घडली. त्यानंतर खराडी भागातील एका नामांकित शाळेतील तिसरीतील मुलीबरोबर शाळेच्या आवारात अश्लील कृत्य करण्यात आल्याची घटना घडली. शहर, परिसरात अल्पवयीन मुलांवर गेल्या नऊ महिन्यांत अत्याचाराच्या ३०० हून जास्त घटना घडल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोस्को) गुन्हे दाखल केले आहेत.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांना ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता मिळणार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ५ :

राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता तसेच डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय शुक्रवारी मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता देण्यास मंत्रिमंडळाने मंजूरी दिली. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवगार्तील वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-20) व त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांना तसेच दंतशल्यचिकीत्सक गट- ब (एस-20) व दंतशल्यचिकीत्सक विशेषज्ञ संवर्ग (एस-23) यांना सातव्या वेतन आयोगानुसार १ जानेवारी २०१९ पासून ३५ टक्के दराने व्यवसायरोध भत्ता लागू केला जाईल. विविध वेतनश्रेणीतील ५२९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

पुण्यातील डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दोन लाभांची सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या तीनही अभिमत विद्यापीठातील २०१६ नंतर निवड झालेल्या शिक्षकेतर पदांना देखील दोन लाभांचीच (१२ व २४ वर्षे) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू राहणार आहे.

# नंदुरबार जिल्ह्यास पुन्हा भूकंपाचे धक्के

■ महासागर प्रतिनिधी, नंदुरबार, दि. ५ :

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात खोकसा गाव परिसरात शुक्रवारी रात्री पुन्हा भूकंपाचे सौम्य हादरे बसले. गुजरातमधील गांधीनगरच्या भूकंपमापन यंत्रात २.२ रिश्टर स्केल इतकी तीव्रता नोंदवली गेली. वारंवार बसणाऱ्या हादऱ्यांमुळे परिसरातील ग्रामस्थ पुरते घाबरले आहेत. ग्रामस्थ रात्र रस्त्यावरच जागून काढत असल्याचे चित्र आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील खोकसा, दापूर परिसरात शुक्रवारी रात्री भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. खोकसा गाव परिसरातील जंगलांमधून येत असलेला आवाज, जमिनीत निर्माण होत असलेले कंपन याची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने ग्रामस्थ पुरते हादरले आहेत. भूजल विभागाच्या अधिकाऱ्यांनी या परिसराची पाहणीदेखील केली आहे. तीन ते चार दिवसांपासून या भागात भूकंपाचे धक्के जाणवत असतांना जिल्हा प्रशासकीय यंत्रणेकडून कोणतीही ठोस तपासणी करण्यात येत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

# मुंबईकरांचा भुयारी मेट्रो प्रवास सोमवारपासून सुरू

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ५ :

मुंबईतील पहिल्या कुलाबा -वांद्रे-सीप्झभुयारी मेट्रो-मार्गिकेतील आरे - बीकेसी टप्प्याचे लोकार्पण शनिवार, ५ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. लोकार्पणानंतर लागलीच आरे-बीकेसी टप्पा सर्वसामान्यांसाठी खुला होणे अपेक्षित होते.

मात्र मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) हा टप्पा प्रवाशांसाठी सोमवारपासून खुला करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता आरे - बीकेसी टप्पा प्रवाशांसाठी खुला होणार आहे. सोमवारी सकाळी ११ ते रात्री ११.३० या वेळेत भुयारी मेट्रोची सेवा सुरू राहणार आहे. त्यामुळे मुंबईकरांना भुयारी मेट्रो प्रवासासाठी सोमवारपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

एमएमआरसीएलकडून ३३.५ किमी लांबीच्या मेट्रो ३ मार्गिकेचे काम सुरू आहे. ही संपूर्ण मार्गिका आतापर्यंत वाहतूक सेवेत दाखल होणे अपेक्षित होते.

मात्र तांत्रिक अडचणी, कारशेड वाद आणि संथ गतीने सुरू



असलेले काम यामुळे या मार्गिकेस विलंब झाला आहे. पण आता मात्र मुंबईकरांची भुयारी मेट्रो प्रवासाची प्रतीक्षा अवघ्या काही तासात पूर्ण होणार आहे. बीकेसी येथील बीकेसी मेट्रो स्थानकावर शनिवारी सायंकाळी ६ वाजता पंतप्रधान आरे - बीकेसी मार्गिकेचे लोकार्पण करणार आहेत. यावेळी ते बीकेसी मेट्रो स्थानक - सांताक्रुझ मेट्रो स्थानक असा भुयारी मेट्रो प्रवास करणार आहेत.

एकूणच मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गिकेतील पहिल्या टप्प्याचे लोकार्पण होणार असल्याने भुयारी मेट्रोतून प्रवास करण्यासाठी मुंबईकर आतुर झाले आहेत. शनिवारी रात्री वा रविवारी सकाळी मुंबईकरांची ही आतुरता संपुष्टात येईल असे वाटत होते. मात्र एमएमआरसीएलने मुंबईकरांच्या भुयारी मेट्रोच्या प्रवासाची प्रतीक्षा काहीशी लांबवली आहे.

# उड्डाणपुलामुळे अमरावती मार्गावरील वाहतूक कोंडी सुटेल : नितीन गडकरी





## वाडी येथील चारपदरी उड्डाणपुलाचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
वाडीचा विकास गेल्या पाच दशकांपासून जवळून बघतोय. आज वाडीचे चित्र बदलले आहे, याचा आनंद आहे. एकेकाळी या रस्त्याने जाणे अवघड होते. रस्ता खराब होताच, पण ट्रक उभे राहायचे. गोडाऊन्स होते. अपघात व्हायचे. मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना लोकांना करावा लागत होता. आज या उड्डाणपुलामुळे अमरावती महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर होणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शनिवार) व्यक्त केला.

वाडी येथील चारपदरी उड्डाणपुलाचे आणि व्हेरायटी चौक ते बोले पेट्रोल पंप चौक व विद्यापिठ चौक ते वाडी नाका चौक दरम्यान ४.८९ किलोमीटरच्या व्हाईट टॉपिंगचेही लोकार्पण ना. गडकरी यांच्या हस्ते झाले. तसेच १०५ कोटी रुपये खर्चाच्या भुयारी गटार योजनेचे भूमिपूजनही यावेळी झाले. या कार्यक्रमाला आमदार टेकचंद सावरकर, आमदार समीर मेघे, आमदार डॉ. परिणय फुके, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, माजी आमदार सुधाकर देशमुख, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष अरविंद गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूर-अमरावती महामार्गावर २.३ किलोमीटरचा चारपदरी उड्डाणपूल लोकांच्या सेवेत अर्पण करण्यात आला आहे. या प्रकल्पाची किंमत २४६ कोटी रुपये आहे. रविनगर येथून सुरू होणाऱ्या उड्डाणपुलाचे कामही लवकरच पूर्णत्वास येणार आहे. गडकरी म्हणाले, उड्डाणपूल उत्तम दर्जाचा झाला आहे. दोन ते तीन मिनिटांत शहरात जाता येणार आहे. रवीनगरचा उड्डाणपूल झाल्यावर थेट व्हेरायटी चौकात पोहोचता येणार आहे. शहरातून बाहेर निघण्यासाठी फार तर १५ मिनिटे लागणार आहेत. वाडीपासून जवळच ॲग्रोकन्व्हेन्शन सेंटर तयार होत आहे. जागतिक स्तरावरील प्रदर्शने इथे होणार आहेत. नागपूर शहर, जिल्हा आणि वाडी परिसरातील हजारो तरुणांना रोजगार मिळणार आहे. जवळच साडेचारशे खोल्यांचे थ्री स्टार हॉटेलही आणि सहा रेस्टॉरंटस होणार आहेत, असेही ना. श्री. गडकरी म्हणाले.

वाडीचा चौफेर विकास होत असताना १८ मिटर आणि २४ मिटरची ट्रॉली बस येथून सुरू होणार आहे. नागपूरच्या ५० किलोमीटरच्या रिंगरोडवर ही बस धावणार आहे. देशातील पहिला प्रयोग वाडीमध्ये होणार आहे. या बसचे तिकीट डिझेल बसच्या तुलनेत कमी राहणार आहे, अशी माहिती गडकरी यांनी दिली.

## विज्ञान जिज्ञासाचा फिरता चषक भारती कृष्ण विद्याविहारला

### प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्स्प्लोरेटरीची प्रश्नमंजूषा स्पर्धा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :
विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि अंतराळ विज्ञान या विषयातील ज्ञान वाढविण्याच्या उद्देशाने प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीतर्फे जागतिक अंतराळ सप्ताहाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विज्ञान जिज्ञासा प्रश्नमंजूषा स्पर्धेचा प्रो. व्ही. जी. भिडे स्मृती फिरता चषक भारती कृष्ण विद्याविहारने पटकावला.

धरमपेठ स्थित प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीमध्ये शनिवारी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत 21 शाळांच्या चमू सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेचे क्विझ मास्टर्स पद्मनाभन पिल्लई व अनिरूद्ध मुरारका हे होते. बक्षिस वितरण कार्यक्रमाला मंचावर धरमपेठ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रत्नाकर केकतपुरे, अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, प्रो. राजेंद्र सिंग एक्सप्लोरेटरीचे अध्यक्ष हेमंत चाफले, संचालक सीमा उबाळे तसेच, पद्मनाथ पिल्लई, अनिरुद्ध मुरारका यांची उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते भारती कृष्ण विद्याविहारच्या अर्जुन लिचडे, युग गोयल, सानिध्य सोनटक्के यांना फिरता चषक देऊन सन्मानित करण्यात आले. आर. एस. मुंडले शाळेच्या निष्ठा काळे, अथर्व गायकी, भार्गव पाणुरकर यांनी द्वितीय क्रमांक तर महात्मा गांधी हायस्कूलच्या लावण्या व्ही. डोंगरे, सम्यक बागडे, हितार्थ बोडेले यांनी तृतीय क्रमांक पटकावला चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक ललिता पब्लिक स्कूलच्या समायरा घोडके, इशिका बेलखेडे, शौर्य निओडिंग यांना मिळाले. ॲड. उल्हास औरंगाबादकर यांनी विजेत्या चमूंचे पारितोषिक देऊन कौतुक केले. तसेच, सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले. कार्यक्रमाचे संचालन राधिका कायंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुल लांजे यांनी केले.

## २ घरांचे कुलूप तोडून चोरी

नागपूर : वाडी ठाण्यांतर्गत चोरांनी दोन घरांचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांवर हातसाफ केला. या घटनांनी नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. पहिली घटना कमलानगर परिसरात जय पॅलेस अपार्टमेंट येथे घडली. फियार्दी आकाश अशोक शेळके (42) हे युनियन बँकेत विशेष सहायक आहेत. त्यांची पत्नी नीलम ही राजीव गांधी शाळेत शिक्षिका आहे. आकाश आणि नीलम घराला कुलूप लावून काही कामाने बाहेर गेले होते. या दरम्यान चोरांनी दाराचे कुलूप आणि कोंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील रोख 50 हजार आणि दागिने असा एकूण 1 लाख 25 हजारांचा माल चोरून नेला. दुसरी घटना काचीमेट परिसरात रजत हिल अपार्टमेंट येथे घडली. पोलिसांनी श्रीकांत मनोहर वैद्य (45) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला.

## राणी दुर्गावती जयंती बसपाद्वारे संपन्न



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :
गोंडवाना साम्राज्याच्या राजमाता वीरांगणा राणी दुर्गावती दलपतशहा मडावी यांची आज 5 ऑक्टोंबर रोजी 500 वी जयंती बसपा ने साजरी केली. बसपा च्या कही हम भूल ना जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत आज 5 ऑक्टोंबर रोजी राणी दुर्गावती चौक, यादवनगर येथील वीरांगणा दुर्गावतींच्या पुतळ्याला बसपाचे प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, नागपूर जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार व केंद्रीय माहिती व जनसंपर्क विभागातील माजी संचालक डॉ नीलकंठ फुलसंगे आदींनी माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ नीलकांत फुलसंगे यांनी गोंडवाना राज्याच्या महाराणी वीरांगणा दुर्गावती मडावी यांनी आपल्या हयातीत जिंकलेल्या 51 युद्धांच्या शौर्याचा इतिहास दाबल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर नागपूर बसविणारे बक्त बुलंदशहा यांचाही खरा इतिहास सांगितला जात नसल्याचे दुःख त्यांनी व्यक्त करून समाजामध्ये छोट्या छोट्या कथा, कहाण्यांच्या, प्रबोधनाच्या माध्यमातून आमच्या महापुरुषांचा खरा इतिहास पोहोचवावा असे सांगितले. अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी बहुजन समाजाने बसपाच्या माध्यमातून आपल्या एकजुटीचे दर्शन घडवून शासक बनण्याचे आवाहन केले.

**Change Of Name**

THIS IS INFORM TO ALL THAT MY OLD NAME WAS **SANA ANJUM ABDULNAIM SHEIKH**, & NOW CHANGE TO **SANA ABDULNAIM SHEIKH**, (NEW NAME)
**ADD:** NEHRU WARD CHIMUR CHANDRAPUR, 442903

## पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद

रजि नं. वाय.एम.एल/पी.एस.डी/बी.एन.के/ओ.१४३/१९८५
मुख्य कार्यालय प्रशासकीय भवन,तलाव ले-आउट,
पुसद-४४५२०४,फोन नं.२४६३७१,२४८०२१,फॅक्स नं.(०७२३३) २४५७६१

### -: स्थावर मालमत्ता जाहिर फेर-लिलाव सुचना :-

(सेक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांन्शियल ॲसेटस् ॲन्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इंन्ट्रेस्ट ॲक्ट २००२, व त्याखालील नियम क्र.६,७,८ आणि ९ नुसार) खालील सही करणार दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसदचे प्राधिकृत अधिकारी असुन,त्यांना प्राप्त अधिकारांतर्गत शाखा बुटीबोरीचे खालील थकबाकीदारांची त्यांचे नावासमोर दिलेल्या तपशिलाची मालमत्ता बँकेच्या वसुलीसाठी ताब्यात घेतलेली आहे.आणि त्यांना सुचना व नोटीसेस देवूनही अद्यापपर्यंत थकबाकीचा भरणा न झाल्यामुळे सदर मालमत्ता वरील कायद्यातील तरतुदीनुसार विक्रीस काढण्याचा निर्णयाप्रत खालील सही करणार आले आहेत व या बाबतची पुर्व सुचना संबधित थकबाकीदारांना नियमानुसार देण्यात आलेली आहे.

त्यामुळे संबंधित थकबाकीदार व तमाम जनतेस याव्दारे कळविण्यात येते की,खालील तपशिलाची स्थावर मालमत्ता "आहे तेथे व आहे त्या तत्वावर" एकत्र किंवा अनेक भागामध्ये जास्तीत जास्त किंमत येण्याचे दृष्टीने जाहिर फेर-लिलावाव्दारे विक्री करण्यात येत आहे या बाबतची सुचना थकबाकीदारांना देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | मालमत्तेचा तपशिल | राखिव किमत | दि.३१/०५/२०२३ अखेर येणे बाकी |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.राजु रामचंद्र जाधव<br>रा.प्लॉट नं.२२,सिडको,बुटीबोरी ता.जि.नागपुर<br>जामीनदार :-<br>१) श्री.रमेश वारलु आडे<br>२) श्री.विजयराव हरिभाऊ देशमुख | मौजा रेंगापार ता.नागपुर ग्रामीण जि.नागपुर येथील सर्व्हे नं.१३८/२, प.ह.न. नं.७६,वार्ड नं.०३ मधील पठाण सोसायटी वर्धा रोड स्थित प्लॉट नं.१० क्षेत्रफळ ७५०.०० चौ.फुट त्यावरील तळ मजला बांधकाम क्षेत्रफळ ५५८.३२८ चौ.फुट ग्राम पंचायत बुटीबोरी यांचे हद्दीतील. | रु.५,००,०००/- | रु. २,४२,६५८/- + दि.०१/०६/२०२३ पासुनचे व्याज + वसुली खर्च |

**फेर-लिलावाचे ठिकाण :-** दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद, शाखा बुटीबोरी,लक्ष्मिनारायण प्लाझा,मेन रोड,बुटीबोरी ता.जि.नागपुर
**फेर-लिलावाची दिनांक व वेळ :-** दि.२५/१०/२०२४ रोज शुक्रवार दुपारी ठिक १.०० वाजता.

**टिप :-**
१) फेर-लिलावाचे नियम व अटी शाखा बुटीबोरी येथे व मुख्य कार्यालयात वसुली विभागात कार्यालयीन वेळेमध्ये नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
२) जप्त स्थावर मालमत्ता प्रत्यक्ष पाहणीसाठी मोबा.नं ७८८८०९७९२५ संपर्क साधावा.
३) सदर विक्री व्यवहार हा उपरोक्त कायद्यास,नियमास अधिन राहुन होईल. खालील सही करणार यांनी सदर व्यवहार करण्याचे,रद्द करण्याचे,स्थगित करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहे.
४) फेर-लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम म्हणुन रु.१,००,०००/- चा भरणा दि.२५/१०/२०२४ रोजी दुपारी ठीक १.०० वाजण्या पुर्वी करावा लागेल.
५) फेर-लिलाव सुरु झाल्या नंतर एखादा व्यक्ती अनामत रक्कम भरणा करून लिलावात भाग घेऊ इच्छित असल्यास त्याला मंजुरी देणे अथवा न देणे प्राधिकृत अधिकारी ठरवतील
६) बँकेला मिळालेल्या माहिती नुसार मालमत्तेवर इतर कोणतेही बोझे नाही परंतु काही कायदेशीर शासकीय बाकी निघाल्यास ती खरेदीदारास भरावी लागेल.

**स्थळ :-** बुटीबोरी
**दिनांक :-** ०६/१०/२०२४

**प्राधिकृत अधिकारी**
**दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद**
**शाखा :-बुटीबोरी**

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### Tender Notice

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These Tender can be submitted by the Registered Contractors of NMC. The Terms and conditions of Tenders are available in Tender Form. The sale and purchase of Tender form at E.E. (DPDC) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD |
|---|---|---|---|
| 1 | Construction of RCC Chamber and Providing and Laying Sewer Line and C.C. Flooring at Various Places in Lalganj Ward in Pr. No. 21 | 819334 | 8200 |
| 2 | Providing and Laying CC Flooring Near Navshakti High School Area in Pr. No.20 | 835874 | 8400 |
| 3 | Providing and Laying Sewer Line and Construction RCC Chamber and Various Civil Work of Vyam Shala at Society Road Ganeshpeth in Pr. No. 17 | 831822 | 8400 |
| 4 | Providing and Laying RCC Flooring at Various Places in Bhuteshwar Nagar at Pr. No. 18 | 819099 | 8200 |
| 5 | Providing and Laying CC FlooringNear Rohit Kirana Store at Naikwadi Bangladesh in Pr. No.20 | 822841 | 8300 |
| 6 | Providing and Laying CC Flooring From Ganesh Chowk to Munnalal Gaur at Ganjipeth in Pr. No. 19 | 835691 | 8400 |
| 7 | Providing and Laying CC Flooring at Various Places in Ganeshpeth in Pr. No. 17 | 826867 | 8300 |
| 8 | Construction of C.C. Road From H/o Shri. Rohit Deshmukh to H/o Shri. Dhage at Navi Shukrwari Telipura in Pr. No. 18 | 819453 | 8200 |
| 9 | Providing and Laying Sewer Line Near Lucky Chicken Center Area in Pr. No. 19 | 831980 | 8400 |
| 10 | Construction of RCC Chamber Near Pewatha Ramdyal Akhada at Lalganj Telipura in Pr. No. 21 | 831774 | 8400 |
| 11 | Providing and Laying 40/50 meter New Sewer Line at Macchisath Mutton Market in Pr. No. 20 | 831056 | 8400 |
| 12 | Construction of RCC Chamber At Various Places Near Chitra Talkies Gawalipura in Pr. No. 19 | 823310 | 8300 |
| 13 | Providing and Laying Sewer Line and Construction of R.C.C. Chamber and Drain Line at Various Places in Bhuteshwar Nagar in Pr. No. 18 | 830160 | 8400 |
| 14 | Construction of Cement Road From H/o Tannelwar to H/o. Shri Rakshmwar at Masurkar Chowk in Pr. No. 22 | 819099 | 8200 |
| 15 | Repairing of Samajbhavan at Sambhaji Kasar Dhivarpura in Pr. No. 20 | 835010 | 8400 |
| 16 | Providing and Laying Sewer Line at Kuradkar Peth in Pr. No. 12 | 821866 | 8300 |
| 17 | Providing and Laying Sewer Line and C.C. Flooring From H/o Bhola Hajare To School At Thakkargram in Pr. No. 20 | 819348 | 8200 |
| 18 | Construction of Cement Road From H/o Shri. Yadav to H/o. Shri Paunikar at Juni Mangalwari in Pr. No. 22 | 818872 | 8200 |
| 19 | Asphalting of road from Old Jelkhana Parisar to H/o Kishor Patil at Pr. No. 19 | 834757 | 8400 |
| 20 | Providing and Laying Sewer Line and C.C. Pavement from H/o Vikky Kolaskar to H/o Maruti Chaware at Pr. No. 20 | 831106 | 8400 |
| 21 | Construction of Cement Road from Nandumal Building to Hanuman Mandir at Bajeriya in Pr. No. 19 | 829834 | 8300 |
| 22 | Providing and Laying Sewer Line and C.C. Flooring From Top Mens to Amir Hotel and H/o Shri. Sanajay Khare to H/o Narayan Khergade at Bhavsar Chowk in Pr. No. 19 | 819242 | 8200 |
| 23 | Providing and Laying Sewer Line Near H/o Durichand Bagde at Naikwadi Bangladesh in Pr. No. 20 | 821893 | 8300 |
| 24 | Providing and Laying Sewer Line From H/o Marathe to Ramu Kirana Store at Kumbharpura Panchpaoli in Pr. No. 20 | 822766 | 8300 |
| 25 | Construction of C.C. Road From H/o Shri. Shendre to H/o. Shri. Sawarkar at Telipura in Pr. No. 18 | 818947 | 8200 |
| 26 | Providing and Laying RCC Flooring at Various Places in Nandaji Nagar at Pr. No. 18 | 819250 | 8200 |
| 27 | Providing and Laying Sewer Line and Construction of R.C.C. Chamber and Drain Line at Various Places in Nandaji Nagar in Pr. No. 18 | 829782 | 8300 |
| 28 | Providing and Fixing D.I. Cover at Various Places in Pr. No. 19 | 837150 | 8400 |
| 29 | Providing and Laying Sewer Line From Late Vitthalrao Gaidhane Abhysika Kendra to Ramjiva Choudhary Sports Complex at Gadikhana in Pr. No. 18 | 811671 | 8200 |
| 30 | Construction of RCC Chamber At Various Places in Pr. No. 17 | 831525 | 8400 |
| 31 | Construction of Cement Road From H/o Ramesh Nimje to H/o Paunikar Behind Prakash Pan Mandir at Majanpura in Pr. No. 20 | 822764 | 8300 |
| 32 | Various Civil Work of Lokshahir Annabhau Sathe Sanskrutik Sabhagruha at Lendi Talav in Pr. No.20 | 837070 | 8400 |
| 33 | Providing And Laying C.C. Flooring Near Amol Sawarkar Jaswant Lal Chowk Thakre wada at Pr. No. 21 | 818645 | 8200 |
| 34 | Beautification Work At Sudarshan Colony Gangabai Ghat in Pr. No. 22 | 832680 | 840 |
| 35 | Providing and Laying Sewer Line from H/o Bonde to H/o Mahajan at Mahajapura in Pr. No. 20 | 820842 | 8300 |
| 36 | Repairing of Chamber from Maskasath Bridge to Raut Chowk at Various Places in Pr. No. 20 | 832042 | 8400 |
| 37 | Providing and Laying Sewer Line and Construction of R.C.C. Chamber and Drain Line at Lendi Talav in Pr. No. 20 | 829782 | 8300 |
| 38 | Providing and Laying C.C. Flooring Infront of NMC Tandapeth School and Near H/o Dyaneshwar Barapatre at Panchpaoli in Pr. No. 20 | 823255 | 8300 |
| 39 | Construction Of Nallah Slab Behind H/o Somaji Dhakate at Kumbharpura Panchpavli in Pr. No. 20 | 832764 | 8400 |
| 40 | Providing and Laying Sewer Line at Ansar Nagar in Pr. No. 08 | 821866 | 8300 |
| 41 | Providing and Laying Sewer Line Near H/o Shri. Bapu Chikhale at Gadikhana in Pr. No. 18 | 811998 | 8200 |
| 42 | Providing and Laying Sewer Line and Construction of R.C.C. Chamber and Drain Line at Various Places in Shivaji Nagar in Pr. No. 18 | 829876 | 8300 |
| 43 | Asphalting Of road at Gandhi Chowk Ganjipeth and Bhaldarpura in Pr. No. 19 | 833418 | 8400 |
| 44 | Providing And Fixing GI Ring and Destiling the Public well Near H/o Bhaiyalal Shahu at Bangaladesh Naik Talao in Pr. No. 20 | 821733 | 8300 |
| 45 | Providing and Laying Sewer Line From H/o Aditya Padole to H/o Pritam Lal Mahurkar at Naikwadi Bangladesh in Pr. No. 20 | 821893 | 8300 |
| 46 | Providing and Laying Sewer Line and C.C. Flooring and Construction of RCC Chamber at Various Places in Pr. No. 19 | 819313 | 8200 |
| 47 | Providing and Laying CC Flooring Near H/o Durichand Bagde at Naikwadi Bangladesh in Pr. No.20 | 822329 | 8300 |
| 48 | Providing and Laying C.C. Flooring Near H/o Shabir Asharafi and Near Govt. Toilet and Near Mata Mandir at Boriyapura in Pr. No. 08 | 818872 | 8300 |
| 49 | Providing and Laying sewer Line and C.C. Flooring and From H/o Ekram Kureshi to Ansar Masjid at Ansar Nagar in Pr. No. 08 | 818796 | 8200 |
| 50 | Providing and Laying C.C. Flooring and Sewer Line Near Murtuja Garaj and Providing and Laying C.C. Flooring Near Jumman Kaptan at Ansar Nagar in Pr. No. 08 | 831873 | 8400 |
| 51 | Providing and Laying C.C. Flooring Behind H/o Ismile Leader at Beda Damdar Area and Near H/o Nuashad Pir Mohmmad at Dobinagar in Pr. No. 08 | 819506 | 8200 |
| 52 | Providing and Laying C.C. Flooring Near H/o Gulam Sabari and Construction of Chamber and Providing and Laying Sewer Line Near Farhin Hotel and Providing and Laying C.C. Flooring Near Sayyad Masjid Area in Pr. No. 08 | 819220 | 8200 |
| 53 | Construction of Cement Road From H/o Haji Ayub to Nurani Masjid Near Lal Building Ansar Nagar in Pr. No. 08 | 819420 | 8200 |
| 54 | Construction of Cement Road From Abbu Miya Masjid to Ajij Dallar in Prabhag No. 08 | 818931 | 8200 |
| 55 | Construction of Cement Road Near H/o Shabir and Near Mata Mandir at Boriyapura In Pr. No. 08 | 818874 | 8200 |
| 56 | Providing and Laying C.C. Flooring From Islmile Leader to H/o Pirubhai at Dobinagar in Pr. No. 08 | 819453 | 8200 |
| 57 | Providing and Laying C.C. Flooring From Islmile Leader to H/o Pirubhai at Dobinagar in Pr. No. 08 | 819465 | 8200 |
| 58 | Construction of Cement Road Near Tavkkal Building and Near H/o Rahman Haji at Dobi Nagar Ansar Nagar in Pr. No. 08 | 818840 | 8200 |
| 59 | Providing and Laying Sewer Line and Cement Road Near H/o Takiya Divanshaha at Kala Zenda Mominpura in Pr. No. 08 | 830303 | 8400 |
| 60 | Providing and Laying Sewer Line and Cement Road Near H/o Takiya Divanshaha at Kala Zenda Mominpura in Pr. No. 08 | 831234 | 8400 |
| 61 | Providing and Laying Sewer Line and Construction of Cement Road Behind Bangali Panja Railway Crossing at Mulsimpura in Pr. No. 20 | 818872 | 8200 |
| 62 | Providing and Laying Sewer Line From H/o Kamil Ansari to Jamil Rashan Shop at Timki in Pr. No. 08 | 705840 | 8000 |
| 63 | Providing and Laying Sewer Line from H/o Jalil Chouhdary to Barakmandi Gate at Saifinagar Mominpura Nagpur in Pr. No. 08 | 829876 | 8300 |
| 64 | Providing and Laying Sewer Line from Musa Gadiwala to Bombay Chicken Center at Mominpura Nagpur in Pr. No. 08 | 830571 | 8400 |
| 65 | Pro. and Laying Sewer Line from Ramjan Bakrawale to Barishriyat Masjid Kasiwali Galli Saifinagar at Mominpura Nagpur in Pr. No. 08 | 830523 | 8400 |
| 66 | Providing and Laying Sewer Line from Ice-cream Wala to Dombinagar Premises at Mominpura Nagpur in Pr. No. 08 | 830286 | 8400 |
| 67 | Providing and Laying Sewer Line from Altaf Almari To Tulja Mata Mandir at Mominpura Nagpur in Pr. No. 08 | 829876 | 8300 |

**Note : (1)** Cost of Blank Tender form each Rs. 590/- **(2)** Tender sale & submission start date : 07/10/2024 **(3)** Tender submission and date/sales end date 14/10/2024. up to 5.00 pm **(4)** Date of opening of Tender (if possible) 15/10/2024 up to 5.00 pm **(5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document.

**Executive Engineer (DPDC),**
**N.M.C., Nagpur**

**Advt No : 608/PR, Dt : 05/10/2024**

# अजितदादांची परीक्षा

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

राज्यातील विधानसभा निवडणूक नोव्हेंबरमध्ये दिवाळीनंतर होणार याचे संकेत केंद्रीय निवडणूक आयोगाने आपल्या मुंबई भेटीत दिले. कोणत्याही परिस्थितीत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणीस व अजित पवार यांना आपले सरकार निवडणुकीनंतर आणायचे आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला जो जबर फटका बसला त्यातून शिंदे, फडणवीस व अजित पवारांना बरेच शिकायला मिळाले. राज्यात सर्वाधिक आमदारांचा पक्ष म्हणून भाजपाला आपला नंबर १ टिकवायचा आहे. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाचे १०६ आमदार विजयी झाले होते, आता भाजपाने आपले टार्गेट १२५ ठेवले आहे.

-----------------

भाजपाला १६० जागा लढवायच्या आहेत, पण एकनाथ शिंदे व अजित पवार तसेच मित्रपक्षांना जागा देऊन ते शक्य होईल का? विधानसभेत २८८ जागा आहेत. जागांचे वाटप करताना महायुतीला मोठी कसरत करावी लागत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिंदे आणि फडणवीस यांनी अजित पवार यांना कमी महत्त्व द्यायला सुरुवात केली. अजित पवार यांना महायुतीत घेतल्यामुळे भाजपाचे लोकसभा निवडणुकीत नुकसान झाले असे फडणवीस यांनी सांगून थेट अजितदादांवर शरसंधान केले. पण त्याला अजितदादांनी उत्तर दिलेले नाही आणि दिले तर निवडणुकीच्या तोंडावर ठिणग्या उडतील याची त्यांनाही जाणीव आहे. अजितदादांचा पक्ष ऐंशी जागा लढविण्याची भाषा करीत असला तरी प्रत्यक्षात किती जागा मिळणार व किती निवडून येणार, त्यावर त्यांचे व त्यांच्या पक्षाचे भविष्य अवलंबून आहे.

लोकसभा निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेची मते भाजपाकडे वळली पण अजितदादांच्या पक्षाची मते भाजपाला मिळाली नाहीत, असे सरकारमधील उच्चपदस्थच उघडपणे सांगत असतील, तर महायुतीत सर्वकाही अलबेल नाही, हाच संदेश त्यातून जातो. अजित पवारांना महायुतीत घेणे सहज झालेले नाही, अशी कबुली भाजपा नेते देत आहेत.

अगोदर संघाचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझर व विवेक या नियतकालिकांनी अजित पवारांना बरोबर घेतले नसते. तर भाजपाचे लोकसभेत नुकसान झाले नसते अशी टीका केली होती, आता सरकारमधील मंत्रीच तसे उघड बोलू लागले आहेत.

पंतप्रधानांच्या राज्यात दीड डझन सभा होऊनही लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ४८ पैकी केवळ १७ जागांवर महायुतीला विजय मिळाला. त्यात भाजपाचे नऊ, शिवसेना शिंदे गटाचे सात व अजितदादांच्या राष्ट्रवादीचे सुनील तटकरे हे एकमेव खासदार म्हणून निवडून आले.

अजितदादांच्या पक्षात संभ्रम असून विधानसभा निवडणुकीनंतर आपले काय होणार याची अनेकांना धास्ती वाटू लागली आहे, त्यामुळेच शरद पवारांकडे दादांचे बरेच सहकारी हात जोडून जाताना दिसत आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यानंतर अजित पवार हे भाजपाला नकोसे झालेत का, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली.



अजितदादांना महायुतीत घेताना आपल्याला राजकीय लाभ मिळेल, अशी भाजपाची अपेक्षा होती.

खरे तर एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्या पक्षातून शिवसेनेचे ४० आमदार व दहा अपक्ष समर्थक आमदार घेऊन भाजपासोबत आले. भाजपा-शिवसेना शिंदे गटाचे विधानसभेत चांगले बहुमत झाले. मग अजितदादांची भाजपाला गरज का भासावी, या प्रश्नाचा भुंगा भाजपामधील अनेकांना विशेषतः संघ परिवाराला गेले वर्षभर सतावत आहे.

जुलै २०२३ मध्ये अजित पवारांनी त्यांचे काका शरद पवार यांच्याविरोधात बंडाचा झेंडा फडकावून भाजपाबरोबर सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते की, अजित पवार हे योग्य ठिकाणी आले आहेत, पण इथे येण्यास त्यांनी बराच वेळ घेतला.

पंतप्रधानांनी तर सत्तर हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा उघडपणे आरोप केला आणि आठवडाभरातच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडाचा झेंडा फडकला. अजित पवारांमुळे भाजपाचे लोकसभेच्या निवडणुकीत नुकसान झाले, असा साक्षात्कार पक्षातील अनेकांना होऊ लागला आहे.

मग विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजितदादांना महायुतीतून बाहेर काढणार का? तसे झाले तर शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडण्यासाठी भाजपाने अजितदादांचा उपयोग करून घेतला असा सर्वत्र संदेश जाईल.

दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व प्रवक्ते सांगत आहेत की, लोकसभा निवडणुकीत भाजपाने आमचा प्रचार केला नाही. दादांच्या पक्षाचे लोकसभेतील एकमेव खासदार सुनील तटकरे यांनी म्हटले आहे की, आमची पुरोगामी भूमिका कायम आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांना मानणारे आम्ही आहोत. धर्मनिरपेक्ष विचाराशी आम्ही तडजोड करणार नाही. भाजपाशी आम्ही केलेली युती ही विकासासाठी आहे

. नागपूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात शिंदे व फडणीस हे दोघे गेले होते, तेव्हाही अजित पवार कुठे आहेत, अशी चर्चा झाली होती. आमच्या फायली अर्थखाते परत पाठवते, अशा तक्रारी शिंदे गटाचे आमदार करीत आहेतच.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विदर्भातील संस्थेला ५ हेक्टर जमीन देण्यास अजितदादांच्या अर्थ खात्याने विरोध केला होता. अशी जमीन देताना जे निकष असतात, ते ती संस्था पुरे करीत नाही असा अभिप्राय त्या फाईलवर नोंदवला होता. पण मंत्रिमंडळाच्या बैठकीत बावनकुळे यांच्या संस्थेला सवलतीच्या दराने जमीन देण्याचा निर्णय झाला.

लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवारांनी त्यांच्या पत्नी सुनेत्रा यांना उभे केले होते. राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी, पवार विरुद्ध पवार, बहीण विरुद्ध पत्नी, काका विरुद्ध पुतण्या, असा तो संघर्ष होता.

तसे करण्यामागे अजितदादांचा काय हेतू होता? कोणाच्या सल्ल्यावरून त्यांनी पत्नीला बारामतीत उभे केले? त्यातून त्यांना काय साध्य झाले? सुप्रिया सुळे या लोकप्रिय असून बारामतीमधील जनता शरद पवारांच्या पाठीशी उभी आहे, हाच निकालाचा अर्थ होता.

पवार घराण्यात कटुता मात्र वाढली. नंतर आपली चूक झाली असे अजितदादांना वाटले व त्यांनी तसे बोलून दाखवले. अजित पवारांना परत घेणार का, असे जेव्हा पत्रकार शरद पवारांना विचारतात तेव्हा, आम्ही घरात सर्व एकत्र आहोत, असे मोजक्या शब्दात ते उत्तर देतात. अजित पवारही म्हणतात, ते आमचे मोठे काका आहेत, त्यांच्या डोळ्यांत डोळा घालून आपण बोलू शकत नाही.

भाजपाच्या केंद्रीय नेत्याने शरद पवारांचा उल्लेख भ्रष्टाचाराचे सरदार असा केला तेव्हा अजितदादांनी त्यासंबंधी नाराजी व्यक्त केली. अजितदादा महायुतीत रमले नाहीत का? त्यांच्या मनाची अजून घालमेल होत आहे का? ते बळेबळेच आपल्या काकांना निवडणुकीच्या राजकारणात विरोध करीत आहे का? एकनाथ शिंदे यांचे सहकारी व आरोग्यमंत्री तानाजी सावंत म्हणाले, मी कट्टर शिवसैनिक आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसशी कधी जमले नाही. आज मंत्रिमंडळात त्यांच्या मांडीला मांडी लावून बसलो असलो तरी बाहेर आल्यावर उलट्या होतात. हे सहन होत नाहीङ्क असे भाजपाचे प्रवक्ते म्हणतात, अजित पवारांबरोबर झालेली युती दुर्दैवी आहे. आम्हाला पटली नाही. असंगाशी संग महाराष्ट्रात ठाकरेंची शिवसेना व पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस कमकुवत केल्याशिवाय आपला पक्ष वाढणार नाही, असे भाजपाचे गणित होते. विरोधकांना दुर्बल केल्याशिवाय आपण सबल होणार नाही, हे दोन्ही पक्ष फोडण्यामागचे सूत्र होते.

एकनाथ शिंदे हा मराठा नेता असतानाही अजित पवारांसारखा दुसरा मराठा नेता भाजपाने मिळवला. पण त्याचा लोकसभेत लाभ झाला नाही. शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देऊन भाजपाने रिमोट आपल्या हातात ठेवलाय. जे मोदी-शहांना पाहिजे ते महाराष्ट्रात घडते.

अडीच वर्षांत शिंदेंनी मोदी-शहांचा मोठा विश्वास प्राप्त केला. तुलनेने अजितदादा मागे पडले. त्यांच्या पक्षाचे सर्वेसर्वा तेच आहेत. आजवर ते कधी काकांशिवाय कोणापुढे झुकलेले नाहीत. दिल्लीपुढे झुकण्याची त्यांना सवय नाही आणि त्यांचा स्वभावही नाही.

एकनाथ शिंदे हे हिंदुत्वाचे कारण सांगत भाजपासोबत आले पण अजित पवार हे विकासाचा मुद्दा पुढे करून महायुतीत आले. ठाकरेंच्या शिवसेनेत उद्धवनंतर आदित्य नंबर २ आहे व पवारांच्या राष्ट्रवादीत साहेबांनंतर सुप्रिया नंबर २ आहे, हे एकनाथ व अजितदादांना कळून चुकले. शिंदे मुख्यमंत्री झाले पण पाच वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेल्या अजितदादांची गाडी पुढे सरकत नाही.

अजितदादांच्या सभांमध्ये लाडकी बहीण योजनेच्या फलकावरून मुख्यमंत्री हा शब्द गायब असतो. गुलाबी जाकीट व डोक्यावर टोपी घालून लोकांच्या गर्दीत मिसळणारा बिनधास्त नेता अशी दादांची प्रतिमा आहे.

मालवणला राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यावर महाराष्ट्रातील जनतेची माफी मागणारा हा पहिला नेता आहे. आपला पक्ष टिकवायचाय, वाढवायचाय हे मोठे आव्हान आहे. शिंदे व फडणवीसांची साथ मिळण्याची शक्यता कमी आहे.

एका टर्ममध्ये फडणवीस, ठाकरे व शिंदे अशा तीन मुख्यमंत्र्यांसोबत तीन वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, हा विक्रम आहे. पहाटेचा शपथविधी महाराष्ट्र विसरलेला नाही. काकांविरोधात बंडाचा बिगूल वाजविल्यावर अजितदादांनी स्वतःचा पक्ष वेगळा काढला नाही, त्यांचा पक्ष, त्यांचे निवडणूक चिन्ह काबीज केले. भाजपाचे राजकीय संरक्षण असल्याने ते सर्व साध्य झाले, आता मात्र येणारी विधानसभा निवडणूक ही अजितदादांची मोठी परीक्षा आहे.

●●●●●●●●

# अभिजात मराठी...

संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी घटस्थापनेच्या दिवशी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला. ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते.

हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले यासाठी केंद्र सरकारचे मनापासून आभार मानावे लागेल त्यासोबतच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणाऱ्या हजारो ज्ञात - अज्ञात व्यक्तींनाही सलाम करावा लागेल. केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.

याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातही पैज जिंकणारी मराठी भाषा अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता.

मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सोपवून नऊ वर्ष झाली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी भाषा समिती स्थापन झाली होती.

प्रा रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा. हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. समितीने मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली, तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती.

आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे.

भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते

*लाभले भाग्य आम्हास...*
*बोलतो मराठी....*

-----------------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

●●●●●●●●

# मराठीचे संवर्धन करणे आपलीच जबाबदारी!

जगभरातील मराठी जनांना गेल्या अनेक दशकांपासून ज्याची प्रतीक्षा होती तो दिवस अखेर उजाडला. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे ३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. ते आता मराठी भाषा संवर्धनासाठी मिळणार आहे.

भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ आणि साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी सरकारकडून आर्थिक पाठबळ दिले जाईल. अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात आता मराठी विद्वानांनाही हे पुरस्कार मिळतील. मराठीसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिजची स्थापना केली जाईल. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये आता मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था केली जाईल. मराठीतील प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाईल. असे बरेच लाभ मराठी भाषेला आता मिळतील.

आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारततही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे.

२१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला; मात्र तिचे संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारी आपलीच आहे याचा विसर पडता कामा नये. आजमितीला मराठी भाषेची स्थिती पाहिल्यास दहापैकी ३ जणांना तरी शुद्ध मराठीत दहा ओळी म्हणता येतील का? हा प्रश्न आहे.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज निर्माण झाल्यामुळे इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते.

मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत,

असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी.

आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा.

दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे. केवळ अभिजात दर्जा मिळालेला म्हणून मराठीला लागलेली अवकळा थांबणार नाही.

-----------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई. ९६६४५५९७८०**

●●●●●●●●

# देवीची विविध रूपे आणि उपासना!

**देवीचे गायत्री मंत्र**

१. सरस्वती गायत्री मंत्र
ॐ वाग्देव्यैच विद्महे ।
विरिंचिपत्न्यैच धीमहि ।
तन्नो सरस्वती प्रचोदयात् ॥
अर्थ : आम्ही वाग्देवीला (सरस्वतीदेवीला) जाणतो. आम्ही सरस्वतीचे ध्यान करतो. ती सरस्वती आमच्या बुद्धीला सत्प्रेरणा देवो.


२. ब्रह्माणी गायत्री मंत्र
ॐ देव्यै ब्रह्मण्यै विद्महे ।
महाशक्त्यै च धीमहि ।
तन्नो देवी प्रचोदयात् ॥
अर्थ : आम्ही ब्रह्माणीदेवीला जाणतो. (त्या) महाशक्तीचे आम्ही ध्यान करतो. ब्रह्माणी आमच्या बुद्धीला सत्प्रेरणा देवो.

३. लक्ष्मी गायत्री मंत्र
ॐ महालक्ष्मीच विद्महे ।
विष्णुपत्नीच धीमहि ।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥
अर्थ : आम्ही महालक्ष्मीला जाणतो आणि विष्णुपत्नीचे (महालक्ष्मीचे) ध्यान करतो. ती लक्ष्मी आमच्या बुद्धीला सत्प्रेरणा देवो.

४. दुर्गा गायत्री मंत्र
ॐ गिरिजायै विद्महे ।
शिवप्रियायै धीमहि ।
तन्नो दुर्गीः प्रचोदयात् ॥
अर्थ : आम्ही गिरीजेला जाणतो आणि शिवप्रियेचे (दुर्गादेवीचे) ध्यान करतो. ती दुर्गा आमच्या बुद्धीला सत्प्रेरणा देवो.

५. सीता गायत्री मंत्र
ॐ जनकात्मजायै विद्महे ।
भूमिपुत्र्यैच धीमहि ।
तन्नो जानकी प्रचोदयात।
अर्थ : आम्ही जनककन्या सीतेला जाणतो. आम्ही भूमीपुत्री सीतेचे ध्यान करतो. ती जानकी आमच्या बुद्धीला सत्प्रेरणा देवो.

६. राधा गायत्री मंत्र
ॐ वृषभानुजायै विद्महे ।
कृष्णप्रियायै धीमहि ।
तन्नो राधाः प्रचोदयात् ॥



अर्थ : आम्ही वृषभानूची कन्या (राधाराणीला) जाणतो आणि कृष्णप्रियेचे (राधेचे) ध्यान करतो. ती राधा आमच्या बुद्धीला सत्प्रेरणा देवो.

देवीशी संबंधित बीजमंत्र : ऐं हे सरस्वतीबीज आहे, क्रीं आणि क्लीं ही कालीबीजे आहेत, दूं हे दुर्गाबीज, श्रीं हे लक्ष्मीबीज आणि स्त्रीं हे धूम्रभैरवीबीज आहे. अशाप्रकारे विविध बीजमंत्र विविध देवींशी संबंधित आहेत.

**देवीचे प्रचलित नामजप :**
ॐ श्री दुगार्देव्यै नमः ।,
ॐ श्री महालक्ष्मीदेव्यै नमः । आणि ॐ श्री सरस्वतीदेव्यै नमः । हे देवींचे नामजप प्रचलित आहेत.

**देवी यंत्र :** देवीतत्त्व आकृष्ट करून त्यांचे प्रक्षेपण करणारी अनेक यंत्रे उपलब्ध आहेत. यांतील बरीच यंत्रे आद्य शंकराचार्य यांनी सिद्ध केलेली आहेत. नवार्णयंत्र, श्रीयंत्र, श्री महालक्ष्मी यंत्र, श्री सरस्वती यंत्र आणि श्री बगलामुखी यंत्र ही देवीशी संबंधित असणारी काही प्रमुख यंत्रांची नावे आहेत.

**देवीशी संबंधित यज्ञ :** चंडीयाग, शतचंडी, नवचंडी, सहस्त्रचंडी, गायत्रीयाग, सरस्वतीयाग, राजमातंगीयाग, बगलामुखीयाग इत्यादी यज्ञ हे देवीशी संबंधित आहेत.

**देवी आणि संबंधित दिशा**
ऐंद्रि-पूर्व, वारुणी-पश्चिम, कौबेरी-उत्तर, वाराही-दक्षिण, अग्नीशक्ती-आग्नेय, मृगवाहिनी-वायव्य, खड्धारिणी-नैऋत्य, शूलधारिणी-ईशान्य, ब्राम्ही-उर्ध्व(वरची), वैष्णवी-अधस् (खालची), चामुंडा-सर्वदिशा.

देवीचे वाहन : देवी कायार्नुसार विविध पशु आणि पक्षी यांचा वाहनाच्या रूपाने वापर करते.

चंद्रघंटा, स्कंदमाता, कात्यायनी, सिंहवाहिनी, या देवींचे वाहन शार्दूल (सिंह) आहे.

शैलपुत्री, महागौरी, रिद्राणी, माहेश्वरी, ईश्वरी यांचे वाहन वृषभ(बैल) आहे.

कूष्मांडा, शेरावाली, दुर्गा, कालिका यांचे वाहन व्याघ्र (वाघ) आहे.

कालरात्रीचे वाहन गाढव, चामुंडा देवीचे वाहन कधी सिंह तर कधी प्रेत असे असतात.

वाराही देवीचे वाहन रेडा,
ऐंद्री देवीचे ऐरावत(हत्ती),
ब्राम्हीचे वाहन राजहंस,
वैष्णवी देवीचे वाहन गरुड,
कौमारी देवीचे वाहन मोर,
राजमातंगी देवीचे वाहन पोपट असे अन्यही देवीं ची कार्यानुरुप वाहने आहे.

अशा प्रकारे देवीची उपासना भावपूर्ण करुन तिची कृपा संपादन करु.

-----------------

**श्रीमती विभा चौधरी**
**917620831487**
**संदर्भ ग्रंथ : शक्ती' सनातन संस्था**

●●●●●●●●

# नवरात्रीचा उपास करताय? लक्ष द्या!

शारदीय नवरात्रोत्सव सुरू झाला आहे. या सणाच्या ९ दिवसांमध्ये दुर्गेच्या विविध रूपांची पूजा केली जाते. हिंदू धर्मात या सणाला विशेष महत्त्व आहे.

या सणादरम्यान मोठ्या संख्येने भक्त भाविक उपास करतात. उपास करणं हे फक्त धार्मिक नव्हे तर ते तब्येतीसाठी देखील खूप फायदेशीर असतं. मात्र कोणताही उपास करताना काळजी घेणंही तितकंच महत्वाचं असतं.

या काळात थोडाही निष्काळजीपणा केला तर तुमचे आरोग्य बिघडू शकते. अशा परिस्थितीत नवरात्रीच्या काळात उपास करण्याची योग्य पद्धत जाणून घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे. नवरात्रीमध्ये उपास कसा करावा, त्यामुळे आरोग्य चांगले राहावे, यासाठी तज्ज्ञ काय सांगतात ते जाणून घेऊया.

**हायड्रेटेड रहा :** पुरेशा प्रमाणात पाणी पिणे फार महत्वाचे आहे. नवरात्रीत उपास करताना भरपूर पाणी प्या. यामुळे शरीराचे निर्जलीकरण होणार नाही. किमान २ ते ३ लिटर पाणी प्या. शरीर हायड्रेटेड राहिल्यास, इलेक्ट्रोलाइट शिल्लक राहते.

**तेलकट खाणं टाळा :** उपास करताना लोक अनेकदा तळलेले अन्न, पदार्थ खातात. पण तेलकट गोष्टीमुळे नुकसान होऊ शकते. यामुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. विशेषतः ज्यांना मधुमेह किंवा कोलेस्ट्रॉलची समस्या आहे त्यांनी तेलकट पदार्थ किंवा स्नॅक्स खाऊ नयेत. त्याऐवजी फळे किंवा रताळे यांसारखे पदार्थ खावेत.



**जास्त वेळ पोट रिकामं ठेवू नका :** काही लोक उपास करताना दीर्घकाळ काहीही खात किंवा पीत नाहीत. परंतु तज्ञांचे म्हणणे आहे की तुम्ही ते नियम पाळावेत जे पाहिजेत जे तुम्ही पूर्णपणे पाळू शकता.

जास्त वेळ रिकाम्या पोटी राहिल्याने समस्या निर्माण होऊ शकतात. दर २ ते ३ तासांनी काहीतरी खात राहा.उपाशी राहिल्याने लागल्याने ॲसिडिटी किंवा डोकेदुखी सारख्या समस्या उद्भवू शकतात. यामुळे थकवाही लवकर येतो.

**हे पदार्थ खा :** जर तुम्ही ९ दिवस उपास करत असाल तर प्रोटीनयुक्त पदार्थ नक्की खा. तुमच्या आहारात चीज, दही, दूध आणि बदाम यासारख्या पदार्थांचा समावेश करा. या पदार्थांमधून तुम्हाला भरपूर ऊर्जा मिळेल कारण त्या पचायला थोडा वेळ लागतो, यामुळे तुमचे पोट बराच काळ भरलेले राहते.

**या लोकांनी करू नये उपास :**

ज्यांना मधुमेह, रक्तदाब, क्षयरोग, कर्करोग किंवा इतर कोणताही गंभीर आजार आहे त्यांनी सलग ९ दिवस उपास करू नये, असे न्यूट्रिशनिस्ट सांगतात. गर्भवती महिलांनी देखील ९ दिवस उपास करू नये. अशा लोकांना एक-दोन दिवस उपास करायचा असेल तर प्रथम आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

●●●●●●●●

## अशोकायन

### स्वच्छता दुताचे मनोगत

**आपण करावी घाण**
**दुसऱ्यांनी ती निस्तरावी**
**अशा प्रकृतीचे लोक**
**उच्चशिक्षीत असले तरी**
**सुसंस्कृत निश्चित नाही ..!**

**पर्यटनस्थळे उद्यान**
**कार्यालयात**
**ठेवलेले असती डस्टबिन**
**त्यातच निरुपयोगी वस्तू**
**टाकणे ही आपलीच**
**सामाजिक जवाबदारी -**
**आहे की नाही ? ..**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने महिनाभर चालणारा मोफत पोस्ट-कोविड रिकव्हरी कॅम्प सुरू

**नागपूर, ५ ऑक्टोबर :** कोविड नंतरच्या आरोग्याबद्दलच्या वाढत्या समस्या पाहता, १०२० बेड्सची सुविधा असलेल्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने, ऑक्टोबर २०२४ मध्ये एक महिनाभर चालणारा मोफत फॉलो-अशिबिर आयोजित केला आहे. कोविड दरम्यान शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मध्ये दाखल झालेल्या आणि सध्या कोविड नंतरच्या आरोग्य समस्यांचा, विशेषतः श्वसनाच्या समस्यांचा सामना करावा लागत असलेल्या रूग्णांना बरे होण्यास मदत करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. लोकांच्या आरोग्याच्या समस्या दूर करण्याच्या प्रयत्नात, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने नुकतेच एक मोफत समुपदेशन शिबिराचे आयोजन केले होते, ज्यामध्ये अमेरिकेतील क्लीव्हलँड येथील प्रसिद्ध पल्मोनोलॉजिस्ट डॉ. अखिल बिंद्रा यांनी लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणि आरोग्याशी संबंधित भीती दूर करण्यासाठी व्याख्यान दिले होते.

डॉ. सुमेर चौधरी म्हणाले, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे कोविड-१९ नंतर उपचारासाठी आलेल्या सर्व रूग्णांना आवश्यक ती काळजी आणि देखरेख मिळावी याची खात्री करणे हा या शिबिराचा उद्देश आहे, कारण कोविड नंतर आरोग्यावर अनेक परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. या सेवा मोफत देऊन, आम्ही अशा रूग्णांपर्यंत पोहोचण्याची आशा करतो ज्यांना विशेष काळजी किंवा फॉलो-अप उपचार मिळत नाही. आम्ही गरजू लोकांना मोफत स्पायरोमीटर देखील देत आहोत, ज्यामुळे त्यांना घरी त्यांची फिजिओथेरपी सुरू ठेवण्यास मदत होईल..

डॉ. नरेश गिल, डेप्युटी डायरेक्टर, कम्युनिटी सर्व्हिसेस म्हणाले की, हा उपक्रम कोविड-१९ मधून वाचलेल्यां लोकांच्या आरोग्य आणि दीर्घकालीन कल्याणासाठी शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या व्यापक बांधिलकीचा एक भाग आहे.

डॉ. अनुप मरार, डायरेक्टर, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर पुढे म्हणाले, हे मोफत फॉलो-अप शिबिर कोविड-१९ मध्ये वाचलेल्या लोकांच्या एकंदरीत काळजीसाठी आमच्या हॉस्पिटलचे समर्पण प्रतिबिंबित करते. त्यांच्या पूर्ण रिकव्हरीसाठी आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी आवश्यक साधने आणि वैद्यकीय उपचार देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

उपचार प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि प्रतीक्षा वेळ कमी करण्यासाठी रुग्णांना पूर्व-नोंदणी करण्यास प्रोत्साहित केले जाते. हॉस्पिटलजवळ राहणाऱ्या रुग्णांनाही प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर सामावून घेतले जाईल. हे शिबिर ऑक्टोबर महिन्यात नियमित ओपीडीच्या वेळेत रोज चालेल, ज्यामध्ये दररोज जास्तीत जास्त ५० रुग्णांना सेवा दिली जाईल. रुग्णाची वैद्यकीय स्थिती लक्षात घेऊन फॉलो-अप अपॉइंटमेंट्स शेड्यूल केल्या जातील. शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर सर्व पात्र रूग्णांना या मोफत सेवेचा लाभ घेण्यासाठी आणि कोविड नंतर पूर्ण रिकव्हरी सुनिश्चित करण्यासाठी रेस्पिरेटरी मेडिसिन विभागासोबत काम करण्याचे आवाहन करते.

श्री चैतन्य मेघे, श्री शिवम गुप्ता आणि कु. भाग्यश्री यांच्या नेतृत्वाखालील जागरूकता आणि समुदाय विभाग, हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ.वसंत गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहे.

# आयडीएफसी फर्स्ट बँक सीमलेस कर पेमेंटसाठी जीएसटी पोर्टलवर लाइव्ह

**नागपूर, ५ ऑक्टोबर :** आयडीएफसी फर्स्ट बँकेला वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) पोर्टलसह त्यांचे एकत्रीकरण जाहीर करताना आनंद होत आहे, ज्यामुळे सीमलेस जीएसटी पेमेंट करता येईल. त्वरित पेमेंट पुष्टीकरण आणि डाउनलोड करण्यायोग्य चालानमध्ये सुलभ प्रवेशासह, ग्राहकांना आता सहज, त्रास-मुक्तपेमेंट अनुभवाचा फायदा होईल.

हे नवीन एकत्रीकरण आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या ग्राहकांना बँकेच्या वापरकर्त्यासाठी अनुकूल रिटेल आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्म आणि त्याच्या देशव्यापी शाखा नेटवर्कसह विविध डिजिटल माध्यमांद्वारे जीएसटी भरण्याची परवानगी देते.

आयडीएफसी फर्स्ट बँक, रिटेल लायबिलिटीज आणि शाखा बँकिंग प्रमुख चिन्मय ढोबळे म्हणाले, ग्राहक-प्रथम बँक म्हणून, आम्ही आमच्या ग्राहकांना अखंड, वापरण्यास-सुलभ समाधान प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जीएसटी पोर्टलसह हे एकत्रीकरण हे युनिव्हर्सल बँकिंग सोल्यूशन्स प्रदान करण्याच्या आमच्या ध्येयातील आणखी एक पाऊल आहे. जलद, सोपा आणि कार्यक्षम कर भरणा अनुभव सुनिश्चित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आम्ही आमच्या ग्राहकांना आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या ऑनलाइन आणि शाखा चॅनेलद्वारे त्यांचा जीएसटी सहजतेने भरण्यासाठी या सुविधेचा वापर करण्यास प्रोत्साहित करतो.

आयडीएफसी फर्स्ट बँक ही जीएसटी संकलनासाठी अधिकृत केलेल्या निवडक शेड्यूल्ड खाजगी क्षेत्रातील बँकांपैकी एक आहे, जी त्यांच्या ग्राहकांना सर्वसमावेशक वित्तीय सेवा प्रदान करण्याच्या बँकेच्या वचनबद्धता दर्शवते.

आयडीएफसी फर्स्ट बँक इंटरनेट बँकिंग वापरून जीएसटी भरण्याचे टप्पे:

१. जीएसटी पोर्टलवर लॉग इन करा: https://services.gst.gov.in/services/login

२. चलन तयार करा आणि नेट बँकिंगद्वारे ई-पेमेंनिवडा.

३. पेमेंट पर्याय म्हणून IDFC FIRST बँक निवडा.

४. पेमेंट पूर्ण करा आणि जीएसटी भरलेले चलन डाउनलोड करा.

याव्यतिरिक्त, आयडीएफसी फर्स्ट बँक UPI आणि कार्ड पेमेंटसह आणखी पेमेंट पर्याय सादर करण्यासाठी जीएसटी अधिकाऱ्यांसोबत काम करत आहे.

# ओला इलेक्ट्रिक ने सर्वात मोठा बॉस सेल केला लॉंच

**नागपूर ५ ऑक्टोबर :** भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी, ओला इलेक्ट्रिक, सर्वात मोठा ओला सीझन सेल, बॉस लॉंच करत आहे. या सेलमध्ये एस १ पोर्टफोलिओ फक्त ४९,९९९ रुपयांना उपलब्ध आहे. ३७,००० रुपयांपर्यंतचे अनन्य डील आणि हायपरचार्जिंग क्रेडिट्स, मूव्हओएस+ अपग्रेड, क्सेसरीज आणि केअर+ वरील विशेष डील यासह अनेक आकर्षक ऑफर आहेत. ओला च्या बॉस सेल मध्ये ओला एस१ एक्स २ केडब्लूएच ची किंमत रु. ४९,९९९ पासून सुरू होते (मर्यादित स्टॉकसाठी). एस १ पोर्टफोलिओवर रु. २५,००० पर्यंत, एस१ एक्स २ केडब्लूएच वर सपाट रु. २५,००० आणि एस १ पोर्टफोलिओवर रु. १२,००० पर्यंत सूट मिळणार आहे. तसेच ७,००० रुपयांची मोफत ८ वर्षे/८०,००० किमी बॅटरीची वॉरंटी मिळेल. ००० रुपयांचे मोफत मूव्हओएस+ अपग्रेड, आणि ७,००० रुपयांचे मोफत हायपरचार्जिंग क्रेडिट मिळेल. तसेच या बॉस मध्ये ओला निवडक क्रेडिट कार्ड इएमआय वर ५,००० रुपयांपर्यंत फायनान्स ऑफर करत आहे.

ओला इलेक्ट्रिकचे अध्यक्ष आणि एमडी भावीश अग्रवाल म्हणाले, आम्ही बॉस मध्ये या उत्कृष्ट सणाच्या ऑफर्स सादर करण्यास उत्सुक आहोत. या ऑफरसह ईव्ही खरेदी करण्यासाठी ही चांगली वेळ आहे. बॉस ही आमची आतापर्यंतची सर्वात मोठी सण विक्री आहे, आमच्या एण्डआयसीइएज मिशनला पुढे नेत आहे आणि देशात इव्ही चा प्रचार करत आहे. यावेळी ओला च्या ईव्ही वर उपलब्ध असलेल्या सर्वात मोठ्या सवलती, सर्वोत्कृष्ट डील आणि आकर्षक वित्तपुरवठा ऑफरसह, महागडी पेट्रोल वाहने खूप मागे राहतील, त्यामुळे ईव्ही मध्ये विस्तार करण्यासाठी ही सर्वोत्तम वेळ आहे.

गेल्या महिन्यात, ओला इलेक्ट्रिकने भारतात आपल्या विक्री आणि सेवा नेटवर्कचा विस्तार करण्यासाठी नेटवर्क भागीदार कार्यक्रम सुरू केला, ज्या अंतर्गत ओला इलेक्ट्रिक २०२५ च्या अखेरीस आपले नेटवर्क १०,००० पर्यंत वाढवण्याच्या लक्ष्याकडे वाटचाल करत आहे. याशिवाय प्रत्येक मेकॅनिकला ईव्हीचे ज्ञान देण्यासाठी ओला इलेक्ट्रिकद्वारे १ लाख थर्ड पार्टी मेकॅनिकना प्रशिक्षण दिले जात आहे.

ओला इलेक्ट्रिकची आकर्षक किमतीत सहा उत्पादने आहेत. एस१ पोर्टफोलिओमध्ये विविध प्रकारच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दुचाकींचा समावेश आहे. प्रीमियम ऑफरमध्ये एस १ प्रो आणि एस १ एअर यांचा समावेश आहे, ज्यांची किंमत अनुक्रमे रु. १,३४,९९९ आणि रु. १,०७,४९९ आहे मास मार्केट ऑफरमध्ये एस १ एक्स पोर्टफोलिओ (२ केडब्लूएच, ३ केडब्लूएच आणि ५ केडब्लूएच) ची किंमत अनुक्रमे रु. ७४,९९९, रु.८७,९९९ आणि रु. १,०१,९९९ आहे.

# एसबीआय कार्ड ने सिंगापूर एअरलाईन्ससोबत भागेदारी केली




**नवी दिल्ली, ५ ऑक्टोबर :** एसबीआय कार्ड ही भारतातील सर्वात मोठी प्युअर प्ले क्रेडिट कार्ड जारीकर्ता आहे. त्यांनी सिंगापूरच्या राष्ट्रीय वाहक सिंगापूर एअरलाईन्स लिमिटेड (एसआयए) च्या भागीदारीत आज क्रिसफ्लायर एसबीआई कार्ड लॉंच केले आहे. सिंगापूर एअरलाईन्स, स्कूट एअरलाईन्स, क्रिसशॉप.कॉम, क्रिस+ लाईफस्टाईल प आणि पेलागो यांचा समावेश असलेल्या एसआयए ग्रुपसह प्रवास करणाऱ्या सुपर-प्रीमियमकार्डधारकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हवेत आणि जमिनीवर विशेषाधिकार देणारे हे अनोखे प्रवास केंद्रित को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड विचारपूर्वक डिझाईन केले गेले आहे. नव्याने लॉंच करण्यात आलेले क्रेडिट कार्ड दोन प्रकारांमध्ये उपलब्ध आहे, क्रिसफ्लायर एसबीआई कार्ड आणि क्रिसफ्लायर एसबीआई कार्ड अ‍ॅपेक्स.

या भागीदारीसह, क्रिसफ्लायर एसबीआई कार्ड ग्राहकांना त्यांच्या प्रवास खर्चांवर अधिक जलद गतीने म्हणजेच जास्त प्रमाणात बक्षिसे आणि लाभ मिळतील. क्रिसफ्लायर एसबीआई कार्डवर ३,००० क्रिसफ्लायर मैल आणि क्रिसफ्लायर एसबीआई कार्ड अ‍ॅपेक्सवर १०,००० क्रिसफ्लायर मैलांचे विशेष ऑफर देणारे हे कार्ड्स त्यांच्या समृद्ध ग्राहकांच्या प्रवासाच्या अनुभवाला नवीन आणि उत्कृष्ट स्तरावर नेण्यासाठी तयार केले आहेत. अशा प्रकारे त्यांनी त्यांच्या ग्राहकांना प्रवासाचा अनोखा आणि विलासी अनुभव देण्यासाठी हे कार्ड्स तयार केले आहेत.

# कलाकार सांगत आहेत त्यांच्या नवरात्रीच्या आठवणी आणि परंपरा



नवरात्रीचा सण आला आहे आणि सोबत अनेक देशवासीयांसाठी आनंद, भक्ती आणि हर्षोल्लास घेऊन आला आहे. वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक असलेल्या या सणाच्या निमित्ताने दुर्गा मातेची पूजा आणि भक्ती केली जाते. भारतीयांच्या मनात या पर्वाचे विशेष स्थान आहे. सोनी सबवरील कलाकार नवरात्र साजरी करण्याचे आपले संस्मरणीय अनुभव शेअर करत आहेत. कुटुंबासोबत उपवास करण्यापासून ते रात्रभर गरब्याच्या लयीत धुंद होण्याच्या या आठवणी या पर्वाचे वैशिष्ट्य आणि लोकांच्या मनातील या उत्सवाचे स्थान याचे प्रतिबिंब दर्शवितात.

श्रीमद् रामायण मालिकेत सीतेची भूमिका करणारी प्राची बंसल म्हणते, माझ्या मनात नवरात्रीचे विशेष स्थान आहे. माझी आई नेहमी पूजा करते आणि लहानपणापासून मी देवी मातेची भक्त आहे. आईसोबत उपवास करणे, कुमारिका भोजन घालणे या माझ्या आठवणी आहेत. यावर्षी श्रीमद् रामायण च्या शूटिंगमुळे मला मैत्रिणींसोबत गरब्याच्या रात्री जागवता येणार नाहीत, पण तरीही नवरात्रीची सकारात्मक ऊर्जा आणि देवीची भक्ती यामुळे हा सण लक्षणीय ठरतो.

वागले की दुनिया मालिकेत वंदनाची भूमिका करणारी परिवा प्रणती म्हणते, नवरात्रीमुळे सगळीकडे हर्षोल्लासाचे वातावरण निर्माण होते, ते मला खूप आवडते. माझ्यासाठी, सर्व प्राणीमात्रांविषयी करुणा भाव ठेवणे हे या उत्सवाचे सार आहे. मला शांततेत ईश्वराशी जवळीक साधताना आनंद मिळतो. माझ्या आई-वडीलांच्या घरी हवन असते, ज्यामुळे पवित्र वाटते. या नऊ दिवसांत एक आनंद आणि ऊर्जा भरलेली असते, जी मला फार आवडते.

बादल पे पांव है मालिकेत पूनम खन्नाची भूमिका साकारणारी शेफाली राणा म्हणते, नवरात्र हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक सलोख्याचा सण आहे. नवरात्रीत मी फुले, रांगोळी आणि दिव्यांनी घर सजवते आणि पारंपरिक पदार्थ बनवते. दुर्गा माता ही स्त्री शक्तीचे स्वरूप आहे. गरब्याच्या आणि दांडियाच्या माध्यमातून तिची आराधना करताना मला आनंद मिळतो. नवरात्र केवळ आनंद साजरा करण्याचा सण नाही, तर स्त्रीचे दिव्यत्व, तिचे सामर्थ्य आणि दुर्गुणांवर सद्गुणांचा विजय साजरा करण्याचा उत्सव आहे. समाजाशी एकरूप होऊन आध्यात्मिक उन्नती साधण्याचा हा सण आहे, त्यामुळे माझ्यासाठी त्याचे विशेष स्थान आहे.

# योगेश त्रिपाठी यांनी ताजमहाल येथे 'आयकॉनिक पोज' देत फोटो काढण्याचे स्वप्न पूर्ण केले!



एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये दरोगा हप्पू सिंगची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेले योगेश त्रिपाठी यांनी नुकतेच त्यांनच्या शूटिंग शेड्यूलमधून ब्रेक घेत भारताचा संपन्न वारसा एक्लोसले अर केला. दसरा सणापूर्वी राम बरात उत्सवासाठी आग्रामध्ये आले असताना त्यांनी प्रतिष्ठित ताजमहालला भेट दिली. अनेक पर्यटकांप्रमाणे त्यांनी देखील लोकप्रिय 'होल्डिंग द फिनियल' पोज देत फोटो काढले. या अद्भुत ऑप्टिकल फोटोमध्ये अभ्यागतने ताजमहाल हातामध्ये धरल्या सारखे वाटते. योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग यांनी या अनुभवाला 'जादुई क्षण' असे वर्णन केले. ते म्हणाले, ''व्यक्तिश: ताजमहाल पाहायला मिळाल्याने माझे स्वप्न पूर्ण झाले. कोणताही फोटो किंवा कथा मला या भव्यातेप्रमाणे जाणवू देऊ शकत नाही. ताजमहालमध्ये प्रवेश केल्या नंतर चमकणाऱ्या पांढऱ्या संगमरवरी घुमटाने माझे लक्ष वेधून घेतले. अचंबित करणारी वास्तुकला, ताजमहाल हातामध्ये धरल्याचा भास देणारी 'सिग्नेचर पोज' कॅप्चर करत माझी ही भेट संस्मरणीय ठरली.''

योगेश त्रिपाठी पुढे म्हणाले, ''मी बालपणी ताजमहालला भेट दिली होती, पण त्याबाबत फार कमी आठवते. तेव्हापासून, मी चित्रपट, फोटो व पेंटिंग्जीमधून त्याचे सौंदर्य पाहिले आहे. या भेटीचे खास आकर्षण ठरले सिग्नेचर पोज, जेथे तुम्ही तुमच्या हातामध्ये ताजमहाल धरल्यासारखे वाटते. मी स्वत:ला वचन दिले होते की मी पुढच्या भेटीदरम्यान ही पोज देत फोटो नक्की काढणार आणि जनकपुरीच्या राम बरातसाठी प्रेमाच्या शहरामध्ये आल्यायनंतर हे स्वप्न पूर्ण झाले. तुमचा विश्वास बसणार नाही की, परिपूर्ण फोटो कॅप्चर करण्यासाठी मी अनेकवेळा प्रयत्न केला. फोटो कॅप्चर करण्यासाठी योग्यि ठिकाणी उभे राहण्याचा प्रयत्न करताना खूप धमाल आली. तो क्षण कॅप्चर करताना पर्यटक व इतिहासप्रेमींच्या आनंदाची जाणीव झाली.'' या उत्साही पोजव्यतिरिक्त योगेश ताजमहालची भव्यिता पाहून भारावून गेले. ते म्हणाले, ''वातावरण खूप शांतमय होते. असे वाटले की, ताजमहाल शांततेचे प्रतीक आहे. बागांमधून फेरफटका मारताना मला जाणीव झाली की, ही भेट माझ्या कायमस्वरूपी लक्षात राहणार. 'होल्डिंग द फिनियल' पोज कॅप्चर करणारा फोटो नेहमी मला या ऐतिहासिक स्थळाचा आनंद, सौंदर्य व इतिहासाची आठवण करून देत राहिल.''

# 'वी गेम टू फेम' भारतामध्ये इस्पोर्ट्स गेमिंग सर्वांसाठी उपलब्ध करवून देण्यासाठी सज्ज

**नागपूर, ५ ऑक्टोबर :** इंडिया मोबाइल कॉंग्रेस २०२४ चे पडघम वाजत असताना, देशातील आघाडीची टेलिकॉम ऑपरेटर कंपनी वी ने त्यांची पहिली ग्रासरूट ईस्पोर्ट्स स्पर्धा 'वीगेम टू फेम' सुरु करत असल्याची घोषणा केली आहे.

आज भारत जगातील सर्वात आघाडीच्या गेमिंग बाजारपेठांपैकी एक आहे, जगामध्ये एकूण मोबाईल गेम डाऊनलोड्सपैकी अंदाजे २०% भारतात केले जातात. 'वी गेम टू फेम' ची सुरुवात देशभरातील हौशी इस्पोर्ट्स प्रेमींना एकत्र आणून, त्यांच्यात स्पर्धा व्हावी, एकमेकांमध्ये सहयोग व्हावा आणि त्यांना त्यांची कौशल्ये प्रदर्शित करून फक्त राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळवून देण्यासाठी करण्यात आली आहे.

आपल्या ग्राहकांना आकर्षक इमर्सिव्ह डिजिटल अनुभव मिळवण्यासाठी सक्षम करण्याप्रती वी ची वचनबद्धता आणि वी गेम्स या सर्वसमावेशक मोबाईल गेमिंग प्लॅटफॉर्ममार्फत गेमिंगमध्ये केलेले पदार्पण यावर वी गेम टू फेम प्रकाश टाकते. वी गेम्समध्ये क्लाउड गेमिंग, कॅज्युअल गेमिंग, ईस्पोर्ट्स, एएए गेम्स, मल्टी-प्लेअ गेम्स आणि इतर अनेक प्रीमियम आणि विनामूल्य ऑनलाइन गेम्स आहेत, जे वी पवर खेळले जाऊ शकतात.

स्पर्धेची पहिली आवृत्ती हायब्रिड मॉडेलमध्ये खेळली जाईल ज्यामध्ये सहभागींना त्यांचे कौशल्य ऑनलाइन नॉकआउट स्वरूपात दाखवता येईल. ऑनलाइन क्वालिफायरमधील पहिले संघ दोन गटांमध्ये अंतिम फेरीत जातील आणि १५ ते १८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत आशियातील सर्वात मोठ्या टेक फेस्ट इंडिया मोबाइल कॉंग्रेस २०२४ मध्ये राऊंड-रॉबि स्वरूपात स्क्वेयर ऑफ होतील.

# एमजी विंडसर बनला भारतातील पहिला प्रवासी ईव्ही, ज्याने पहिल्याच दिवशी केली १५,१७६ बुकिंग्सची नोंद



**नागपूर, ५ ऑक्टोबर :** एमजी विंडसर ईव्ही, भारतातील पहिली इंटेलिजंट सीयूव्ही, ला गुरुवारी, ३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ७:३० वाजता बुकिंग सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच महत्त्वपूर्ण ग्राहक प्रतिसाद मिळाला. २४ तासांच्या आत, कंपनीने १५,१७६ युनिट्ससाठी बुकिंग प्राप्त केले, ज्यामुळे एमजी विंडसर भारतातील पहिली प्रवासी ईव्ही बनली आहे, ज्याने असा विक्रम केला आहे. हा टप्पा भारतीय बाजारात फोर-व्हीलईव्हींच्या वाढत्या मागणीचे देखील प्रतीक आहे आणि इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे होत असलेल्या बदलाचा हा स्पष्ट संकेत आहे.

यासंदर्भात, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे मुख्य व्यावसायिक अधिकारी सतिंदर सिंग बाजवा म्हणाले, आम्ही आमच्या ग्राहकांचे आभार मानतो, ज्यांनी एमजी विंडसरला खुल्या मनाने स्वीकारले आणि फक्त एका दिवसात १५,१७६ बुकिंगचा टप्पा गाठण्यास आम्हाला मदत केली. ही उपलब्धी भारताच्या इलेक्ट्रिक वाहन बाजारात एमजी विंडसरला एक प्रगतीशील शक्ती म्हणून स्थापित करते. पहिल्या ईव्हीने हा मापदंड गाठल्यानंतर, एमजी विंडसरच्या लोकप्रियतेमुळे भारतीय ग्राहकांमध्ये टिकाऊ, किफायतशीर आणि राइडर-फ्रेंडली वाहतुकीच्या पर्यायांची वाढती मागणी दिसून येते. आम्ही या परिवर्तनात योगदान देत आहोत याचा आम्हाला खूप - खूप आनंद आहे आणि आम्ही नाविन्यपूर्ण, बुद्धिमान आणि पर्यावरणपूरक मोबिलिटी सोल्यूशन्स प्रदान करण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहोत.

विंडसर ईव्हीमध्ये सेडानची आरामदायीता आणि एसयूव्हीची विशालता एकत्रित केली आहे. इंटेलिजंट एसयूव्ही एक एरोडायनामिक डिझाइन, प्रशस्त आणि आलिशान इंटिरियर्स, प्रभावी स्टान्स, विश्वासार्ह सुरक्षा, स्मार्ट कनेक्टिव्हिटी, ड्रायव्हिंगचा आराम आणि अनेक हाय-टेक फीचर्ससह सुसज्ज आहे. ही कार खरेदीदारांसाठी आकर्षक प्रारंभिक किंमतीत उपलब्ध आहे, जी बीएएएस (बॅटरी अँज अ सर्व्हिस) कार्यक्रमांतर्गत ९.९९ लाख रूपये + ३.५ रूपये/किमी* पासून सुरू होते. पूर्णपणे खरेदी करण्याचा पर्याय देखील उपलब्ध आहे, ज्याची किंमत १३,४९,८०० रूपये (एक्स-शोरूमप्रासून सुरू होते.


विंडसर ईव्हीमध्ये अनेक उद्योग-प्रथम उपक्रमांचा समावेश आहे, ज्यामुळे मालकीचा अनुभव सुलभ होतो. पहिल्या मालकासाठी आजीवन बॅटरी वॉरंटी, ईएचयूबी बाय एमजी अ‍ॅपद्वारे सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्सवर एक वर्षाचे मोफत चार्जिंग, ३ वर्षे/४५,००० किमी नंतर ६०% निश्चित पुनर्खरेदी आश्वासन*** आणि एमजी ई-शिल्ड : एक ३-३-पॅकेज (वाहनावर ३ वर्षांची अनलिमिटेड किमी वॉरंटी/ ३ वर्षांचे रोडसाइड असिस्टन्स कव्हरेज/ ३ लेबर-फ्रीसर्व्हिसेस) मिळते, ज्यामुळे पूर्ण मानसिक शांती देखिल मिळते.

# मालिका 'भाबीजी घर पर है'मधील आसिफ शेख व रोहिताश्वो गौड यांनी लाल किल्ला येथील भव्य रामलीला साजरीकरणामध्येर सर्वांचे लक्ष वेधून घेतले!

**नवी दिल्ली, ५ ऑक्टोबर :** लाल किल्ला येथे प्रख्यात लव कुश रामलीला जल्लोषात व उत्साहात साजरी केली जाते. पुन्हार एकदा या रामलीलाने राजधानीमधील प्रभू श्रीरामांच्या यशाचे महाकाव्य पाहण्यासाठी उत्सुक असलेले हजारो भक्त व चाहत्यां चे लक्ष वेधून घेतले. एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'भाबीजी घर पर है'मधील कलाकार आसिफ शेख ऊर्फ विभुती नारायण मिश्रा आणि रोहिताश्वि गौड ऊर्फ मनमोहन तिवारी यांनी उपस्थिती दाखवल्यामुळे यंदाचा इव्हण्टो अधिक खास बनला. या प्रतिभावान कलाकारांनी सेलिब्रेशन्साना उपस्थिती दाखवली, तसेच उत्सवाचे खास आकर्षण देखील ठरले, ज्यामुळे प्रेक्षकांना उत्सापहपूर्ण क्षणांचा आनंद मिळाला. दिल्लीशी दृढ नाते असलेले आसिफ शेख शहरातील उत्साह पाहून भारावून गेले. आपला आनंद व्यक्त करत आसिफ शेख ऊर्फ विभुती मिश्रा म्हणाले, ''मी दिल्ली मध्ये परतल्यावर प्रत्येक वेळी घरी परतल्या सारखे वाटते. रामलीलाचा भाग होणे उत्साहपूर्ण आहे आणि येथील वातावरण उत्साहाने भरलेले असते. बालपणी, मी प्रेक्षक म्हणून ही रामलीला पाहिली आहे आणि तेव्हा मंचावर परफॉर्मर म्हणून असण्याचे स्वप्नी पाहायचो. आता येथे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहण्यारचा अनुभव उत्साहपूर्ण आहे. या अनुभवाने मला अधिक खास बनवले. माझ्यासोबत माझे सह-कलाकार रोहिताश्वय गौड देखील होते. आम्ही दिल्लीमधील लोकप्रिय परंपरांचा आनंद घेतला, स्वादिष्ट छोले भटुरेचा आस्वाद घेतला आणि उत्साही स्थीनिक बाजारपेठांमध्ये फेरफटका मारला. मी आहाराच्या बाबतीत शिस्तबद्धता पाळत असलो तरी तेथील स्वादिष्टा पदार्थांचा आस्वाद घेण्यापासून स्वसत:ला रोखू शकलो नाही. दिल्ली फूडच्या बाबतीत नेहमी अग्रस्थानी आहे. मी माझ्या आहाराबाबत काळजी घेत असलो तरी येथे सर्व नियम सोडून दिले. मी चाट आणि रस्याली वरील इतर खाद्यपदार्थांचा आस्वासद घेतला, पण खाण्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला (हसतात). या क्षणांच्या आठवणी सदैव माझ्या स्मरणात राहतील. दिल्लीने पुन्हा एकदा माझे मन जिंकले आहे.''

रोहिताश्वव गौड ऊर्फ मनमोहन तिवारी यांनी शहराबाबत सांगताना जुन्या भेटीला उजाळा दिला. ते म्हणाले, ''दिल्लीचे माझ्या मनात खास स्थान आहे. आम्ही मंचावर येताच उपस्थितांनी जल्लोष सुरू केला, जे पाहून मी भारावून गेलो. चाहत्यांकडून मिळालेले प्रेम संस्मरणीय होते. लव कुश रामलीला अद्वितीय अनुभव आहे. निर्मितीचा दर्जा, प्रेक्षकांचा उत्सांह आणि शहरामध्ये साजरी केली जाणारी ही परंपरा अचंबित करणारी आहे. दिल्ली सोबतचे माझे नाते नेहमी स्मरणात राहील आणि ही ट्रिप संस्मरणीय ठरली आहे. देशातील सर्वात मोठा व प्रख्यात रामलीला कार्यक्रम लव कुश रामलीला साजरी करताना आसिफजींनी उत्साहामध्ये अधिक भर केली. चाहत्यांनी आमच्यासोबत गप्पागोष्टी केल्या, फोटो काढले आणि आठवणी शेअर केल्या, तसेच सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये अतसना मी माझ्या कलेवर इतके लक्ष केंद्रित केले होते की शहरामध्ये फेरफटका मारण्याची संधीच मिळाली नाही. पण, परिपूर्ण टूर गाइड सारखे असलेले आसिफजी यांच्यासोबत येथे आल्यानंतर अद्भुत अनुभव मिळाला.''

# शब्दकोडे क्रमांक १९४५



**आडवे शब्द :-**


१) मुंज, मौंजीबंधन
५) अतिशय खोल तळाचा ठाव लागत नसलेला
८) पोलिस चौकी
९) उद्याच्या नंतरचा दिवस
१०) योग्य, उचित
११) अस्थिर होणे, हलणे
१४) जाणे
१५) स्वत:बद्दलची कमीपणाची भावना
१६) लाकूड तासण्याचे हत्यार
१७) चांदी
१९) वाद्य वाजविण्याची कला
२०) विश्व
२१) नारळ सुपारीच्या पात्यामधील उभा दांडा नाश पावणारे
२२) पदार्थाचा सूक्ष्म भाग, अणु
२४) उद्दिष्ट, नियम
२७) मध
२९) भेग वाढविणारी खुंटी
३०) *** गाडगे
३२) जगाचे कालचक्र
३३) वाहणारी हवा
३५) जपजाप्य
३७) अंत:करण
३८) बारीकसारीक
४१) मालक
४२) पुरुष
४४) नाचणी
४५) शंभर
४८) कथिल व तांबे यांचा मिश्र धातू
५०) सरसकट
५२) हवेतील गारवा
५५) जंगलातील प्राणी
५७) बासरी
५८) केस कापणे
६०) रंग (इं.)
६२) पोलिस
६३) मीठ
६४) थोडक्यात सामोपचार
६६) मान खाली घातलेला
६७) रुपेरी मुलामा

**उभे शब्द :-**

१) मेहेरबानी
२) पंख
३) नव प्रवेशित
४) नजरेचा तीर
५) निरर्थक
६) विपुल, पुरुन उरेल इतके
७) यज्ञ
८) ठाण्याचा रहिवासी
१२) केळवण
१३) साक्ष (हिं.)
१८) माय बाप
२२) कदर करणारा
२३) अनुमती
२५) गावातील विद्वान, सावकार
२६) गुरांचा घोळका
२८) वर्ण
२९) गावाचा कारभार पाहणारा --एक पद
३१) गाडीचे छत
३४) ढीग
३६) त्रास, बडबड
३७) मधुमक्षिका
३९) मोठी टोपली
४०) सोने
४३) मातीचा कण
४५) मंदवासर
४६) कारस्थान
४७) देवापाशी मागीतलेला निर्णय
४९) पवित्र, शुद्ध
५०) पावसाची झड
५१) पत्र
५३) पायाचा खालचा भाग
५४) खिडकीची पातळ काच
५६) छोटी लढाई
५९) पुन्हा
६०) वाळवी, उणीव
६१) चिव चिव करणारा छोटा पक्षी
६२) सीमा
६३) योग्य, वाजवी
६४) प्रामाणिक

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोडयाचे उत्तर






आपल्याला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. आर्थिक अडचण दूर करण्यासाठी मेहनतीची गरज असते. मेहनतीसोबतच वास्तुसंदर्भातील काही उपायांनी आर्थिक चणचण दूर करता येणं शक्य आहे, असं वास्तुशास्त्र सांगतं. वास्तुसंदर्भातल्या उपायांमुळे घरात सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो. तसंच आरोग्यविषय तक्रारीही दूर होतात. आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी हे वास्तु उपाय करता येतील.

# आर्थिक अडचण दूर करण्यासाठी...



तीन पायांचा बेडूक घरात ठेवणं भाग्याचं मानलं जातं. तोंडात नाणी घेतलेल्या तीन पायांच्या बेडकामुळे घरात समृद्धी नांदते. हा बेडूक आपल्या घराच्या मुख्य दरवाज्याजवळ ठेवला पाहिजे. बेडूक किचन किंवा बाथरूममध्ये ठेऊ नये. यामुळे नकारात्मक ऊर्जा प्रवाहित होते.

✻ मुख्य दरवाज्याजवळ लाल रिबनमध्ये बांधलेली तीन नाणी अडकवल्याने लक्ष्मी घरात प्रवेश करते. ही नाणी धन आणि समृद्धीचं प्रतिक मानली जातात. दरवाज्याच्या आतल्या बाजूला तीन नाणी लावा. नाण्यांची संख्या तीनच असली पाहिजे हे लक्षात ठेवा. नाणी दाराबाहेर असतील तर लक्ष्मी दाराबाहेरच थांबते.

वास्तु भक्ती

✻ घरात समृद्धी नांदावी असं वाटत असेल तर लाफिंग बुद्धा तुमच्या मदतीला येऊ शकतो. घराच्या मुख्य दरवाज्याच्या समोर तिरक्या दिशेने लाफिंग बुद्धा ठेवा. बुद्धा मुख्य दरवाज्याच्या समोर ठेऊ नका.

✻ फेंगशुई शास्त्रामध्ये कासवालाही शुभ मानण्यात आलं आहे. घर किंवा ऑफिसच्या उत्तरेकडे कासव ठेवा. कासवाचं तोंड घराच्या आतल्या दिशेला असलं पाहिजे.

✻ घरात मासे ठेवणं भाग्याचं मानलं जातं. बेडरूम, किचन किंवा बाथरूममध्ये गोल्डफिश ठेऊ नका. मासे ड्रॉईंग रूममध्ये ठेवा.

# तेजाला पुजणारी विजयादशमी

**विजयादशमी अर्थात दसऱ्याला नवरात्रोत्सवाची सांगता होते. नवरात्रोत्सव हा निर्मितीशक्तीचा उत्सव आहे. गर्भधारणा झाल्यापासून मूल जन्माला येईपर्यंतचा कालावधी नऊ महिने, नऊ दिवसांचा असतो. बीज जमिनीत पेरले की नऊ दिवसात अंकुरते. शिवाय नऊ हा सर्वात मोठा अंक आहे. अशा रितीने निर्मितीशक्तीचे महत्त्व जाणून घेण्याचा हा कालावधी असतो. त्याच बरोबर या उत्सवात आदीशक्तीच्या तेजाचीही पूजा केली जाते.**



आपल्या देशाला वैविध्यतेची मोठी देणगी लाभली आहे. इथं भौगोलिक वैविध्य तर पहायला मिळतंय शिवाय विविध प्रदेशांनुसार, धर्मांनुसार रूढी-परंपरेतही बदल आढळतात. आपल्याकडे विविध सणवार मोठ्या उत्साहानं, श्रध्देनं साजरे केले जातात. त्यात बदलत्या काळानुरूप काही नव्या संकल्पनाही आणल्या जात आहेत. दसऱ्यासारखा सणही याला अपवाद नाही. या निमित्तानं स्त्री शक्तीचा होणारा गौरव लक्षात घेण्यासारखा आहे. दसरा अर्थात विजयादशमी हा साडेतीन मुहुर्तापैकी एक. या दिवशी नवरात्रोत्सवाची सांगता होते. या उत्सवाबाबत विविध कथा प्रचलित आहेत. पूर्वीच्या काळी समाजात दुष्ट शक्तींचा वावर होता. त्यांच्या निर्दालनासाठी आणि जनतेला समाधानानं जीवन जगता यावं यासाठी त्या त्या वेळी प्रयत्न करण्यात आले. आज काळ बदलला असला तरी दुष्ट प्रवृत्तींचा वावरही पहायला मिळत आहे. अशा शक्तींचा वेळीच नायनाट करणं गरजेचं ठरतं. त्यादृष्टीनंही दसऱ्याच्या सणाचं महत्त्व लक्षात घेण्यासारखं आहे.

देवीने विजया हे नाव धारण करून राक्षसांचा वध घेतला, म्हणून हा दिवस 'विजयादशमी' या नावाने ओळखला जातो. हा उत्सव नऊ दिवसांचाच का, असा प्रश्न पडणे साहजिक आहे. परंतु आधी सांगितल्याप्रमाणे हा निर्मितीशक्तीचा उत्सव आहे. गर्भधारणा झाल्यापासून मूल जन्माला येईपर्यंतचा कालावधी नऊ महिने, नऊ दिवसांचा असतो. बीज जमिनीत पेरले की नऊ दिवसात अंकुरते. शिवाय नऊ हा सर्वात मोठा अंक आहे. अशा रितीने निर्मितीशक्तीचे महत्त्व जाणून घेण्याचा हा कालावधी असतो. पूर्वी या काळात शेतातील धान्य घरात येत असे. या पार्श्वभूमीवर दसऱ्याच्या मुहूर्तावर लोक शस्त्रपूजन करून स्वारीसाठी सीमोल्लंघन करत. घरात वर्षभरासाठीच्या अन्नधान्याचा साठा असे. त्यामुळे स्वारीसाठी निघालेल्यांच्या घरच्यांची अन्नधान्याची गरज भागत असे. एकूणच साम्राज्यविस्तार, संपत्तीचा संचय, नावलौकिकाला नवी झळाळी, प्रजेला अभय अशा अनेकोनेक कारणांमुळे नवरात्र आणि त्यानंतरच्या विजयादशमीला महत्त्व होतं आणि आजही आहे.

काळ बदलला तसा सीमोल्लंघनाचा अर्थही बदलत गेला. आता राजाही नाही आणि राज्यही नाही. पण तरीही आपणच घालून घेतलेल्या काही चौकटी मोडून त्यातून बाहेर पाडण्याचं आव्हान समोर आहे. जोखडात ठेवणाऱ्या या सीमा ओलांडल्याशिवाय आपण कोणत्याही नव्या क्षेत्रात स्वत:ला सिद्ध करु शकणार नाही. म्हणूनच सध्याच्या सीमोल्लंघनाला वेगळं महत्त्व आहे. आता आपल्याला आळस, अंधश्रध्दा, अनिती, भ्रष्टाचार या बाबींचे सीमोल्लंघन करायचे आहे. सध्याच्या आधुनिक काळात घराघरात देवीचे जन्म नाकारले जात आहोत. ही मोठी चिंताजनक बाब आहे. घरातील देवींकडे आपण दुर्लक्ष करत आहोत. महालक्ष्मी ही आर्थिक देवता. तिला आर्थिक व्यवहार माहीत असायला हवेत आणि त्याबाबत तिला स्वातंत्र्यही मिळायला हवे. तसे ते दिले जाते का, हा ही विचार करण्याजोगा भाग आहे. घरातील स्त्री ही मुलांवर संस्कार करते, पुढील पिढी घडवण्याचे काम मनापासून करते. म्हणजे एका अर्थाने ती सरस्वतीच ठरते. या सरस्वतीचा योग्य सन्मान राखला जातो का, हा ही आत्मचिंतनाचा भाग आहे. देवीने महाकालीच्या रूपात दुष्ट राक्षसांचा संहार केला. ती शक्तीची देवता आहे. तशी शक्ती घराघरातील स्त्रियांमध्ये असण्याची आवश्यकता आहे. तशी ताकद मिळवण्यासाठी स्त्रियांचे आरोग्य उत्तम राहील याकडे लक्ष देण्याची आणि त्या दृष्टीने काळजी घेण्याचीही गरज आहे. तसा निर्धार किंवा संकल्प या नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने केला जाणे ही काळाची गरज आहे.

निमित्त

या उत्सवासंदर्भातील विविध कथांमध्ये आपण देवीने राक्षसांचा संहार केल्याचे वाचतो. त्याचबरोबर राक्षसांच्या अन्याय-अत्याचाराला कंटाळून सर्व देव देवीला शरण आले आणि त्या राक्षसांचा वध करण्याची विनंती केली. त्यानंतर देवीने आपल्या शक्तीने राक्षसांचा संहार केला असेही सांगितले जाते. तसा उल्लेख पुराणांमध्ये, विविध कथांमध्ये आढळतो. त्या तुलनेत आज स्त्री शक्तीला किती महत्त्व दिले जाते, हा खरा प्रश्न आहे. कितीही शिक्षण घेतले, प्रगती केली तरी आजची स्त्री सुरक्षित नाही. तिला सुरक्षित जीवनाची आस आहे. कायद्याने स्त्री-पुरूष समानता आली असली तरी व्यवहारात ती आलेली नाही हे वास्तव नाकारून चालणार नाही. खेड्या-पाड्यातील स्त्रियांना अजुनही हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल वणवण करावी लागत आहे. दुसरीकडे महागाईचा राक्षस थैमान घालत असताना आजची स्त्री जमा-खर्चाची तोंडमिळवणी करण्याचा प्रयत्न करत आहे. स्वराज्य आले परंतु सुराज्य कधी येणार, याची तिला प्रतीक्षा आहे. त्या दृष्टीने परिस्थितीत बदल गरजेचा ठरणार आहे. हा बदल घडेल तोच क्षण खऱ्या अर्थानं विजयादशमीचा ठरेल. कारण प्रयत्नपूर्वक समाजाचं असं सकारात्मक चित्र समोर आले तर स्त्री खऱ्या अर्थाने सुरक्षित होईल. विजयादशमीच्या दिवशी सरस्वतीचेही पूजन केले जाते. आज विद्यार्जन महाग होत चालले आहे. त्यामुळे इच्छा आणि योग्यता असूनही सामान्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण घेता येत नाही अशी परिस्थिती आहे. त्या दृष्टीने दर्जेदार शिक्षणाची गंगा तळागाळातील वर्गापर्यंत नेण्याचे आव्हान कायम आहे. ते कधी पूर्णपणे पेलले जाईल हे निश्चित करणे आणि त्या दिशेने पावले टाकण्याचा संकल्प करणे विजयादशमीच्या निमित्ताने उचित ठरेल.

विजयादशमीला शस्त्रपूजेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामागे पौराणिक कथाही आहेत. या दिवशी पांडवांनी अज्ञातवास संपल्यानंतर शमीच्या वृक्षावर ठेवलेली शस्त्रास्त्रे काढून त्याचे पूजन केले अशी एक कथा आहे. या दिवशी प्रभू श्री रामचंद्रांनी रावणावर विजय मिळवला अशीही श्रध्दा आहे. आधुनिक काळाचा विचार करायचा तर शस्त्र पूजनाप्रमाणे शास्त्र पूजनही महत्त्वाचे ठरणार आहे. आपल्या शास्त्रज्ञांनी मंगळयान मोहिम यशस्वी करत अंतराळ संशोधन क्षेत्रात मोलाचा टप्पा गाठला. त्या पाठोपाठ चांद्रयान आणि अंतराळातील वेधशाळा हे प्रकल्पही यशस्वी ठरले. हे एक प्रकारे भारतीय शास्त्रज्ञांनी केलेले यशस्वी सीमोल्लंघनच म्हणायला हवे. विशेष म्हणजे ज्या ब्रिटीशांनी या देशावर १५० वर्षं राज्य केले, त्याच ब्रिटीशांचे उपग्रह अंतराळात पाठवून आपण परिस्थितीत बदल घडवून आणण्यात यशस्वी ठरलो आहोत.

या वर्षी पावसाने दिलासा दिला असला तरी तेवढ्यावर काम भागणार नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. आत्महत्याग्रस्त कुटुंबियांवर जणू आभाळ कोसळले आहे. मुलांच्या शिक्षणाचा तसेच चरितार्थाचा प्रश्न आ वासून उभा आहे. शासन तसेच सामाजिक संस्था, संघटना मदतीसाठी प्रयत्नशील असल्या तरी ही साऱ्यांचीच सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे विजयादशमीसारखा सण साजरा करताना या बांधवांवरील संकटांची जाण ठेवणे महत्त्वाचे ठरेल. आपल्यासाठी गोडधोड करताना या बांधवांनाही त्याचा वाटा दिल्यास हा सण अधिक सार्थकी लागेल. कोणत्याही सण-उत्सवाचा खरा अर्थ हे सामाजिक भान निर्माण करणे हाच असतो.

# नवरात्र दक्षिणेतली...

नवरात्र म्हणजे आदीशक्तीचा, देवीचा उत्सव. हा उत्सव भारतातल्या प्रत्येक प्रदेशात साजरा केला जातो. बंगालमध्ये दुर्गापूजेची धूम असते, गुजरातमध्ये गरब्याचा ठेका रंगतो. उत्तरेतही 'जय माता दी'चा जयघोष केला जातो. महाराष्ट्रात घागरी फुंकल्या जातात. प्रत्येक ठिकाणची पद्धत निराळी पण श्रद्धा आणि भावना एकच. दक्षिणेकडेही नवरात्र साजरी केली जाते. दक्षिणेतल्या नवरात्रीच्या परंपरेविषयी...



तामिळनाडूत सर्वपित्री अमावस्येनंतर शुभमुहुर्त बघून नऊ पायऱ्या असलेलं एक व्यासपीठ तयार केलं जातं. या पायऱ्या पुढच्या नऊ रात्रींचं प्रतिक मानल्या जातात. या पायऱ्या लाकडाच्या असतात. त्यांना 'गोलू पडी' असं म्हटलं जातं. गोलू म्हणजे मूर्ती. या व्यासपीठावर विविध मूर्ती, बाहुला, बाहुली यांची सजावट केली जाते. पडी म्हणजे उंचवटा. व्यासपीठाच्या आजूबाजूला तांदळाच्या पिठाची रांगोळी काढली जाते. गेरूच्या मातीने रांगोळीभोवती सजावट केली जाते. नवरात्रांमध्ये इथे वेगवेगळ्या संकल्पना लढवून सजावट केली जाते. दशावतार, महिषासूराचा वध, अष्टलक्ष्मी, रामपंचायतन, दुर्गा-लक्ष्मी-सरस्वती अशी सजावट केली जाते. गोलू पडीच्या या मूर्ती पिढ्या सांभाळून ठेवल्या जातात. घट किंवा कलश स्थापनेपासून नवरात्रोत्सवाची सुरूवात होते. सर्वात वरच्या पायरीवर मोकळी जागा सोडली जाते. या ठिकाणी घट बसवले जातात. उंच समया लाऊन त्याभोवती फुलांनी सजावट केली जाते. रांगोळी काढली जाते.

धर्म देशोदेशीचे

सकाळ-संध्याकाळ पूजा-अर्चना केली जाते. पहिले तीन दिवस दुर्गेची, पुढचे तीन दिवस लक्ष्मीची तर त्यानंतरचे तीन दिवस सरस्वतीची पूजा करण्याचा इथला प्रघात आहे. नवव्या दिवशी सरस्वती नवमी साजरी केली जाते. व्यासपीठासमोर फळी ठेऊन पुस्तकं तसंच विविध आयुधं मांडली जातात. दसऱ्याच्या दिवशी या आयुधांची पूजा केली जाते. नवरात्रीच्या नऊ दिवसात दक्षिणेकडे ललिता सहस्त्रनाम, महिषासूरमर्दिनी श्लोक, देवी महात्म्याचं पठण केलं जातं. दर दिवशी खीर केली जाते. खिरीचा नैवेद्य दाखवला जातो. नवरात्र म्हणजे आदीशक्तीचा उत्सव. स्त्रीशक्तीचा गौरव करण्याचा हा काळ. म्हणूनच या दिवसात महिला नव्या साड्या विकत घेतात. हळदी-कुंकू समारंभाचं आयोजन केलं जातं. विजयादशमीपर्यंत उत्सवाचा हा माहोल असाच रंगलेला असतो.

# भक्तांचे रक्षण करणारी तारादेवी...



आदिमाया, आदिशक्तीची अनेक रूपं आहेत. प्रत्येक रूपात आई आपल्या भक्तांचं रक्षण करते. त्यांच्या सगळ्या मनोकामना पूर्ण करते. भक्तांचं रक्षण करणारी अशीच एक देवी म्हणजे तारादेवी. कालीमातेचं रूप भीतीदायक आहे पण निलवर्णी शरीरामुळे कालीमातेला तारादेवी असंही म्हटलं जातं. महाविद्यांमध्ये तारादेवीला दुसरं स्थान देण्यात आलंय. 'वाक' म्हणजे बोलण्याची शक्ती प्रदान करत असल्याने तिला नीलसरस्वती असंही म्हटलं जातं. तारादेवी अनेक संकंटांपासून आपल्या भक्तांचं रक्षण करते. आपत्ती कितीही भयंकर असली तरी देवी धावून येते म्हणून तिला 'उग्रतारा' असंही म्हटलं जातं. या देवीचं महात्म्य 'वृहन्नील', 'तंत्रादी' अशा ग्रंथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

तीर्थक्षेत्र

तारादेवीची उपासना तांत्रिक पद्धतीने केली जाते. या पद्धतीला 'आगमोक्त' असंही म्हटलं जातं. तारादेवीच्या उपासनेने बुद्धीमत्तेची प्राप्ती होते. तिच्या उपासनेने सामान्य माणूसही बृहस्पतीप्रमाणे ज्ञानी होऊ शकतो. या ब्रह्मांडात सर्वात प्रथम महर्षी वशिष्ठांनी तारादेवीची आराधना केली. त्यामुळे तारादेवीला 'वशिष्ठाराधिता' असंही म्हटलं जातं. वशिष्ठ मुनींनी वैदिक पद्धतीने देवीची आराधना करायला सुरूवात केली. ही आराधना यशस्वी होऊ शकली नाही. त्याच वेळी तांत्रिक पद्धत म्हणजे 'चिनाचारा' पद्धतीने तारा मातेची उपासना करावी अशी आकाशवाणी झाली. या उपासनेची माहिती 'आचार तंत्र' या ग्रंथात मिळते. चीन, तिबेट आणि लडाखमध्येही देवी ताराची उपासना केली जाते. या देवीचं शक्तीपीठ बिहारमधल्या सहरसा जिल्ह्यातल्या महिषी गावात आहे. हे उग्रतारा देवीचं शक्तीपीठ आहे. या ठिकाणी देवी तारा, एकजटा आणि नीलसरस्वती यांच्या मूर्ती आहेत. याच ठिकाणी तारादेवीची उपासना करून महर्षी वशिष्ठांनी सिद्धी प्राप्त केल्याचं बोललं जातं.

# देव देव्हाऱ्यात नाही...

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे... या कवितेच्या ओळी अत्यंत प्रेरक आहेत. आपण माणुसकी किंवा मानवता हा एकच धर्म मानला पाहिजे. आपण आपल्या धर्मांचं पालन करतो. ते करायला हवं पण माणुसकीचा हा धर्मही आपण जपला पाहिजे. देव किंवा परमेश्वर आपल्या प्रत्येकात वसला आहे. ज्या मनुष्याच्या शरीरात प्रेम आणि करूणा असेल त्यांच्या मनात परमेश्वर सतत नांदत असतो. देव सगळीकडे आहे. देवाला शोधण्यासाठी मंदिरात किंवा धार्मिक स्थानी जाण्याची गरज नसते. आपल्या आत डोकावलं तरी तो सहज दिसू शकतो. पण यासाठी आपलं अंत:करण करूणेने भरलेलं असलं पाहिजे. परमेश्वराला शोधण्यासाठी मन:चक्षूंचा वापर केला पाहिजे. देव साध्या डोळ्यांनी दिसत नाही. प्रत्येक माणसात आपण देव शोधला पाहिजे. गरीबांची, वंचितांची सेवा केली पाहिजे.

अनेकजण ईश्वराचं अस्तित्त्व नाकारतात. परमेश्वर अस्तित्त्वात असेल तर तो दिसायला हवा, असा त्यांचा तर्क असतो. यजुर्वेदात परमेश्वराचं वर्णन आढळतं. परमेश्वर कोणाच्याही अधीन नाही. कोणाच्याही अधीन नसलेला परमेश्वर दिसू शकत नाही. त्याचं अस्तित्त्व मात्र जाणवत राहतं. माणसाच्या इच्छा, आकांक्षा प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. आपली प्रत्येक इच्छा पूर्ण व्हावी, असं माणसाला वाटत असतं. अर्थात याला प्रयत्नांची जोड आवश्यक असते. पण आपल्या चुका त्याला कधीही दिसत नाहीत. आयुष्यात छोटीशी अपेक्षित गोष्ट घडली नाही किंवा मनोकामना पूर्ण झाली नाही तर तो देवाला दोष देऊ लागतो. त्याचं अस्तित्त्व नाकारण्यापर्यंत त्याची मजल जाते. पण आपण परमेश्वरासाठी काय केलं, त्याच्या चरणांशी लीन झालो का, निस्वार्थी वृत्तीने त्याच्याकडे गेलो का, असा विचार माणसाच्या मनात कधीही येत नाही. परमेश्वराने आपल्यासाठी सगळं करावं. पण आपण त्याच्यापुढे हातही जोडू नयेत, असं त्याचं म्हणणं असतं. परमेश्वर बाजारातला भाजीपाला नाही त्यामुळे पाव म्हणलं की तो पावणार नाही. देवाला प्राप्त करण्यासाठी भक्त प्रल्हादासारखी किंवा पुंडलिकासारखी भक्ती असली पाहिजे. खस्ता खाल्ल्या पहिजेत. आपल्या मनात करूणा आणि प्रेम असेल तर परमेश्वर आपली साथ देईल. परमेश्वराला स्वत:मध्ये शोधा. तिथेच तो सापडू शकेल.

बोध



**देवळातल्या देवाचं दर्शन घेतल्यानंतर आपण प्रदक्षिणा घालतो. या प्रदक्षिणेचं बरंच महत्त्व आहे. प्रदक्षिणेची सुरूवात कुठून करावी तसंच आध्यात्मिकदृष्ट्या या प्रदक्षिणेचं काय महत्त्व आहे याची माहिती अनेकांना नसते. प्रदक्षिणा महात्म्याविषयी जाणून घेऊ...**

# महात्म्य प्रदक्षिणेचं...



प्रदक्षिणा नेहमी उजव्या बाजूने सुरू करायला हवी. देवाची मूर्ती तसंच मंदिरात सकारात्मक ऊर्जेचा वास असतो. ही ऊर्जा मंदिरात उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहत असते. डाव्या बाजूने प्रदक्षिणा घातल्यास ही सकारात्मक ऊर्जा शरीरावर आदळते आणि शरीराची ऊर्जा कमी होते. उलट्या दिशेने प्रदक्षिणा घातल्यास आपल्या व्यक्तिमत्त्वावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

✻ पौराणिक ग्रंथांमध्येही याबाबत उल्लेख आढळतो. उजवी बाजू म्हणजे दक्षिण असा अर्थ या ग्रंथांमध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे या कृतीला प्रदक्षिणा असं म्हटलं जातं. मंदिर, नदी, पर्वताच्या प्रदक्षिणेला पुण्यदायी मानण्यात आलंय. म्हणूनच नर्मदा नदी, गिरनार पर्वताची प्रदक्षिणा म्हणजे परिक्रमा केली जाते. प्रदक्षिणेमुळे माणसाची पापं नष्ट होतात, असं मानलं जातं.

जाणून घ्या

✻ शास्त्रांनुसार शंकराच्या पूजनानंतर डाव्या बाजूने प्रदक्षिणेला सुरूवात के ली पाहिजे. शंकराला अर्पण केलेलं जल जिथून बाहेर पडतं तिथपर्यंत प्रदक्षिणा घालून पुन्हा मागे फिरून प्रदक्षिणा पूर्ण करायची असते. याला शंकराची अर्धप्रदक्षिणा असंही म्हणतात.

✻ त्याचप्रमाणे दुर्गा माता आणि भैरोदेवाला तीन प्रदक्षिणा घातल्या पाहिजे. गणपतीला तीन वेळा तर विष्णू, कृष्ण आणि रामाला चार प्रदक्षिणा घातल्या पाहिजे.

# बलिदानाचं महत्त्व जाणणारा मोहरम...

इस्लाम धर्मात बकरी ईद आणि रमझान ईद हे मोठे सण मानले जातात. यासोबतच मोहरम ही सुद्धा इस्लाम धर्मातली अत्यंत महत्त्वाची प्रथा. मोहरम हा उत्साहात साजरा केला जाणारा सण नाही. मोहरमला दु:खाची पार्श्वभूमी आहे. इस्लामी अनुयायांच्या दृष्टीने हा बलिदानाचा दिवस मानला जातो. यंदा १२ ऑक्टोबरला मोहरम पाळला जाणार आहे. मोहरम किंवा मुहर्रम हा इस्लामिक कालगणनेतला पहिला महिना असतो. इस्लामी कालगणनेनुसार मोहरमपासून नव्या वर्षाची सुरूवात होते. मोहरमच्या या पवित्र महिन्यातला दहावा दिवस खूपच महत्त्वाचा असतो. इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसैन याच दिवशी शहीद झाले, असं मानलं जातं. धर्मयुद्ध लढताना त्यांनी आपल्या प्राणांचं बलिदान दिलं. या बलिदानाची आठवण म्हणून मोहरम पाळला जातो. या दिवसाला 'अशुरा' असं म्हटलं जातं.



मोहरमच्या दिवशी इस्लामी अनुयायी ताजियाचं आयोजन करतात. या ताजियाचं वर्णन इस्लाममधला धार्मिक ग्रंथ असलेल्या 'हदीस'मध्ये पहायला मिळतं. इस्लाम धर्मात रमझान हा अत्यंत पवित्र असा महिना मानला जातो. इस्लाम कालगणनेतले चार महिने अत्यंत पवित्र असतात. रमझाननंतर मोहरम महिन्याचं महत्त्व असतं. या महिन्यात काही मुस्लीमधर्मीय उपवासही करतात. इस्लामिक कालगणना म्हणजे हिजरी संवत. धर्माचं रक्षण करण्यासाठी हजरत इमाम हुसैन यांनी शारीरिक त्रास सहन केला. बरीच दु:खं भोगली. अखेर त्यांनी आपल्या जीवाचं बलिदान देऊन धर्माचं रक्षण केलं. मोहरमचे पहिले दहा दिवस त्यांच्या त्रासाचं, दु:खाचं प्रतिक मानलं जातं. इस्लाम धर्मात बलिदानाची मोठी महती आहे. मोहरमच्या दिवशी ताजिया सजवले जातात. हे ताजिया या बलिदानाचं महत्त्व वर्णन करतात.

परंपरा

पान १ वरून

### माझे स्वप्न विकसीत...

काँग्रेस आपल्यात फूट पाडत असून, त्यामुळे आपण सर्वांनी एक राहण्याची आवश्यकता असल्याचे देखील मोदी म्हणालेत. काँग्रेस हा देशातील सर्वात बेईमान आणि भ्रष्ट राजकीय पक्ष असून, त्यांनी खोदलेले खड्डे बुजविण्यासाठी आम्हाला डबल कष्ट घ्यावे लागत असल्याची टीकाही मोदी यांनी केली . इंग्रजी हुकुमशांप्रमाणेच काँग्रेसचा परिवार दलित, पिडीतांना आपल्या बरोबरीचे मानत नाही, त्यामुळे स्वातंत्र्यांच्या इतक्या वर्षानंतरही हा समाज अजूनही मागे आहे, अशा समाजासाठी आमच्या सरकारने अनेक कल्याणकारी निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले

फडणवीस सरकारच्या कार्यकाळात या संग्रहालयाची सुरुवात झाली होती याचे स्मरण करून देत मोदी यांनी फडणवीस यांच्या कार्याचे विशेष कौतूक केले. राज्य सरकारने सुरू केलेली लाडकी बहिण योजना नारी शक्ती वाढवणारी योजना असल्याचेही ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात बंजारा भाषेतून केली. या वेळी त्यांनी सेवालाल महाराजांचा जयजयकार करत उपस्थित नागरिकांना अभिवादन केले.

### ठाकरेंच्या काळात...

या राज्याचे सरकार सर्व समाजाला न्याय देण्याचे काम करत असल्याचा दावा देखील त्यांनी केला. आपले सरकार आता लाडके सरकार झाले असल्याचेही ते म्हणाले. मोदी महाराष्ट्रात जेव्हा-जेव्हा येतात, तेव्हा ते भरभूर निधी देत असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. केवळ मुंबई-पुणेच नाही तर राज्यातील सर्व शहरे विकसित करण्याचे काम सरकार करत असल्याचे ते म्हणाले.

भारताला महाशक्ती होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. जगभरात आपला देश आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रभाव वाढत आहे, मोदींच्या नेतृत्वात देशाच्या विकासाला गती आली असल्याचा दावा त्यांनी केला. पोहरादेवी येथे आज काशी उभी राहिली, रामराव महाराजांची इच्छा पूर्ण करण्याचा योग मोदींच्या नशीबात आला, या समाजाने भाषा, संस्कृती, वेशभुषा जपली असल्याचे सांगत मोदी यांनी देखील त्यांचेच विचार स्वीकारले असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### ऑटो चालकाच्या घरी...

पण दलित कुटुंब निवडून ते माझ्या घरी आले. ते अर्धा तास थांबले. त्यांचे पाय आमच्या घराला लागले, याचा आम्हाला आनंद वाटत आहे.अजय यांच्या पत्नी म्हणाल्या, राहुल गांधी आमच्या घरी आले हे आमचे भाग्यच आहे. त्यांनी भाकरी, हरभऱ्याची भाजी, वांग्याची भाजी व कांद्याची पात बनवली. भावासारखे त्यांनी केले. त्यांच्या हातचे आम्हाला खायला मिळाले हे आमचे भाग्य आहे. दुसरीकडे, काँग्रेस आमदार विश्वजित कदम यांनी राहुल गांधी यांच्या या दौऱ्यावर भाष्य केले. ते म्हणाले, गांधी कुटुंबाचा डीएनएच मुळात गोरगरिब कुटुंबासोबत राहणे, सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळणे व त्यांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा आहे. राहुल गांधी आपल्या कुटुंबाची हीच परंपरा जोपासत आहेत. कोल्हापूर शहरातील अत्यंत गरीब कुटुंबातील लोकांशी संवाद साधत त्यांचे जीवनमान समजून घेण्यासाठी ते येथे आले होते. ही फार मोठी कौतुकाची गोष्ट आहे.

# हल्लेखोरांकडून हत्या



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५:
मुंबईत विधानसभा निवडणुकीची धामधूम तीव्र झाली आहे. राजकीय घडमोडी घडत असतानाच दुसरीकडे मुंबईतून धक्कादाय घटना समोर आली आहे.

येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन कुर्मी यांच्यावर रात्री अज्ञात हल्लेखोराने हल्ला केला. सचिन कुर्मी हे भायखळा तालुकाध्यक्ष असून त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले. घटनेनंतर लगेचच त्यांना जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांची प्रकृती चिंताजनक झाली. रुग्णलयात पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

भायखळ्यातील म्हाडा कॉलनीमागे हा हल्ला झाल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली या हल्ल्यामागील कारणांचा पोलिस तपास करत आहेत. हल्लेखोर कोण होते? हा हल्ला का करण्यात आला? कुर्मी यांचा कोणाशी वाद किंवा वैर होते का? याचा शोध घेण्याचा प्रयत्न पोलिस करत आहेत. या घटनेमुळे राजकीय वातावरण तणावपूर्ण बनले आहे.

# गोंडवाना विद्यापीठाविरोधात रस्त्यावरच भरवला समांतर दीक्षांत सोहळा




## मंत्र्यांना डी. लिट दिल्याने वाद

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ५:
गडचिरोली मधील गोंडवाना विद्यापीठ सध्या एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आले आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते दीक्षांत समारंभ झाला. त्यात विद्यापीठाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना मानद डी.लीट. पदवी बहाल केली. पण त्यावरून वाद निर्माण झाला आहे.

याला विरोध दर्शवण्यासाठी गडचिरोलीतील इंदिरा गांधी मुख्य चौकात समांतर दीक्षांत सोहळा आयोजित करून माजी आमदार हिरामण वरखडे आणि आदिवासींच्या सांस्कृतिक अस्मितेसाठी काम करणारे वसंत कुलसंगे यांना प्रतिकात्मक अशी जनतेच्या विद्यापीठाची डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली.

काहीही संबंध नसणाऱ्यांना हे विद्यापीठ कसे काय डी.लिट सारखी पदवी देते? असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला आहे.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी डी.लिट देण्याचा अधिकार विद्यापीठाला असून, विद्यापीठाने त्या अधिकाराचा वापर केला, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

गडचिरोली जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात आणि विद्यापीठाच्याही प्रस्तावित विकासामध्ये फडणवीस व मुनगंटीवार यांचा मोलाचा वाटा असल्याचे ते म्हणाले. तथापि, या दोन मंत्र्यांना विद्यापीठाने डी. लिट दिल्यावरून आता नवीन वाद निर्माण झाला आहे.










उत्सवप्रिय समाजाची सणांकडे पाहण्याची मानासिकता बदलत आहे. या निमित्ताने होणाऱ्या मेजवान्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नावाखाली होणारा प्रचंड खर्च आणि कल्लोळ हे साजरीकरणाचे अलिकडचे परिचित रुप आहे. वस्तुत: अलिकडच्या काळात स्त्रियांविषयी घडलेल्या आणि माणूसपणावर प्रश्नचिन्ह उमटवून गेलेल्या अघोरी कृत्यांचा परामर्श घेता यंदाच्या नवरात्रीच्या साजरीकरणामागे वेगळे पैलू असायला हवेत.

# गौरव स्त्री शक्तीचा

प्रासंगिक

**उर्मिला राजोपाध्ये**

यंदा सरासरीपेक्षा अधिक प्रमाणात वर्षाधारा बरसल्या आणि नवरात्रीच्या सणावर संपन्नतेच्या हिरव्याकंच रंगाचे लेपन झाले. शेताशिवारात रुजणारी वा परिपक्व अवस्थेतील पिके आपल्याला वेगळीच आश्वस्तता देत आहेत. अशा या रम्यतेत भक्तीभावनेला अंकुर फुटणे अगदीच स्वाभाविक आहे. त्यातूनच हे दिवस आदिमायाशक्तीची सेवा करण्याचे, तिच्या अफाट आणि अलोट शक्तीपुढे नतमस्तक होण्याचे आणि पूजा-अर्चनेद्वारे तिला प्रसन्न करुन घेण्याचे... सध्या समाजमन शक्य त्या सर्व प्रकारे तिच्या आराधनेत गर्क आहे. मात्र हे सगळे करत असताना सद्यस्थितीचे भान ठेवणे क्रमप्राप्त आहे.

उत्सवप्रिय समाजाची सणा-समारंभाकडे पाहण्याची मानासिकता बदलत आहे. खरेदीसाठी उत्तम काळ, महत्त्वपूर्ण आणि मौल्यवान वस्तूंच्या खरेदीतून मिळणाऱ्या सुखाची अनुभूती या निमित्ताने एकत्र येत होणाऱ्या गप्पाटप्पा आणि मेजवान्या, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नावाखाली होणारा प्रचंड खर्च आणि कल्लोळ करत व्यक्त होणारा आनंद हे साजरीकरणाचे अलिकडचे परिचित रुप आहे. पण अलिकडच्या काळात स्त्रियांविषयी घडलेल्या आणि आपल्या माणूसपणावर प्रश्नचिन्ह उमटवून गेलेल्या घटनांचा, अघोरी कृत्यांचा परामर्श घेतला तर यंदाच्या नवरात्रीच्या साजरीकरणामागे वेगळे पैलू असण्याची गरज लक्षात येते.

आज एकीकडे संपूर्ण समाज गरबा, जोगवा, जागर, व्रतवैकल्ये, उपवास, घागर फुंकण्यासारखे कार्यक्रम यात मग्न आहे. अनवाणी चालणे, ठराविक दिवशी ठराविक रंगाची वस्त्रे परिधान करणे, कुमारिकांचे आणि सुवासिनींचे पूजन करणे यासारख्या गोष्टींमध्ये व्यस्त आहेत. खणानारळाने देवीची ओटी भरण्यासाठी पहाटेपासून देवळांसमोर मोठमोठ्या रांगा लागत आहेत. पण भक्तीचा आणि भक्तांचा हाच ओघ समाजातील दुष्टशक्तींचे निर्दालन करताना का आटतो, याचाही विचार या निमित्ताने व्हायला हवा. घरामध्ये नंदादीप अखंड तेवत असताना बलात्कार पीडितांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पेटवल्या गेलेल्या मेणबत्त्या शांत तर होत नाहीत ना, हे आपणच बघायला हवे. कारण समाजातील उपद्रवींना घाबरणारी, घराबाहेर पडताना बिचकणारी, घरात-दारात-संस्थेत-रुग्णालयात, थोडक्यात कुठेच स्वत:ला सुरक्षित न समजणारी प्रत्येक स्त्री याच आदिमायाशक्तीचे सूक्ष्म रुप आहे. त्यामुळे आता तरी दांभिकपणा त्यागून आणि पाप-पुण्याच्या आभासी हिशेबामध्ये न अडकता प्रत्येक देवीभक्ताने स्त्रीशक्तीमध्ये दडलेले देवीचे रुप ओळखणे आणि तिचा यथोचित सन्मान ठेवत आदरपूर्वक वागवणे गरजेचे आहे. थोडक्यात, नवरात्रीचा हा जागर आता नऊ रात्रींपुरता राहता कामा नये. समाजातील सकारात्मक शक्तींनी एकत्र येऊन धरलेला हा फेर, रंगलेला गरबा वा अंगणात मांडलेला हादगा प्रतिकात्मक पद्धतीने अखंड फिरत राहिला तरच त्या कवचात स्त्री स्वत:ला सुरक्षित समजू शकेल.

हल्ली सण-उत्सवाची खऱ्या अर्थाने जाणीव होते ग्रामीण भागात. या भागात आपले पारंपरिक सण साजरे होताना पाहणे हा एक वेगळाच आनंद असतो. पावसामुळे सर्वत्र चांगला पाणीसाठा झालेला असतो. नद्या, ओढे वहात असतात. शेत-शिवार हिरवाईने नटलेले असते. अशा या उत्साही वातावरणात नवरात्रीच्या तयारीचा उत्साह आणखी वाढतो. नवरात्र सुरू होण्याच्या काही दिवस आधी गावाजवळील ओढ्यावर, नदीवर, तळ्याकाठी वा आपापल्या शेतात बहुतांश स्त्रिया एकत्र येतात. येताना घरातील सर्व कपडे धुण्यासाठी सोबत आणलेले असतात. वाहत्या, मोकळ्या पाण्यात सर्वजणी एकमेकींच्या सहकार्याने कपडे धुण्याचा कार्यक्रम पार पाडतात. धुतलेले कपडे काठावर लगेच वाळत घातले जातात. या ठिकाणी लवकर येणे, येताना जेवणाचा डबा बरोबर आणणे, एकत्र जेवण आणि थोडी विश्रांती, नंतर सायंकाळी धुवून वाळवलेले सर्व कपडे घेऊन घराकडे परणे हा कार्यक्रम ठरलेला असतो.

आज शहराजवळील धरणांच्या पाणीसाठ्यालगत अशाच प्रकारे गर्दी पहायला मिळते. पुरेशी स्वच्छता झाल्याशिवाय नवरात्राचे पुरेपूर समाधान मिळत नाही, अशी अनेक स्त्रियांची भावना असते.

दुसरीकडे, या दिवसात शेतांमध्ये पीक तरारून आलेले असते. झेंडूची शेती बहरलेली असते. नवरात्रात झेंडूला चांगली मागणी असल्याने या कालावधीत फुले उपलब्ध व्हावीत, असे शेतकऱ्यांचे नियोजन असते. त्यानुसार झेंडूच्या फुलांची काढणी, ती बाजारात नेणे यासाठी लगबग सुरू असते. नवरात्रात घरोघरी घट बसवले जातात. या घटाचे महत्त्व मोठे आहे. या घटासाठी पवित्र ठिकाणची माती आणून त्यात गहू, हरभरे, जोंधळे, भात, जवस, सातू, राळे, उडीद, मका अशी सात धान्ये पेरायची, त्यावर कलश ठेवायचा, कलशात सप्त नद्यांचे पाणी भरायचे. पाण्यात सोने, चांदी, मोती, प्रवाळ, चांदीचे-तांब्याचे नाणे घालायचे. हळद-कुंकू, गंध, फूल, अक्षता, सुपारी वहायची. घटावर अंबेची प्रतिष्ठापना करायची. रोज नव्या फुलांची माळ देवीच्या मस्तकी रूळेल अशी सोडायची. नऊ दिवस रोज नवी माळ. देवी एकदा स्थानापन्न झाली की तिला नऊ दिवस, नऊ रात्र हलवायची नाही. रोज सवाष्ण जेवू घालायची. देवीचे वैशिष्ट्य असे की ती नऊ दिवस आणि नऊ रात्र झोपत नाही. अर्थातच भक्तानेही नव-रात्र जागरण करायचे. नऊ दिवस उपवास करायचा. परंपरेनुसार अहोरात्र तेलाचा वा तुपाचा नंदादीप देवीसमोर तेवत ठेवायचा. प्रत्येकाच्या चालीरितीनुसार यात थोडाफार फरक असेल. पण मुळात ही पूजा सृजनाची, निर्माणशक्तीची!



ही देवी आदिमाता आहे. देवांनाही 'त्राहि माम्' करुन सोडणाऱ्या महिषासुराचा वध करण्यास ती सिद्ध झाली आहे. तिचे रूपडे पहा. ती अष्टभुजा आहे. शिवाने दिलेले त्रिशूळ, विष्णूने दिलेले सुदर्शन चक्र, वायुदेवाने दिलेले धनुष्य आणि बाणांचा भाता, अग्निदेवाने दिलेली गदा, महाकालाने दिलेली तलवार, यमाने दिलेली ढाल, इंद्राने दिलेला अंकुश, वरूणदेवाने दिलेला नागपाश आणि विश्वकर्म्याने दिलेली कुऱ्हाड अशी आयुधे आपल्या आठ हातांमध्ये घेऊन ती असुराचा नाश करण्यास सिद्ध आहे. सर्व शक्तींचे प्रतीक असलेला सिंह हेच तिचे वाहन आहे. हीच आदिमाता गावोगावी वेगवेगळ्या नावाने पुजली जाते. कोलकत्यातील दुर्गा किंवा कालीमातेचा नवरात्रोत्सव खूप जल्लोषात साजरा होतो. गोव्यात शांतादुर्गा, म्हाळसा, कामाक्षी इत्यादी देवींच्या मंदिरात नवरात्रोत्सव खूप वेगळ्या रुपात साजरा होतो. महाराष्ट्रात अनेकांची कुलदैवत असलेली कोल्हापूरची महालक्ष्मी, रेणापूरची रेणुकामाता, तुळजापूरची तुळजाभवानी ही देवीची तीन शक्तीपीठे आणि वणीची सप्तशृंगनिवासिनी जगदंबा हे देवीचे अर्धे शक्तीपीठ अशी साडेतीन शक्तीपीठे महाराष्ट्रात महत्त्वाची मानली जातात. त्या ठिकाणचा नवरात्रोत्सव बहारदार असतो. अमरावती, नागपूर, चंद्रपूर याबरोबरच आदिमातेची मंदिरे आहेत तिथे नवरात्रोत्सव जल्लोषात साजरा होतो. मंगलदायिनी, तेजस्विनी, रुद्रावतारी मर्दिनी अशी ही आदिशक्ती ! हिचे प्रत्येक रूपच मुळी पूजनीय ! कधी दुर्गा, कधी भवानी तर कधी गौरी म्हणून ही जगन्माता पूजली जाते. गुर्जर समाजातही रात्री गरबा, रासक्रीडा खेळून नवरात्री जागवल्या जातात. आपल्याकडे नवरात्रीचे नऊ दिवस सासुरवाशिणी, माहेरवाशिणी एकत्र येऊन हादग्याचा फेर धरतात. हत्तीची तसबीर मध्ये ठेवून किंवा हत्तीचे चित्र किंवा हत्तीची रांगोळी काढून त्याची पूजा करतात. त्यामागे हस्त नक्षत्राची पूजा करण्याचा उद्देश आहे. मुली, बायका फेर धरतात. फेर धरता धरता खास हादग्याची गाणी म्हणतात. गाणी म्हणून झाल्यावर प्रत्येकाने आणलेली खिरापत ओळखली जाते. ही खिरापत सर्वजणी मिळून एकत्र बसून खातात. यातील गाण्यांची रचना कथात्मक असते. घरात घडणाऱ्या घटनांचे ते वर्णन असते. त्यात पूर्वीच्या काळातील स्त्रीमनाचे भावविश्व उलगडून दाखवले जाते. माहेरचे ओतप्रोत कौतुक आणि सासरचे काहीसे विरोधी चित्रण असते. त्यात काहीशी अतिशयोक्ती असते. मैत्रिणींचे चिडवणे, हसरे-बोचरे चिमटे, सासू-सुनांचे रूसवे-फुगवे यात असतात. एकंदर, हादग्याच्या गाण्यांची अशी वेगळीच मजा आहे.

खरे तर आजच्या घडीला स्त्रीची असलेली बलस्थाने, तिचे कर्तृत्व, तिच्यातील अनेकांगी सुप्त शक्ती वारंवार प्रत्ययास येऊनही या स्त्रीलाच कुटुंबात, समाजात तिच्या इतमामाप्रमाणे आदरणीय स्थान देण्यास आपण का कचरतो, याचा विचार या निमित्ताने व्हायला हवा. बाराही महिने स्त्रीत्वाचा आदर करण्याचा 'जागर' मनामनात होणे हेच खरे आधुनिक नवरात्रीचं फलित असावं.

◇◇◇

**मिथुन चक्रवर्ती सध्या दादासाहेब फाळके पुरस्कारामुळे चर्चेत आहेत. बॉलीवूडच्या सुपरस्टार्समध्ये गणले जाणारे मिथुन संघर्षाच्या काळात अनेक रात्री मोकळ्या आकाशाखाली उपाशी झोपले. मात्र अविरत परिश्रमांनंतर त्यांच्या वाट्याला अनेक सन्मान आले. भाजपशी राजकीय संबंध असलेल्या मिथुन यांना दिलेल्या या पुरस्कारामुळे पश्चिम बंगालमध्ये भाजपला किती फायदा होतो, हे समजण्यासाठी आणखी काही काळ जाऊ द्यावा लागेल.**

# पुरस्कार फळाला येणार ?

सन्मान

**महेश जोशी**

एक काळ असा होता की, अभिनयाच्या दुनियेत नशीब आजमावण्यासाठी मिथुन यांना बराच काळ संघर्ष करावा लागला. मिथुन यांनी स्वतःच्या अडचणींची कहाणी अनेकदा सांगितली आहे. एकदा ते म्हणाले होते, आयुष्यात मी जे काही भोगले, ते इतरांना भोगावे लागू नये. संघर्षाच्या दिवसांमध्ये मिथुन यांनी अनेक रात्री मुंबईच्या फूटपाथवर जागून काढल्या. बॉलिवूडमध्ये प्रवेश केला, तेव्हा त्वचेच्या रंगामुळे त्यांना खूप भेदभावाला सामोरे जावे लागले होते. टॉप अभिनेत्री त्यांच्यासोबत चित्रपट करण्यास नकार देत होत्या. अनेक वर्षे त्यांना हे सहन करावे लागले. लोकांचे लक्ष वळवण्यासाठी त्यांनी अनोख्या 'डान्स मूव्हज'वर काम केले. झीनत अमान या पहिली अभिनेत्री, ज्यांनी मिथुनदांची प्रशंसा केली आणि त्यांच्या 'लूक'चे चांगले वर्णन केले. एका ठिकाणी ते म्हणाले होते, की मला पाहून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आणि चाळीत किंवा गावात राहूनही आपला मुलगा अभिनेता होऊ शकतो, असे त्यांना वाटू लागले. मी आता सामान्य माणसाचा 'हीरो' झालो होतो. सामान्य माणसातून सुपरस्टार बनणे ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. मला वाटले की, मी नाचलो, तर माझा रंग कोणीही पाहू शकणार नाही आणि तेच झाले. नृत्यामुळे लोक माझा रंग विसरले. माझ्यासारख्या वर्णाच्या नायकाची कल्पनाही कोणी केली नव्हती.' झीनत अमान या पहिल्या ए-ग्रेड कलाकार होत्या, ज्यांनी मिथुन यांच्यासोबत काम केले. लोक 'हीरो' म्हणून स्वीकारू शकत नसल्याने मिथुनजींसोबत काम करण्याची कोणाचीच इच्छा नव्हती.

एक काळ असा होता की ते बी-ग्रेड चित्रपटांमधून ए-ग्रेड चित्रपटांकडे जाऊ शकणार नाहीत, असे अनेकांना वाटत होते. चित्रपट जाहीर झाल्यानंतरही अभिनेत्रींनी चित्रपटातून बाहेर पडण्याचे प्रकार अनेकदा घडले. मात्र वास्तव हे होते की एक दिवस मिथून मोठा स्टार बनेल, या भीतीने अनेक स्टार्स असुरक्षित होते. झीनतजींना त्या काळातील नंबर वन हिरोईनचा दर्जा होता. त्यांनी मिथुन यांच्यासोबत काम केल्याने इतर अभिनेत्री त्यांच्यासोबत काम करायला तयार झाल्या. 'तकदीर' या चित्रपटाच्या प्रदर्शनामुळे ते 'ए' श्रेणीचा अभिनेता झाले. मिथुन यांच्या त्या चित्रपटाने त्यावेळी शंभर कोटी रुपयांची कमाई केली होती. पुढे मिथुन हिंदी चित्रपटसृष्टीतील एक दमदार अभिनेता बनले आणि १९८२ मध्ये प्रदर्शित झालेल्या त्यांच्या चित्रपटाने इंडस्ट्रीतील बड्या स्टार्सचा पराभव केला. मिथुन यांनी आतापर्यंत सुमारे साडेतीनशे चित्रपटांमध्ये काम केले आहे. बॉलीवूडमध्ये सर्वाधिक प्रदीर्घ खेळी खेळणाऱ्या अभिनेत्यांपैकी ते एक मानले जातात.

अभिनेत्यापासून स्टारमध्ये झालेल्या मिथुन यांच्या परिवर्तनाची कहाणी खूपच रंजक आहे. १९८० च्या दशकात मिथुन यांचे चित्रपट मोठ्या पडद्यावर कमाल दाखवत नव्हते. त्या वेळी ते 'तकदीर के बादशाह' या चित्रपटाचे चित्रिकरण करत होते. कारकीर्दीतील अपयशाने ते त्रस्त आणि निराश झाले होते.



दिग्दर्शक सुभाष

यांनी त्याबाबत विचारले तेव्हा ते म्हणाले की एवढी मेहनत करूनही मी काही साध्य करू शकत नाही.' त्यानंतर त्यांना 'डिस्को डान्सर' या चित्रपटाची ऑफर मिळाली आणि या चित्रपटाने मिथुन रातोरात स्टार बनले. ही त्या काळातली मोठी गोष्ट होती. मिथुन एक उत्तम अभिनेता असण्यासोबतच बिझनेस आणि राजकारणातही स्टारपेक्षा कमी नव्हते. त्यांचा हॉटेलचा मोठा व्यवसाय आहे. उटीमध्ये त्यांचे सर्वात मोठे हॉटेल आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी चित्रपट, व्यवसाय आणि इतर व्यवसायांमधून सुमारे चारशे कोटी रुपयांची संपत्ती कमावली आहे.

मिथुन चक्रवर्ती यांना 'मृगया' या पदार्पणातील चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे. याशिवाय त्यांना १९९३ मध्ये 'ताहदर कथा' या चित्रपटासाठी दुसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एप्रिल २०२४ मध्ये त्यांना पद्मभूषण सन्मान देण्यात आला. मिथुन यांच्या चर्चीत चित्रपटांमध्ये डिस्को डान्सर, प्यार झुकता नहीं, स्वर्ग से सुंदर, हम पांच, साहस, वारदात, बॉक्सर, प्यारी बेहना, प्रेम प्रतिज्ञा, मुजरिम यांचा समावेश आहे. अग्निपथ, द कश्मीर फाइल्स आणि द ताश्कंद फाइल्स सारख्या अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले. आता भारत सरकारने त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. हा पुरस्कार चित्रपटक्षेत्रातील योगदानाबद्दल सरकारकडून दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार पटकावलेले मिथुन चक्रवर्ती यांनी आपल्या अभिनयाने लोकांच्या मनावर राज्य केले आहे. पश्चिम बंगालमधून आलेल्या अभिनेत्यांमध्ये मिथुन चक्रवर्ती हे एकमेव नाव आहे, ज्यांनी उत्तर भारतातही प्रचंड लोकप्रियता मिळवली. त्यांनी हिंदी, बंगाली, भोजपुरी, उडिया, तेलगू आणि तामिळ भाषेतील ३५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. मिथुन ८० आणि ९० च्या दशकात सुपरस्टार होते आणि त्यांनी सहाय्यक भूमिकांमध्येही चमकदार कामगिरी केली. मृणाल सेनच्या मृगया (१९७६), सुरक्षा (१९७९), बिमल दत्त यांच्या कस्तुरी (१९८०), आणि ख्वाजा अहमद अब्बासच्या द नक्सलाइट्स यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी स्वत: ला एक उत्कृष्ट अभिनेता म्हणून स्थापित केले. मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळण्यालाही मोठा राजकीय अर्थ आहे. त्यांची राजकारणातील सक्रियता गेल्या काही वर्षांमध्ये वाढली आहे. त्यांनी २०१३ मध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ममता बॅनर्जी यांनी त्यांना राज्यसभा खासदार केले; परंतु मिथुन यांनी राजकारणातून मध्यंतरी ब्रेक घेतला. ते तृणमूल काँग्रेसमधून भाजपमध्ये आले. पश्चिम बंगालमध्ये २०२१ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मिथुन चक्रवर्ती यांना सोबत आणण्यासाठी भाजपने सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांनी मार्च २०२१ मध्ये कोलकाता येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. त्याआधी संघप्रमुख मोहन भागवत यांनीही मिथुन यांची अनेकदा भेट घेतली. विधानसभा निवडणुकीत भाजपने त्यांना पक्षाचा स्टार प्रचारक बनवले. पक्षाचा त्यांनी जोरदार प्रचार केला. त्या वेळी राज्यात भाजप सरकार स्थापन करू शकेल, असा विश्वास होता. मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह पक्षाच्या सर्व बड्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपचे सरकार स्थापन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले; परंतु पक्षाला २९४ पैकी केवळ ७७ जागा मिळाल्या. भाजपला अपेक्षित असलेला विजय मिथुन चक्रवर्ती मिळवून देऊ शकले नाहीत.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर भाजपमध्ये अनागोंदी निर्माण झाली. अनेक बड्या नेत्यांनी पक्ष सोडला. यामध्ये मुकुल रॉय, बाबुल सुप्रियो यांचा समावेश होता. लोकसभा निवडणुकीच्या २०२४ च्या प्रचारादरम्यान मोदी यांच्यासह इतर बड्या नेत्यांनी बंगालमध्ये पक्षाला मोठा विजय मिळेल, असा दावा केला होता. भाजपने बंगालमध्ये ४२ पैकी ३५ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले होते; परंतु २०१९ मध्ये जिंकलेल्या जागांपेक्षाही ते खूप मागे पडले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये १८ जागा जिंकणाऱ्या भाजपला या वेळी फक्त १२ जागा जिंकता आल्या. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापनेचे स्वप्न आहे. पश्चिम बंगाल हे जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे गृहराज्य आहे; पण सततच्या पराभवामुळे आणि घसरत्या आलेखामुळे पक्षाचे कार्यकर्ते निराश झालेले दिसतात. २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाल्यापासून मोदी, शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशिवाय भागवत यांनीही अनेक वेळा पश्चिम बंगालचा दौरा केला आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून भाजपच्या नव्या अध्यक्षाचा शोध सुरू आहे. सध्याचे प्रदेशाध्यक्ष सुकांत मजुमदार हे मोदी सरकारमध्ये मंत्री असल्याने पक्ष नव्या प्रदेशाध्यक्षाचा शोध घेत आहे; मात्र पक्षातील नेत्यांमधील अंतर्गत लढाई एवढी तीव्र आहे, की निवड करणे कठीण जात आहे.

आज पश्चिम बंगालमध्ये परिस्थिती अशी आहे, की भाजपच्या बंडखोर नेत्यांनी 'भाजप बचाओ' मंच स्थापन केला आहे. पश्चिम बंगालमधील राजकीय लढा भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात केंद्रीत झाला आहे. पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी आता अडीच वर्षे उरली आहेत. पश्चिम बंगालमधील खराब राजकीय स्थितीमुळे भाजपला मिथुन चक्रवर्ती यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये मिथुन चक्रवर्ती यांनी अनेक वेळा दावा केला आहे, की तृणमूल काँग्रेसचे ३० पेक्षा जास्त आमदार त्यांच्या संपर्कात आहेत आणि लवकरच राज्यात भाजपचे सरकार स्थापन होईल. पश्चिम बंगालमध्ये भाजपकडे कोणताही मोठा लोकप्रिय चेहरा नाही. बंगालमधील लोकप्रिय आणि भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीलाही पक्षाने सामील करण्याचा प्रयत्न केला; परंतु गांगुली त्यासाठी तयार नाही. मिथुन चक्रवर्ती पश्चिम बंगालमधील शहरी आणि ग्रामीण भागात खूप लोकप्रिय आहेत आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपला त्यांच्या लोकप्रियतेतून पुन्हा एकदा राजकीय फायदा मिळवायचा आहे.

◇◇◇

# तिसऱ्या महायुध्दाच्या दिशेने...

विशेष

अखिलेश बांदेकर

अमेरिकेने दिलेला युद्धबंदीचा प्रस्ताव इस्त्रायलने धुडकावून लावला. इस्त्रायलमधील सामान्य लोकांचा युद्धाला विरोध असला, तरी पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू कुणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत दिसत नाही. अमेरिकेच्या मदतीवर पोसलेला हा देश आता अमेरिकेचेही ऐकायला तयार नाही. एकाच वेळी इस्त्रायल तीन देशांशी लढतो आहे. गाझापट्टी, लेबनॉन आणि इराणसोबत या देशाने अघोषित युद्ध सुरू केले आहे. हवाई आणि क्षेपणास्त्र हल्ल्याकडून आता जमिनीवरच्या युद्धाकडे इस्त्रायल वळतो आहे. रशिया आणि युक्रेन युद्ध गेल्या पावणेतीन वर्षांपासून सुरू असताना मध्य पूर्वेतला संघर्षही थांबायला तयार नाही. पुन्हा पुन्हा जग तिसऱ्या महायुद्धाकडे ढकलले जात आहे का, अशी शंका येत आहे.

**आज एकाच वेळी इस्त्रायल तीन देशांशी लढत आहे. गाझापट्टी, लेबनॉन आणि इराणसोबत या देशाने अघोषित युद्ध सुरू केले आहे. हवाई आणि क्षेपणास्त्र हल्ल्याकडून आता जमिनीवरच्या युद्धाकडे इस्त्रायल वळतो आहे. रशिया आणि युक्रेन युद्ध गेल्या पावणेतीन वर्षांपासून सुरू असताना मध्य पूर्वे तला संघर्षही थांबायला तयार नाही. पुन्हा पुन्हा जग तिसऱ्या महायुद्धाकडे ढकलले जात आहे का, अशी शंका येत आहे.**

दुसऱ्या महायुद्धांनतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्राची अवस्था दात आणि पंजे नसलेल्या सिंहासारखी झाली आहे. त्याला कारवाईचे काहीच अधिकार नाही. संयुक्त राष्ट्रांनी सांगूनही इस्त्रायल त्याला जुमानायला तयार नाही. 'व्हेटो'चा ठराविक देशांना असलेला अधिकार आणि संयुक्त राष्ट्रांचे जगातील सभासद देशांवरचे परावलंबित्व त्याला काहीच करू देत नाही. लेबनॉनमध्ये इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात सध्या भीषण युद्ध सुरू आहे. आता ते संपूर्ण परिसरात पसरण्याची भीती आहे. आता इराणही या युद्धात अडकू शकतो. दुसरीकडे रशियानेही युरोपला क्षेपणास्त्र हल्ल्याची धमकी दिली आहे. आशिया खंडातला वाढता युद्धज्वर जगाला विनाशाकडे नेण्याची भीती आहे. नेतन्याहू यांनी हिज्बुल्लाहला संपवण्याची भाषा केली आहे. त्याच वेळी जोपर्यंत इराणचा पराभव करत नाही, तोपर्यंत ही समस्या थांबणार नाही, असे त्यांचे सांगणे म्हणजे इराणला डिवचण्यासारखे आहे. सापाचे डोके इराणमध्ये आहे आणि जोपर्यंत तो चिरडला जात नाही, तोपर्यंत परिस्थिती सुधारणार नाही, ही त्यांची भाषा युद्धज्वर आणखी वाढवणारी आहे. ज्या पद्धतीने इस्त्रायलमध्ये तयारी केली जात आहे, त्यावरून इराणवरही हल्ला होणार असल्याचे दिसते. इराणवर हल्ला झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. वास्तव हे आहे की अमेरिका आणि इस्त्रायलच्या सामर्थ्याने सर्व देश पराभूत झाले आहेत. कोणताही देश त्यांच्याशी, विशेषतः अमेरिकेशी स्पर्धा करू शकत नाही. इराणने आपल्या सैन्याचा जो काही विकास केला, तो इस्त्रायलशी स्पर्धा करण्यासाठी केला. इराण अशा स्थितीत आहे, की तो इस्त्रायलला हानी पोहोचवू शकतो. मध्य पूर्वेतील तणाव थांबणार नाही; पण अमेरिकेशी सामना करणे त्यांच्यासाठी खूप कठीण जाईल. अमेरिका एकीकडे युद्धविरामाचा सल्ला देत असताना नेत्यनाहू यांची भाषा युद्धखोरीची आहे. इराणला मुद्दाम डिवचण्यामागे इराण एकदा का युद्धात उतरला, की अमेरिकेला अपरिहार्यपणे इस्त्रायलच्या बाजूने युद्धात उतरावे लागेल.



इराणवर हल्ला झाल्यास ते तेलाचा पुरवठा बंद करतील. दुसरे म्हणजे, अमेरिकेचा तळ कुठेही असेल, मग तो इराक, सीरिया, सौदी अरेबिया, कतार-बहारिन असो; त्याला लक्ष्य करून तेल बंद करण्याचा इशारा इराण देत आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे हवाई मुख्यालय कतारमध्ये आहे, तर भूदलांचे मुख्यालय बहरीनमध्ये आहे. त्या ठिकाणी तेलाचा पुरवठा थांबला, तर सर्व देशांसमोर मोठी समस्या निर्माण होईल. दुसरी गोष्ट अशी, की लेबनॉनमध्ये सध्या ज्या प्रकारे युद्ध सुरू आहे, ते दिवसेंदिवस भयंकर होत आहे. गाझामध्ये जशी परिस्थिती होती, तशीच परिस्थिती निर्माण होत आहे. इस्त्रायलची योजना अशी आहे, की त्यांना हिजबुल्लाहच्या लोकांना इस्त्रायलची सीमा लेबनॉनला जिथे मिळते, तिथे बाहेर काढायचे आहे. तिथे बफर झोन बनवायचा आहे. इस्त्रायल किंवा अमेरिकेला नेहमीच्या सैन्यासह लढणे खूप सोपे आहे; पण दहशतवादी गटाला पराभूत करणे फार कठीण आहे. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे तालिबान. अमेरिका जवळपास २२ वर्षे दहशतवाद्यांशी लढत राहिली, नंतर त्यांच्याकडे सत्ता सोपवून परत आली. इस्त्रायलचे हमाससोबतचे युद्ध जवळपास वर्षभर चालले; पण त्याला अद्याप विजय मिळवता आलेला नाही. इस्त्रायलला हमासला नष्ट करता आलेले नाही. ते त्याचे खरे उद्दिष्ट आहे. लेबनॉन हा एक छोटा आणि सुंदर देश आहे. त्याची लोकसंख्या सुमारे ५० लाख आहे. तिथे दहा लाख सीरियन निर्वासित आहेत. येथील लोक खूप मेहनती आणि संगीत, संस्कृती आणि कलेची आवड असणारे आहेत. हे अरब जगाचे सांस्कृतिक केंद्र आहे. वास्तविक, लेबनॉनमध्ये १९७५ पासून असा संघर्ष सुरू आहे. इस्त्रायली सैन्याने २००६ मध्ये दक्षिण लेबनॉनवर हल्ला केला; परंतु त्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. युद्धातून ध्येय साध्य होऊ शकत नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला वारंवार सांगितले असले, तरी कुणीही माघार घ्यायला तयार नाही. युद्धाने उद्दिष्ट्य साध्य होणार नाहीत. व्हिएतनाम-अमेरिका युद्धात चार हजार लोक मरण पावले, त्यानंतर अमेरिकेला तेथून पळ काढावा लागला. त्यानंतर अमेरिकेने लॉस कंबोडिया, इराक येथे लढा दिला. सद्दाम हुसेनचे सरकार पाडले; परंतु तेथे अमेरिकन समर्थक सरकार स्थापन करू शकले नाहीत. लीबियात फ्रान्स आणि अमेरिकेने बॉम्बफेक करून गद्दाफी मारला; परंतु तिथली गृहयुद्धाची परिस्थिती कायम आहे. ते दोन भागात विभागले गेले आहेत आणि आपसात भांडत आहेत.

या पार्श्वभूमीवर इस्त्रायल जर युद्धाच्या माध्यमातून हिजबुल्लाला संपवण्याचा विचार करत असेल तर ते शक्य नाही. या चळवळी आहेत आणि कोणतीही चळवळ संपवणे फार कठीण आहे. इस्त्रायलने हमासच्या उच्च अतिरेक्यांना मारले, तरीही तेथे नवीन लोक अधिक अतिरेकी बनतात. हमासने २००६ मध्ये इस्त्रायलवर भीषण हल्ला केला होता, तेव्हापासून अनेक नवीन लोक आले. हमास तेथे खूप मजबूत आहे, तर इस्त्रायलने गाझाला १७ वर्षांपासून वेढा घातला आहे. इस्त्रायल हा एक अतिशय शक्तीशाली देश आहे आणि त्याच्याकडे अण्वस्त्रे आहेत हे खरे आहे. पारंपारिक शस्त्रास्त्रांमध्येही, त्याच्याकडे खूप श्रेष्ठ शस्त्रे आहेत; परंतु चळवळीला सामोरे जाणे कठीण आहे, कारण ज्या प्रकारचे अहवाल येत आहेत, त्यावरून असे दिसून येते, की अनेक लढाऊ हमासमध्ये सामील झाले आहेत. ते तिथे मरायला तयार असतील, तर त्यांना प्रशिक्षणाची गरज नाही. इस्त्रायलची अर्थव्यवस्थाही चांगली नाही. पर्यटनही उद्योग अत्यंत खालावला आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे पर्यटक येत नाहीत. इस्त्रायलमध्ये दुहेरी नागरिकत्व असलेल्यांनी आपला देश सोडला आहे. असे असले, तरी या वेळी इस्त्रायलला गाझामधून सर्व पॅलेस्टिनींना हाकलून इजिप्तच्या दिशेने ढकलायचे आहे असे दिसते. वास्तविक, गाझामध्ये इस्त्रायलची योजना त्यांना आणखी १० किलोमीटर आत ढकलण्याची आहे. हे शक्य नाही कारण बरेच लोक मरतील आणि नंतर ते इस्त्रायलींनाही मारत राहतील. अशा परिस्थितीत एकच पर्याय आहे आणि तो म्हणजे दोन राज्य उपाय. इस्त्रायलला कधीतरी हे क्षेत्र रिकामे करावे लागेल. संयुक्त राष्ट्र महासभेने आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून मत मागितले असता, हे व्यापलेले क्षेत्र आहे, जे इस्त्रायलला रिकामे करावे लागेल, असे सांगण्यात आले. निर्वासितांना परत यावे लागेल. लेबनॉनमध्ये इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात संघर्ष सुरू आहे. इस्त्रायलच्या भीषण हल्ल्यात हिजबुल्लाहच्या अनेक सदस्यांना प्राण गमवावे लागले. आता इस्त्रायलने अमेरिकेसह इतर देशांनी दिलेला २१ दिवसांचा युद्धविराम प्रस्ताव नाकारला आहे. लेबनॉनमधून हिजबुल्लाला संपवणे हे अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. लेबनॉनमधील हिजबुल्लाहला चिरडणे हा त्याच्या उत्तरेकडील नवीन हल्ल्याचा अंतिम परिणाम असावा. इस्त्रायली मंत्र्याने दावा केला, की अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांनी प्रस्तावित केलेल्या युद्धबंदीमुळे हिजबुल्लाला पुनर्गठन करण्यासाठी वेळ मिळेल. यापूर्वी लेबनॉनचे पंतप्रधान नजीब मिकाती यांनी इस्त्रायल आणि इराण समर्थित हिजबुल्ला यांच्यातील लढाई संपवण्यासाठी लवकरच युद्धविराम होऊ शकेल, अशी आशा व्यक्त केली होती. इस्त्रायलने जमिनीवर आक्रमण करण्याचा विचार केल्याने दोन्ही देशांमध्ये युद्धाचा धोका निर्माण झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी इशारा दिला आहे, की इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्ष सर्वांगीण युद्धात वाढण्याचा धोका आहे. इस्त्रायलच्या मंत्र्याचे वक्तव्य फ्रान्स आणि अमेरिकेच्या २१ दिवसांच्या युद्धबंदी योजनेलाही धक्का मानला जात आहे.

◇◇◇

# झारखंडमध्ये कुर्मी मतांवर सर्वांचा डोळा

राज्यरंग

अजय तिवारी

**झारखंडमध्ये इंडिया आघाडीपुढे सत्ता टिकवण्याचे आव्हान आहे, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला कोणत्याही परिस्थितीत सत्तेत यायचे आहे. भाजपने येथे अजित पवार गटाचा एक आमदार तसेच झारखंड मुक्ती मोर्चाचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांना गळाला लावले असले, तरी लढाई सोपी नाही. येथे कुर्मी मतांवर सर्वच पक्षांचा डोळा असून त्यांच्या निर्णायक मतांवर सत्तेची चावी कुणाकडे जाईल, हे ठरणार आहे.**

झारखंडमधील विधानसभेच्या ८१ जागांसाठी पुढील महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने इंडिया आघाडी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी कामाला लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे झारखंड दौरे वाढले आहेत. 'मनी लाँड्रिंग' आणि जमीन घोटाळ्याच्या आरोपाखाली मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना तुरुंगात धाडण्यात आले; परंतु तपासी यंत्रणांना कोणताही आरोप सिद्ध करता आला नाही; उलट, या यंत्रणांवर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर हेमंत सोरेन यांची पुन्हा मुख्यमंत्रिपदी वर्णी लावण्यात आली. त्यांच्या गैरहजेरीत कुटुंबीयांना डावलून चंपाई सोरेन यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपवण्यात आले. निवडणूक होईपर्यंत तरी मुख्यमंत्री राहता येईल, अशा अपेक्षेत असलेल्या चंपाई यांचे मुख्यमंत्रिपद काढून घेण्यात आले. त्यामुळे ते नाराज झाले. त्यांच्या नाराजीला भाजपने खतपाणी घातले. त्यांच्यासह सहा-सात आमदार गळाला लागतील, अशी भाजपची अपेक्षा होती; परंतु तसे झाले नाही. चंपाई यांना एकटे पाडण्यात हेमंत सोरेन यशस्वी झाले. त्यांच्या प्रवेशामुळे भाजपमध्ये नाराजी वाढली. बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा हे नेते नाराज झाले. भाजपच्या अभियानात चंपाई यांचा फोटो गायब झाला. त्यांचा 'खेला' केल्यासारखी स्थिती आहे. अशा परिस्थितीत झारखंड विधानसभेच्या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. 'एनडीए' आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी जोरात तयारी सुरू केली आहे. भाजपने झारखंडमध्ये 'ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन' म्हणजेच 'एजेएसयू' आणि संयुक्त जनता दलासोबत आघाडी करून निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार 'एजेएसयू' या निवडणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेणार असून भाजप बॅकफूटवर असल्याचे वृत्त आहे. भाजपला बॅकफूटवर येण्यास का भाग पाडले जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरमा यांनी सांगितले की भाजप झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुका 'एजेएसयू' आणि संयुक्त जनता दल यांच्यासोबत युती करून लढवेल. मित्रपक्षांशी ९९ टक्के जागा वाटपासाठी करार झाला असून उर्वरित एक किंवा दोन जागांबाबत चर्चा सुरू आहे. 'एनडीए'मध्ये सामायिकरणाचा फॉर्म्युला जवळजवळ निश्चित झाला आहे असून 'एजेएसयू'ला मोठा वाटा मिळू शकतो तर संयुक्त जनता दलाच्या वाट्याला एक किंवा दोन जागा येऊ शकतात. भाजप 'एजेएसयू'ला ६ ते ९ जागा देण्याच्या बाजूने आहे; परंतु 'एजेएसयू'चा दावा १३ ते १५ जागांसाठी आहे. असे असले, तरी 'एजेएसयू' ला जवळपास १० किंवा ११ जागांवर निवडणूक लढवण्याची संधी मिळू शकते. भाजप ६८ किंवा ६९ जागांवर, 'एजेएसयू' ११ जागांवर, संयुक्त जनता दल दोन जागांवर आणि लोकजनशक्ती पक्ष एका जागेवर निवडणूक लढवू शकतो.

दिल्लीत झारखंड निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आहेत. 'एनडीए'मधील मित्रपक्षांची संख्या वाढत असल्याने येथे सर्वच पक्षांच्या जागा कमी होऊ शकतात. भाजपला हा त्याग करावा लागेल. 'एजेएसयू'चे सुदेश महतो यांनी कोणत्याही परिस्थितीत 'एनडीए'चा भाग रहावे, अशी भाजपची इच्छा आहे. कारण २०१९ च्या झारखंड विधानसभा निवडणुकीत भाजप आणि 'एजेएसयू'दरम्यान जागावाटपाबाबत चर्चा होऊ शकली नव्हती. तेव्हा 'एजेएसयू'ने भाजपपासून वेगळे होऊन स्वबळावर निवडणूक लढवली. 'एजेएसयू'ने ५२ जागांवर उमेदवार उभे केले होते; परंतु अहंकाराच्या या लढाईमध्ये दोन्ही पक्षांचे नुकसान झाले आणि 'एनडीए'ला सत्तेतून बाहेर पडावे लागले. ८१ जागांच्या विधानसभेत भाजपला केवळ २८ जागा जिंकता आल्या तर 'एजेएसयू'ला दोन जागा मिळाल्या. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप, 'एजेएसयू' आणि लोकजनशक्ती पक्षाने एकत्रितपणे निवडणूक लढवली होती. त्यात 'एनडीए' ने ४२ जागा जिंकल्या होत्या. त्यापैकी भाजप ३७ तर 'एजेएसयू' पाच जागा जिंकण्यात यशस्वी ठरला होता. त्यावेळी भाजपने ७२, 'एजेएसयू'ने आठ तर लोकजनशक्ती पक्षाने एका जागेवर निवडणूक लढवली होती.

सुदेश महतो कुर्मी जातीतून येतात. झारखंडमध्ये कुर्मी मतांचे समीकरण महत्त्वाचे असल्याने भाजपसाठी 'एजेएसयू' महत्त्वाची असल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार हेही याच जातीतून आले आहेत; पण झारखंडमध्ये या पक्षाला तेवढा मोठा जनाधार नाही. अशा स्थितीत संयुक्त जनता दल एक-दोन जागांवर आनंद साजरा करू शकतो. सरयू राय यांची पूर्व सिंगभूम किंवा पश्चिम सिंगभूम ही जागा संयुक्त जनता दलाच्या खात्यात जाऊ शकते. झारखंडमध्ये कुर्मी मतदार निर्णायक भूमिका बजावतात. त्यामुळे सर्व पक्ष कुर्मींवर लक्ष केंद्रित करत आहेत. काँग्रेसने केशव महातो कमलेश यांना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केले आहे. त्याचबरोबर कुर्मी मतांवर झारखंड मुक्ती मोर्चाची आधीच चांगली पकड आहे. अशा परिस्थितीत भाजपने 'एजेएसयू'सोबत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. झारखंडम ध्ये २६ टक्के




आदिवासी मतांनंतर, कुर्मी मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. ती एकूण मतांच्या सुमारे १६ टक्के आहे. गिरिडीह, धनबाद, रांची हजारीबाग आणि जमशेदपूर या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक लोकसंख्या आहे.

सुदेश महतो यांचे प्रभाव क्षेत्र रांचीच्या आसपासच्या भागात आहे; पण ते भाजपसाठी महत्त्वाचे आहेत. कारण आता 'जेबीकेएसएस' या पक्षानेही आपली उपस्थिती नोंदवली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत फक्त सुदेश महतो यांचा 'एजेएसयू' पक्ष कुर्मी मतांवर दावा करताना दिसत होता; पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत झारखंडी भाषा-खतीयन संघर्ष समिती म्हणजेच जयराम महतो यांच्या 'जेबीकेएसएस'ने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'एजेएसयू' आणि 'जेबीकेएसएस' गिरीडीह, धनबाद, रांची हजारीबाग आणि जमशेदपूर यासारख्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करतात. येथे सरासरी १६ टक्के कुर्मी लोकसंख्या राहते. तथापि, 'एजेएसयू' किंवा 'जेबीकेएसएस'ला निवडणुकीतील मोठा घटक मानले जात नाही. झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते नेते निर्मल महतो यांनी 'एजेएसयू'ची स्थापना केली होती. ते दीर्घकाळ झारखंड मुक्ती मोर्चाचे सदस्य होते. 'एजेएसयू'मध्ये देखील अनेकदा फूट पडली.

सुदेश महतो २००० पासून 'एजेएसयू'चे नेतृत्व करत आहेत. २००७ मध्ये त्यांनी पक्षाची पुनर्रचना केली. काही अपवाद वगळता 'एजेएसयू' २००० पासून सतत 'एनडीए' सोबत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला गिरिडीहची जागा जिंकण्यात यश आले. त्याच वेळी भाजप 'एजेएसयू'बद्दल जागरूक आहे. कारण महतो यांच्यासोबत राहिल्याने त्यांच्या मतांमध्ये घट होता कामा नये, यासाठी दक्ष रहावे लागणार आहे. हिमंता बिस्वा सरमा यांच्या म्हणण्यानुसार 'एनडीए'मध्ये झारखंडमधील जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असून फक्त घोषणा बाकी आहे. याआधी महतो यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत या मुद्द्यावर बैठक घेऊन चर्चा केली. शहा यांची भेट घेण्यापूर्वी, महतो आणि सरमा यांनी जागावाटपाबाबत स्वतंत्र बैठक घेतली. सध्या झारखंडमध्ये एकूण २ कोटी ५९ लाख मतदार आहेत. त्यापैकी १ कोटी ३१ लाख पुरुष आणि १ कोटी २८ लाख महिला मतदार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी २९ हजार ५६२ मतदान केंद्रे असतील. झारखंडमध्ये विधानसभेच्या एकूण ८१ जागा आहेत, त्यापैकी ४४ सर्वसाधारण, सात अनुसूचित जाती आणि २८ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत.

◇◇◇

# एक देश, एक निवडणूक आणि त्यासमोरील आव्हाने

पहिल्या टप्प्यात लोकसभा व विधानसभा यांच्या एकत्रित निवडणुका आणि दुस?या टप्प्यात महापालिका, जिल्हा परिषदा ते ग्रामपंचायती यांच्याही एकत्रित निवडणुका असा हा प्रस्ताव आहे.

लोकसभेप्रमाणेच विधानसभेचा कार्यकाळही पाच वर्षांचा असतो आणि तोही पाच वषार्पूर्वी विसर्जित केला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत एक देश, एक निवडणूक अशी व्यवस्था कशी राखायची हे सरकारसमोरील आव्हान असेल. एक देश, एक निवडणुकीवर देशातील सर्व पक्षांना एकत्र आणण्याचे मोठे आव्हान असेल, कारण यावर सर्वच पक्षांची मते भिन्न आहेत.

त्यातून बाहेर पडायचे असेल नवनव्या संकल्पनांचे सर्वांनीच मोकळ्या मनाने स्वागत करायला हवे. आता या संकल्पनेचे राजकारण कसे वळण घेते हे पाहणे तितकेच महत्वाचे ठरेल..

लोकसभेचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो, पण त्यापूवीर्ही ती विसर्जित केली जाऊ शकते. अशा परिस्थितीत एक देश, एक निवडणूक शक्य होणार नाही. एक देश, एक निवडणुकीचा फायदा राष्ट्रीय पक्षाला होईल, असे मानले जाते.

सध्या देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे घेतल्या जातात, त्यामुळे मर्यादित संख्येत ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी आहेत, परंतु जर एकाच देशात निवडणुका झाल्या, तर या मशीन्सना मागणी वाढेल. ती पूर्ण करणे एक मोठे आव्हान आहे. निवडणुका एकाच वेळी घेतल्यास अतिरिक्त अधिकारी आणि सुरक्षा दलांची गरज भासेल. अशा परिस्थितीत हेही मोठे आव्हान असेल.

**याआधी चार वेळा प्रयोग**

१९५१ ते १९६७ दरम्यान दर पाच वर्षांनी लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या. देशातील मतदारांनी १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये केंद्र आणि राज्यांना एकत्र मतदान केले. परंतु काही जुन्या राज्यांची पुनर्रचना आणि देशात नवीन राज्ये उदयास आल्याने ही प्रक्रिया १९६८-६९ मध्ये पूर्णपणे संपुष्टात आली.

**घटना दुरुस्तीसाठी बहुमत आवश्यक**

केंद्र सरकार कोविंद समितीचा अहवाल संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सादर करणार आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात हिवाळी अधिवशेन सुरू होणार आहे. मुळात, दोन महत्त्वाचे विधेयकं संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून घ्यावी लागतील. त्यामध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांशी संबंधित आहे

दुसरे नगरपालिका आणि पंचायत निवडणुकांशी संबंधित विधेयक आहे. मात्र घटनादुरुस्ती करण्यासाठी लागणारं बहुमत मात्र भाजपकडे नाही. 'विशेष' बहुमतासाठी दोन तृतीयांश मतं कमी आहेत. राज्यसभेत 52 आणि लोकसभेत 72 मतांची कमतरता असल्यामुळे दोन तृतीयांश बहुमतासाठी त्यांना विरोधी पक्षाचा पाठिंबा आवश्यक आहे. दुसरे विधेयक आणखी गुंतागुंतीचं आहे, कारण ते शहरी स्थानिक संस्था आणि पंचायत निवडणुकांशी संबंधित आहे, आणि त्यामुळे सर्व राज्यांपैकी किमान निम्म्या राज्यांची मान्यता आवश्यक आहे.



अॅड. दत्तात्रय फडतरे
पुणे.
७५८८०७२६८५

संविधानात बदल करण्यासाठी आर्टिकल 83 (जे संसदेतल्या सभागृहांच्या कालावधीशी संबंधित आहे), आर्टिकल 85 (जे लोकसभेच्या विसर्जनाशी संबंधित आहे), आर्टिकल 172 (जे राज्य विधानसभांच्या कालावधीशी संबंधित आहे), आर्टिकल 174 (जे राज्य विधानसभांच्या विसर्जनाशी संबंधित आहे) आणि आर्टिकल 356 (जे राज्यांमध्ये राष्ट्रपती शासन लागू करण्याशी संबंधित आहे) दुरुस्ती करणं आवश्यक आहे.

भाजप आणि भाजपचे सहकारी पक्षांची सध्या १९ घटक राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशावर सत्ता आहे. तर इंडिया आघाडीची ८ राज्ये आणि एक केंद्रशासित प्रदेशावर सत्ता आहे, त्यामुळेल झारखंड, हरियाणा, महाराष्ट्रात भाजपने सत्ता गमावली तरी मतदानाच्या प्रक्रियेमध्ये अडचणी येण्याची शक्यता कमी आहे. मात्र इंडिया आघाडी याचा तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे प्रक्रियेत आणखी अडथळे येण्याची शक्यता आहे. निवडणूक मशीनसाठी दोन वर्षाचा कालावधी गरजेचा आहे.

एक देश, एक निवडणूक संकल्पने अंतर्गत तीन निवडणुका एकत्र घेण्यासाठी तिप्पट ईव्हीएम, व्हीव्हीपॅट आणि कर्मचारी लागतील. मोठया प्रमाणावर सुरक्षा रक्षक लागतील. सध्या 20 लाख ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशीन आहेत. त्याच्या तिप्पट म्हणजेच 60 लाख ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनचा वापर करावा लागेल.

म्हणजेच दोन्ही प्रकारची 40 लाख मशीन्स तयार करावी लागतील. हे एका दिवसात होऊ शकत नाही. दोन ते तीन वर्षे त्यासाठी जातील. त्यासाठी हजारो कोटींचा खर्चही येईल. हे लक्षात घेता आपण निवडणुकीचा खर्च वाचवण्यासाठी एक देश, एक निवडणुकीसारखी संकल्पना आणणे म्हणजे प्रचंड खर्चात पडणे असाच त्याचा अर्थ होतो.

आचारसंहितेच्या काळात सर्व कामे ठप्प होतात हे निव्वळ मिथ आहे. या काळात तुम्ही कोणतीही नव्या योजनेची घोषणा करू शकत नाही. चार वर्षे 11 महिने तुम्ही सत्तेत असता तेव्हा तुम्हाला योजना सुचत नाहीत आणि निवडणुकीच्या दोन आठवडयांआधी तुम्हाला नव्या योजना सुचतात आणि मग तुम्ही निवडणूक आयोगाला दोष देता, हे चुकीचे आहे.

**एकत्रीत निवडणुकीचा फायदा कोणाला?**

हे सगळं करून देशाचा काही फायदा होण्याची सुतराम शक्यता नाही. ना निवडणुका जास्त शुद्ध होतील ना जास्त लोकाभिमुख सरकारे येतील. उलट, त्याचे परिणाम देशातील लोकशाहीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणारेच ठरतील.

वर उल्लेख केल्याप्रमाणे फायदा झालाच तर राष्ट्रीय म्हणजे मोठ्या पक्षांचा होईल आणि वेळोवेळी जो पक्ष केंद्रात प्रभावी असेल, त्याला आपला फायदा करून घेऊन राज्यांमध्ये सुद्धा आपली सरकारे आणता येतील. ज्या राज्यांमध्ये 1989 ते 2014 या काळात लोकसभेच्या बरोबर निवडणुका झाल्या तिथे असं दिसतं की लोकसभेत जिंकणाऱ्या पक्षाला राज्यामध्ये सुद्धा फायदा होतो.

**निवडणूक प्रक्रियेत अनेक खाचखळगे**

पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा एकाच वेळी तर दुस?या टप्प्यात सार्वत्रिक निवडणुकीच्या 100 दिवसांच्या आत पंचायत आणि नगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हाव्यात, असा प्रस्ताव आहे. परंतु पहिल्या टप्प्यात निवडणुका झाल्यानंतर थकलेल्या दीड कोटी निवडणूक कर्मचाऱ्यांना पुन्हा निवडणूक प्रक्रियेसाठी जुंपणार हे अत्यंत चुकीचे आहे

**नवनव्या संकल्पनांचे स्वागत करायला हवे..**

संसदीय लोकशाहीचा देह जसा महत्त्वाचा तितकाच तिचा आत्माही मोलाचा असतो. या दोन्हींची स्थिती सध्या चिंता वाटावी, अशी आहे. त्यातून बाहेर पडायचे असेल नवनव्या संकल्पनांचे सर्वांनीच मोकळ्या मनाने स्वागत करायला हवे. आता या संकल्पनेचे राजकारण कसे वळण घेते, हे संसदेच्या हिवाळी अधिवेशनात दिसेलच.

पहिल्या टप्प्यात लोकसभा व विधानसभा यांच्या एकत्रित निवडणुका आणि दुस?या टप्प्यात महापालिका, जिल्हा परिषदा ते ग्रामपंचायती यांच्याही एकत्रित निवडणुका असा हा प्रस्ताव आहे. आज देशात निवडणुकांचा मोसम नसतो असा काळ क्वचितच येतो. सतत कुठे ना कुठे, कोणती ना कोणती निवडणूक चालूच असते. या निवडणुकांचा सरकार व नोकरशाहीच्या एकूण कार्यक्षमतेवर काय परिणाम होतो आणि देशाच्या विकासाच्या वाटचालीवर हा माहोल विपरीत परिणाम करतो का, हा मोलाचा प्रश्न आहे. त्याची देशव्यापी, सखोल चर्चा राजकीय अभिनिवेश बाजूला अधिक व्यापकपणे चर्चा होण्याची गरज आहे.

■ ■ ■

# हवामान, निवडणुका आणि गरिबाच्या घरातील प्रकाश

पावसाळा संपला आणि निवडणुकीचा हंगाम येत आहे.आधी पावसाने हाहाकार माजवला. आता निवडणूक रिंगणात गोंगाट सुरू झालाय. आरोप-प्रत्यारोपांची झड लागलेली आहे. कुठे मेघ-मल्हार सुरू आहे, तर कुठे मियाँ का मल्हार!

जम्मू-काश्मीरमध्ये मतदानाच्या तीनही फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. आता फक्त निकालाची प्रतीक्षा आहे. मतदानाची टक्केवारी वाढणं किंवा घटणं हे लोकशाहीसाठी चांगलं लक्षण आहे. काश्मीरमधील मतदानाचे सर्व टप्पे पार पडल्यानंतर काही दिवस सर्व नेते आणि त्यांचे लक्ष हरियाणावर होते. तेथेही ५ ऑक्टोबरला मतदान झाले.

दरम्यान, महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये प्रमुख राजकीय पक्षांनी निवडणुकीचे बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली आहे. काश्मीर आणि हरियाणानंतर महाराष्ट्रात सर्वात मोठी आणि रंजक स्पर्धा रंगणार आहे. महाराष्ट्रातील महायुती आघाडीत भाजप, शिंदे गटातील शिवसेना आणि अजित गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश आहे. मात्र, यावेळच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल लोकसभा निवडणुकीपेक्षा काहीसे वेगळे असू शकतात. मराठा आंदोलनाचे जरांगे पाटील सध्या थंडावले आहेत. ते कोणत्या पक्षाचे किती नुकसान करू शकतील, हे सांगता येणार नाही.

जरांगे पाटील यांना महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही गटांकडून छुपा पाठिंबा मिळत आहे. त्यामुळेच यंदा लोकसभा निवडणुकीनंतर जरांगे यांचा प्रभाव काही प्रमाणात कमी होताना दिसत आहे. तरीही त्याचा काहीसा परिणाम मराठवाड्यात नक्कीच दिसून येईल. महाविकास आघाडीत उद्धव गटाची शिवसेना, शरद गटाची राष्ट्रवादी आणि काँग्रेसची युती आहे. नुकतेच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी एक वक्तव्य करून मोठी खळबळ उडवून दिली आहे. त्यांना स्टेजवर अचानक चक्कर आली, त्यानंतर लगेचच ते म्हणाले- मी ८३ वर्षांचा आहे, पण पंतप्रधान नरेंद्र मोदींना हटवल्याशिवाय मी मरणार नाही!

पंतप्रधानांनीही माहिती घेऊन खरगे यांच्या प्रकृतीची प्रकृतीची विचारपूस केली असली तरी भाजपने म्हटले - बघा, काँग्रेस आणि त्यांचे नेते पंतप्रधान मोदींचा किती तिरस्कार करतात; पाणी पिऊन-पिऊन त्यांना दोष देण्यात व्यग्र राहतात. मात्र, हे वर्ष उत्तरार्धात निवडणुकीच्या धामधुमीने भरलेले असेल.

जम्मू-काश्मीर आणि हरियाणापाठोपाठ आता महाराष्ट्र आणि झारखंडमध्येही निवडणूक होणार आहे. हरियाणात कोणताही पक्ष जिंकला तरी महाराष्ट्रात नवी ऊर्जा मिळेल. शेवटी, राजकारणातील भूतकाळातील यश अनेकदा पुढील क्षेत्रात प्रभावी ठरते.

निवडणुकीतील आश्वासने काहीही असली तरी इथल्या खऱ्या गरिबांची कोणालाच चिंता नाही. त्या सर्वसामान्य गरिबाची अवस्था कोणालाच माहीत नाही. कुणाला जाणून घ्यायचेही नाही. तो निरागस रात्री अनेक तास बसून, दुसऱ्या सकाळची आणि त्यानंतरच्या दुसऱ्या रात्रीची वाट पाहत राहतो. त्याच्या घराच्या सुन्या भिंतीतील रिकामी खिडकी हेच आता त्याचे भांडवल आहे.

अनेक महिने, वर्षे ती खिडकी त्याला धोका देत आली आहे. प्रकाश आत येतो आणि आपोआप परत जातो. हा प्रकाश आपल्या छातीत भरण्याचा तो प्रयत्न करत राहतो, पण प्रयत्न यशस्वी होत नाहीत. प्रकाश कुठेही थांबू शकत नाही. अखेर लोकशाहीत निवडणुकीशिवाय प्रकाश मिळवण्याचा दुसरा मार्ग तरी कुठे आहे? पण, सत्य हेही आहे की, पहाट कोणत्याही निवडणुकीमुळे नाही, तर ती रात्रभर अंधार हळूहळू कुरतडणाऱ्या त्या गरीब माणसाच्या रडण्यामुळे उजाडते! ■ ■

# कहै कबीर तिहू लोक में, सुखी न देखा कोय...

आपण प्रपंच, व्यवसाय, आपलं आवडीचं क्षेत्र आणि सामाजिक संपर्क यामुळं वेगवेगळ्या माणसांशी जोडून असतो. त्यांच्या सहवासात राहून आपण आपलं जीवित-कार्य पार पाडत असतो. अशा व्यक्तींचे स्वभाव जाणून घ्यायला आपल्याकडं अवकाश असतो. आपल्या प्रवृत्तींना छेद देणाऱ्या माणसांसोबत कधी आपण स्वस्थपणे राहतो, तर कधी आपल्या मनाला अस्वस्थता येते.

प्रस्थापित समाजव्यवस्थेत आपल्या मनाचं समायोजन करणं खूप आव्हानात्मक आहे. आपल्याला हे कधी कळत असतं, तर कधी कळतही नाही. मनाच्या नकळत्या स्थितीत कुणाच्या संगतीत आपण असावं, याचं यथार्थ ज्ञान होणं खूप महत्त्वाचं आहे. सुसंगत आणि कुसंगत असा वरवरचा भेद न करता सत्संगाचा खरा अर्थ ज्याचा त्यालाच शोधावा लागेल.

आपल्याला सत्संगाचा आशय कधी उमजणं शक्य आहे? रोजच्या जगण्यात ज्याच्या संगतीत आपल्याला खरी आवड, मनाचा खरा कल जाणवतो तो सत्संग आहे? की आवड बदलते, कल बदलतो आणि स्वभाव मात्र बदलत नाही, हे ज्याच्या संगतीत कळतं तो सत्संग आहे? की देहा-मनावरच्या संस्कारांनी बांधून घेण्याच्या आपल्या सवयींना जाणून मोकळेपणाची दिशा देणाऱ्याचा निरपेक्ष सहवास हा सत्संग आहे?

जीवनव्यवहारात तत्पर असूनही पुन्हा मोकळं असणाऱ्या सत्त्वशील माणसाची ओढ आपल्या मनाला सतत वाटत असते. आपण त्याच्यासारखं जगावं, त्याच्या ठायी असलेल्या गुणांना जाणून त्याचं अनुसरण करावं, असं आपल्या मनाला नेहमी वाटत असतं. म्हणूनच संगत- कुसंगत यांतल्या भेदानं गोंधळून गेलेल्या आपल्या मनाला सत्संगाविषयीचं कुतूहल वाटत राहतं. कबीर आपल्या दोह्यांतून सत्संगाविषयीचा आशय व्यक्त करतात...

*साखी शब्द बहुतै सुना,*
*मिटा न मन का दाग।*
*संगति सो सुधरा नहीं,*
*ताका बडा अभाग।।*

आपलं स्वाभाविक कर्म उत्साहानं आणि प्रामाणिकपणानं करणं, हाच आपल्या जीवनातील रुक्षतेला दूर करणारा ओलावा आहे. हा ओलावा आध्यात्मिक ग्रंथांतून, सत्त्वशील माणसांच्या प्रवचनांतून, उपदेशातून आणि मौनसंगातूनही लाभत असतो. पण, आपण खऱ्या प्रेमाचे भुकेले असू तरच हा ओलावा लाभेल.



हेमकिरण पत्की

या बदलत्या जगात सूर्य-चंद्र नित्य उजेड देत असतात. भूमी धारण करीत असलेला ओलावा चिरंतन असतो. आपल्या मृत्यूनंतरही सूर्य-चंद्राचा उजेड, भूमीतील हा ओलावा मागं राहणार आहे. तो शाश्वत आहे. सृष्टीतील या नित्यतेला समजून घेऊन आपण रोजच्या जगण्यातले व्यवहार पार पाडले नाहीत, तर आपलं मन निर्मळ राहणार नाही. लख्ख आरशासारख्या असणाऱ्या ग्रंथांच्या जगात आपण डोळे असून अंध असू. संधी असून अभागी असू.

*जीवन जोबन राज मद,*
*अविचल रहै न कोय।*
*जु दिन जाय सत्संग में,*
*जीवन का फल सोय।।*

आयुष्य, तारुण्य, राज्य आणि तथाकथित सत्तेची धुंदी कायम टिकणारी नाही. या साऱ्या गोष्टी उतार पडणाऱ्या आहेत. एकेक करून माणसाच्या पकडीतून निसटून जाणाऱ्या आहेत.

कबीर म्हणतात, जो नाशवंत आणि अविनाशी गोष्टींचा सारासार विचार करत असतो, तोच एकमेव सत्तेला जाणून देहभावाला आणि मनोभावाला बाजूस सारत असतो. तो त्याच्या ठायी असलेल्या शुद्ध मी सोबत असतो. बदलत्या निसर्गक्रमाला शांतपणे समजून घेत जीवनगतीनं चालत असतो. कबीर सांगतात की, सत्य जाणणाऱ्या आणि त्याला अनुसरणाऱ्या वडीलधाऱ्यांच्या मार्गानं आपली पावलं पडत जाणं, हा सत्संगच आहे. अशा सत्संगानं आपल्या वृत्तीत चांगला बदल होऊ शकेल.

सार्थक आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असलेली प्रेम, माणुसकी, करुणा यांसारखी मूल्यं जगणारी कितीतरी सत्त्वशील माणसं आपल्या जन्माआधी या भूतलावर होऊन गेली आहेत. या काळातही अशी थोर माणसं आहेत. त्यांच्या जीविताचा अभ्यास करण्यानं, त्यांच्यासारखाच ध्यास घेण्यानं तसेच आपल्या वाट्याला आलेलं कर्म हे दैव, परिस्थिती किंवा एखादी व्यक्ती यांच्याविषयी तक्रार न करता पार पाडण्यानं भ्रमाची संगत धरण्याची दुर्बुद्धी होणार नाही. अशा संगतीविषयी कबीर म्हणतात...

*साद संग अन्तर पडे,*
*यह मति कबहूँ होय।*
*कहै कबीर तिहू लोक में,*
*सुखी न देखा कोय।।*

जग सतत बदलत असतं. मृत्यू निश्चित असतो. मग मृत्यू समजून घेऊन बदलत्या स्थितीगतीचा भाव दूर सारून संतांची कायम संगत केली, तर सद्बुद्धी अबाधित राहते आणि तीच अंतरीचा ज्ञानदिवा होते. या तिन्ही लोकांत सत्संगानं चेतवलेला दिवा कुणीच मालवू शकत नाही. भ्रमाचा, भ्रांतीचा आणि अस्तित्व नसलेल्या कुठल्याही वस्तूचा संग जाणून घेतला की, कबीरांचा ह्यसत्संगाह्नचा अर्थ आपल्या हृदयात उतरू शकेल.आपण तो जाणतेपणानं उतरवून घ्यायला हवा.

■ ■ ■



# अक्षय शिंदेचं काय झालं?

डॉ. श्रीरंग गायकवाड

बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा पोलिसांनी एन्काउंटर केला. त्यानंतर, आता खरा न्याय झाला, या भावनेनं पेढे वाटले गेले.

मुळात हे बालिकांवरील अत्याचाराचं कृत्य अत्यंत घृणास्पद होतं आणि त्यातील गुन्हेगाराला कठोर शिक्षा व्हायलाच पाहिजे, याबद्दल कुणाचंही दुमत नाही. मात्र, अशा प्रकारे न्याय मिळवण्याची मानसिकता लोकांमध्ये वाढू लागणं, हे जास्त चिंताजनक आहे. त्यामुळंच या एन्काउंटरनंतर अनेक प्रश्नांचं मोहोळ उठलं आहे.

शाळेतील बालिकांवर अत्याचार झाल्याचं उघडकीस आल्यानंतर बदलापुरात मोठा उद्रेक झाला. २० ऑगस्टला मोठं आंदोलन झालं. हजारो आंदोलकांनी रेल्वे वाहतूक बंद पाडली. मंत्री गिरीश महाजन त्या खवळलेल्या जनसमुदायाला सामोरे गेले, तेव्हा गर्दीतून फक्त फाशी, फाशी... एवढाच संतप्त घोष ऐकू येत होता. महाजनांचं ऐकून घ्यायला कोणीही तयार नव्हतं. पीडित तुमची मुलगी असती तर? असा सवालही महाजनांना विचारला गेला. त्यावर, आपल्याकडं कायदा, न्यायव्यवस्था आहे. त्यानुसार गुन्हेगाराला कठोरात कठोर शिक्षा दिली जाईल... वगैरे महाजन समजावत होते. पण, ते ऐकण्यात कोणालाही रस नव्हता. वातावरणच तेवढं तापलेलं होतं. ते साहजिकही होतं. ज्यांना आपल्याबाबतीत काय घडलं ते नीट सांगताही येणार नाही, अशा बालिकांवर अत्याचार झाला होता. त्यामुळं लोकांचा राग अनाठायी नव्हता.

आता या घटनेला महिना उलटल्यानंतर यातील आरोपी अक्षय शिंदेचा पोलिसांनी एन्काउंटर केल्याची बातमी आली. त्यानंतर काही ठिकाणी पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात अक्षय शिंदेचा मृत्यू झाल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर पोलिसांनी फेक एन्काउंटर केलेलं नाही, असा खुलासा गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केला. दुसऱ्या दिवशी मुंबईत ठिकठिकाणी गृहमंत्री फडणवीस यांची हातात बंदूक घेतलेल्या फोटोंसह बदला पुरा असं लिहिलेली होर्डिंग झळकली.

सोशल मीडियावरून या प्रकरणी देवा भाऊ अर्थात फडणवीसांनी कसा न्याय दिला आहे, अशा पोस्ट व्हायरल झाल्या. त्यात या न्यायाची कोलकातामधील अत्याचार प्रकरणाशी तुलना करण्यात आली. मुख्यमंत्री शिंदे यांच्या समर्थकांनीही न्याय देणारा असा हा धर्मवीर अशी पोस्टर्स सर्वत्र झळकावली.

विरोधी पक्षांनी यावर जोरदार टीका केली. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यात सिंघम कोण यावरून भांडणं सुरू आहेत, फडणवीसांच्या मतदारसंघात महिलांवरील अत्याचाराच्या १०० हून अधिक घटना घडल्या, तिथं किती लोकांचा एन्काउंटर करण्यात आला? असा सवाल खासदार संजय राऊतांनी विचारला. जिथं अत्याचाराचा प्रकार घडला, त्या शिक्षण संस्थेच्या भाजपशी संबंधित संचालकांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोपही त्यांनी केला.

विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी, या प्रकरणात पहिल्यापासूनच आमचा पोलिसांवर विश्वास नाही. आता या घटनेची न्यायिक चौकशी व्हावी, अशी मागणी केली. तर, यात गृह विभागाने दाखवलेला हलगर्जीपणा संशयास्पद आहे. या घटनेच्या सखोल चौकशीतून वस्तुस्थिती समोर यावी, अशी अपेक्षा शरद पवारांनी व्यक्त केली.

दुसरीकडे, या एन्काउंटर प्रकरणी झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने पोलिसांना अनेक प्रश्न विचारले. आरोपी अक्षयने पिस्तुल कसे हिसकावले? ते आधीच लोड कसे होते? असे विचारतानाच न्यायालयाने, यावर आमचा विश्वास बसत नाही, अशी टिप्पणी केली. शिवाय, कोणताही सामान्य माणूस पिस्तूल हिसकावून गोळी झाडू शकत नाही, कोणताही कमजोर माणूस ते लोड करू शकत नाही, असे निरीक्षणही नोंदवले.

अक्षयने तीन गोळ्या झाडल्या, असं तुम्ही म्हणालात. एक गोळी पोलिसाला लागली. मग इतर दोन गोळ्या कुठं आहेत? गोळी पायावर किंवा हातावर का मारली नाही? अक्षयच्या डोक्यात एका बाजूनं घुसलेली गोळी दुसऱ्या बाजूला कुठं गेली? इतर अधिकाऱ्यांनी अक्षयला रोखलं का नाही? असे अनेक प्रश्न विचारत हे एन्काउंटर असू शकत नाही, असे सांगत न्यायमूर्तींनी, सर्व घटनाक्रमाचे व्हिडिओ फुटेज, जखमी पोलिसाचा वैद्यकीय अहवाल, फॉरेन्सिक अहवाल सादर करावा, असे आदेश दिले.

याचा अर्थ विरोधी पक्षांपासून न्यायालयापर्यंत सर्वांनाच या एन्काउंटरविषयी साशंकता वाटते आहे. मुळात बदलापूरमध्ये बालिकांवर झालेल्या अत्याचाराचं कृत्य अत्यंत घृणास्पद होतं आणि त्यातील गुन्हेगाराला कठोर शिक्षा व्हायलाच पाहिजे, याबद्दल कुणाचंही दुमत नाही. मात्र, अशा प्रकारे न्याय मिळवण्याची मानसिकता लोकांमध्ये वाढू लागणं, हे जास्त चिंताजनक आहे. त्यामुळंच या एन्काउंटरनंतर अनेक प्रश्नांचं मोहोळ उठलं आहे.

कायदेशीर मार्गाने न्याय मिळण्यास उशीर होतो, त्यामुळं याप्रकारे बदला घेत हिरो न्याय मिळवून देतो, अशा थीमवर अनेक नाटके, सिनेमे आले. मात्र, विवेकवादी आणि पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात कायद्यावर, न्यायप्रक्रियेवर अजूनही विश्वास ठेवला जातो. म्हणून तर सामाजिक कार्यकर्त्यांचे दिवसाढवळ्या खून होऊनही न्याय मिळण्यासाठी वर्षानुवर्षे शांततापूर्ण आंदोलने केली जातात. अगदी कसाबसारख्या राष्ट्राच्या शत्रूलाही न्यायालयीन प्रक्रियेतूनच शिक्षा देऊन जगापुढं आदर्श ठेवला जातो.

तुलनेने उत्तर आणि दक्षिण भारतात मात्र सिनेमातील असा न्याय प्रत्यक्षातही देण्याचा प्रघात पडला आहे. अलीकडच्या काळात उत्तर प्रदेशने अशा न्यायदानात आघाडी घेतली आहे. दक्षिणेतील हैदराबादचं एन्काउंटर प्रकरण अजूनही देशाच्या लक्षातून गेलेलं नाही.

तिथे २०१९ मध्ये एका व्हेटर्नरी डॉक्टर असलेल्या तरुणीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. त्या प्रकरणातील चारही आरोपींना पोलिसांनी एन्काउंटरमध्ये ठार केलं. त्यावेळी फुलं उधळत लोकांनी पोलिसांचं समर्थन केलं. मात्र, या प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीने पोलिसांनी या चौघांची नियोजनपूर्वक हत्या केल्याचा निष्कर्ष काढला. महाराष्ट्रालाही तसा एन्काउंटर हा प्रकार काही नवा नाही. १९८० - ९० च्या दशकात मुंबईतील अंडरवर्ल्डला रोखण्यासाठी पोलिसांनी हीच पद्धत वापरली. त्यासाठी स्वतंत्र पथकच तयार झालं. 'एन्काउंटर स्पेशालिस्ट' म्हणून काही अधिकारी हिरोही झाले.

प्रदीप शर्मा त्यापैकीच एक. त्यांनी सुमारे १०० एन्काउंटर केल्याचं सांगितलं जातं. छोटा राजनचा सहकारी लखन भैय्या एन्काउंटर प्रकरणी अखेर शर्मांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. आता अक्षय शिंदेचा मृत्यू ज्यांच्या गोळीमुळं झाला, त्या पोलिस अधिकाऱ्याने प्रदीप शर्मांसोबत काम केलं होतं, अशी माहिती समोर येत आहे.

बदलापूरमध्ये ज्या चिमुकलीवर अत्याचार झाला, तिची गरोदर आई तक्रार देण्यासाठी गेली असताना तिला १२ तास ताटकळत ठेवण्यात आलं. तेच पोलिस एवढे कार्यतत्पर कसे झाले, असा प्रश्नही विचारला जात आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे होता. त्याच्या मृत्यूमुळं आता न्यायालयात गेलेलं अत्याचाराचं हे प्रकरणही बंद करण्यात येईल, असा अंदाज व्यक्त होत आहे.

त्याचवेळी माहिती अधिकार कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी, मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली आहे. बदलापूरमधील सदर शाळेच्या विश्वस्तांवरच मानवी तस्करी आणि चाइल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा आरोप त्यामध्ये केला आहे. यात काही बड्या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळं या प्रकरणाचा तपास सीबीआय म्हणजे केंद्रीय अन्वेषण विभागाकडे द्यावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

कायद्याचा असा कीस आता पडतच राहील. पण, मुद्दा उरतो तो समंजस समाज म्हणून आपण दाखवत असलेल्या मानसिकतेचा. आजूबाजूला अनेक अनैतिक व्यवहार, गैरप्रकार, भ्रष्टाचार घडताना दिसतात. त्या प्रत्येकाला आपण अशाच प्रकारे शिक्षा देण्याची मागणी करणार आहोत का? अत्याचाराची घटना समोर आली, तेव्हा बदलापूर रेल्वे स्टेशनवर मोठं आंदोलन झालं. हे आंदोलन पेटवण्यात विरोधकांचा हात आहे, असा सत्ताधाऱ्यांचा आरोप होता. महिनाभरानंतर या प्रकरणी न्याय करून बाजी मारल्याचा आनंदही त्याच स्टेशनवर साजरा करण्यात आला. या प्रकारे आता निवडणुकीपर्यंत अशा प्रकारचे कुरघोडीचे खेळ होणारच नाहीत, याची खात्री कोण देऊ शकेल?

सत्तेचा खेळ दाखवणारा सामना हा मराठी सिनेमा १९७० च्या दशकात फार गाजला. त्यात मारुती कांबळे नावाच्या माणसाचा काटा काढला जातो. त्यानंतर नैतिकतेची चाड असणारा, डॉ. श्रीराम लागूंनी साकारलेला गावातील भणंग मास्तर सतत सिनेमाभर मारुती कांबळेचं काय झालं? असं विचारत राहतो.

या सिनेमाची, त्यातील राजकारणाची आणि मारुती कांबळेची आठवण यावी, अशी सध्याची परिस्थिती आहे. अर्थात, सामनातील मारुती कांबळे ही निवृत्त सैनिकाची व्यक्तिरेखा होती आणि त्या प्रसंगाला जात-वर्गसंघर्षाची किनार होती. त्याची तुलना अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या या नराधमाशी कधीच होऊ शकत नाही.

पण, राजकीय सत्तासंघर्षाच्या अस्वस्थ पार्श्वभूमीवर होणाऱ्या अशा मृत्यूचं गूढ मात्र सगळीकडं सारखंच असतं. त्यामुळं पुढच्या काळातही अक्षय शिंदेचं काय झालं? असा प्रश्न ऐकू येत राहिला, तर नवल वाटू नये!

■ ■ ■

महासागर

# ग्लॅम वर्ल्ड

रविवार ■ दि. ६ आक्टोबर २०२४

## ३५० हून अधिक चित्रपटात काम
# दादासाहेब फाळके पुरस्काराचा मानकरी मिथुन चक्रवर्ती





यंदाचा दादासाहेब फाळके पुरस्कार मिथुन चक्रवर्ती यांना देण्यात येणार आहे. नुकतेच केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी त्याची अधिकृत घोषणा केली आहे.

वैष्णव म्हणाले,आम्हाला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की दादासाहेब फाळके निवड ज्युरीने भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल या वर्षी दिग्गज अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे.

8 ऑक्टोबर 2024 रोजी होणाऱ्या 70 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात मिथुन चक्रवर्ती यांना हा सन्मान देण्यात येणार आहे.

16 जून 1950 रोजी कोलकाता येथे जन्मलेल्या मिथुनदा यांनी बंगाली, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड, ओडिया आणि भोजपुरी अशा विविध भाषांमध्ये 350 हून अधिक चित्रपट केले आहेत. तीन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि दोनदा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे.

मिथुन चक्रवर्ती यांना त्यांचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार 'मृगया' चित्रपटासाठी मिळाला. बुद्धदेव दासगुप्ता यांच्या 'तहादर कथा' या बंगाली चित्रपटासाठी दुसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. या चित्रपटात मिथुन यांनी स्वातंत्र्यसैनिकाची भूमिका साकारली होती.

तिसरा राष्ट्रीय पुरस्कार 'स्वामी विवेकानंद' चित्रपटासाठी मिळाला. या चित्रपटात मिथुन यांनी रामकृष्ण परमहंस यांची भूमिका साकारली होती. काही कारणांमुळे हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकला नाही. जानेवारी २०२४ मध्ये मिथुन चक्रवर्ती यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मिथुन चक्रवर्ती यांचे 1989 साली 19 चित्रपट प्रदर्शित झाले होते, ज्यामध्ये ते मुख्य अभिनेता म्हणून दिसले होते. त्यांच्या या विक्रमाची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. या घटनेला जवळपास 35 वर्षे झाली आहेत, परंतु आजपर्यंत एकही अभिनेता हा विक्रम मोडू शकलेला नाही. 1982 मध्ये आलेला डिस्को डान्सर हा 100 कोटींची कमाई करणारा हिंदी चित्रपटातील पहिला चित्रपट आहे. ■ ■ ■

## मिथुन चक्रवर्ती यांच्या 10 दमदार भूमिका

| | |
|---|---|
| भूमिका : घिनुआ<br>**मृगया (1976)** | भूमिका : गन मास्टर जी-9<br>**सुरक्षा (1979)** |
| भूमिका : भीमा<br>**हम पांच (1980)** | भूमिका : जिम्मी/अनिल<br>**डिस्को डांसर (1982)** |
| भूमिका : शंकर धर्मा<br>**बॉक्सर (1984)** | भूमिका : जावर प्रताप<br>**गुलामी (1985)** |
| भूमिका : राजा भैया<br>**प्रेम प्रतिज्ञा (1989)** | भूमिका : कृष्णन अय्यर एमए<br>**अग्निपथ (1990)** |
| भूमिका : शिबनाथ<br>**तहादेर कथा (1992)** | भूमिका : रामकृष्ण परमहंस<br>**स्वामी विवेकानंद (1998)** |

## बिग बॉस १८ ची सर्वाधिक मानधन घेणारी कंटेस्टंट निया शर्मा
# दररोज आकारणार ५.४ लाख रुपये



टेलिव्हिजनचा लोकप्रिय रि?लिटी बिग बॉस 18 6 ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. शोमध्ये दिसण्यासाठी अनेक स्पर्धकांची नावे सातत्याने पुढे येत आहेत. या सीझनची पहिली कन्फर्म केलेली स्पर्धक निया शर्मा असणार आहे, जी सुहागन चुडैल, एक हजारों में मेरी बहना है आणि नागिनसाठी प्रसिद्ध आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर निया शर्मा या सीझनची सर्वात महागडी स्पर्धक असणार आहे.

बिग बॉसचे निमार्ते निया शमार्ला घरात घालवलेल्या प्रत्येक दिवसासाठी 5 लाख 40 हजार रुपये देणार असल्याच्या बातम्या आहेत. अशा परिस्थितीत ती दर आठवड्याला 37 लाख 80 हजार रुपये आकारणार आहे. बिग बॉसच्या निर्मात्यांनी निया शमासोबत केवळ 15 दिवसांसाठी करार केला आहे.

अलीकडे, खतरों के खिलाडी 14च्या फिनालेमध्ये, रोहित शेट्टीने नियाच्या बिग बॉसमध्ये प्रवेशास मान्यता दिली होती. या सीझनमधील अंतिम स्पर्धकांपैकी एक बिग बॉसमध्ये जाणार असल्याची घोषणा त्यांनी मंचावर केली होती. नियाचे नाव पुढे घेत रोहितने तिचे अभिनंदन केले. नियाने हे मान्य केले आणि शोमध्ये जाण्यास होकार दिला. निया याआधीही बिग बॉस ओटीटीचा भाग राहिली आहे. एका टास्कच्या निमित्ताने ती काही तासांसाठी शोमध्ये दाखल झाली होती.

लोकप्रिय टीव्ही शो कुंडली भाग्य अभिनेता धीरज धूपरची या शोमध्ये एन्ट्री निश्चित मानली जात आहे. अभिनेत्री सुरभी ज्योती, ये जादू है अभिनेता शहजाद धामी, शोएब इब्राहिम आणि नायरा बॅनर्जी देखील शोमध्ये प्रवेश करू शकतात.

वृत्तांवर विश्वास ठेवला तर, बॉलीवूड अभिनेत्री समीरा रेड्डी, उर्मिला मातोंडकर आणि शिल्पा शिरोडकर यांनादेखील शोचा भाग होण्यासाठी संपर्क साधण्यात आला आहे. ■ ■ ■

## हृतिक रोशनचं दुसरं लग्न झालंय?



पहिली पत्नी सुझान खान हिला घटस्फोट दिल्यानंतर अभिनेता हृतिक रोशन याच्या आयुष्यात सबा आझाद हिची एन्ट्री झाली. गेल्या अनेक वर्षांपासून दोघे एकमेकांना डेट करत आहेत. सोशल मीडियावर देखील हृतिक आणि सबा यांचे अनेक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात.

दोघांनी अनेकदा एकमेकांवर असलेलं प्रेम देखील सर्वांसमोर व्यक्त केलं आहे. सबा हिच्यासोबत रिलेशनशिप असल्यामुळे अभिनेत्याला अनेकदा ट्रोल देखील करण्यात आलं. आता देखील एका पोस्टमुळे हृतिक आणि सबा यांचं नातं चर्चेत आलं आहे. हृतिक रोशन याने सबा हिच्यासोबत एक फोटो पोस्ट केला आहे. अभिनेत्याची पोस्ट पाहिल्यानंतर काही चाहते चकीत झाले आहेत.

फोटो पोस्ट करत अभिनेत्याने कॅप्शनमध्ये ह्यहॅप्पी एनिव्हर्सरी पार्टनर असं लिहिलं आहे. ज्यामुळे चर्चांना उधाण आलं. सध्या अभिनेत्याची पोस्ट तुफान व्हायरल होत आहे.

पोस्टवर हृतिकची पहिली पत्नी सुझान खान हिने देखील कमेंट केली आहे. सुपर फोटो असं सुझान म्हणाली आहे. हृतिकची बहीण पश्मिनाने देखील ओह माय डे अशी कमेंट केली आहे.

एवढंच नाही तर, सबा हिने देखील अभिनेत्या सोबत फोटो पोस्ट करत हॅप्पी 3 इयर्स पार्टनर असं कॅप्शन दिलं आहे.

हृतिक आणि सबाच्या रिलेशनशिपला आज तीन वर्ष पूर्ण झाली आहेत. ■ ■



## आता चौथ्या लग्नासाठी सज्ज

झगमगत्या विश्वात अनेक सेलिब्रिटी आहेत ज्यांनी दोन पेक्षा अधिक लग्न केली आहे. आता एका प्रसिद्ध अभिनेत्रीच्या चौथ्या लग्नाची चर्चा रंगली आहे. या अभिनेत्रीचे तीन लग्न अपयशी ठरलेत. शिवाय अभिनेत्री तीन मुलांची आई देखील आहे. आता अभिनेत्री चौथ्या लग्नाच्या तयारीत आहे.

सध्या सर्वत्र अभिनेत्रीच्या खासगी आयुष्याची चर्चा रंगली आहे. सध्या ज्या अभिनेत्रीच्या चौथ्या लग्नाची चर्चा रंगली आहे, ती अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून तमिळ अभिनेत्री वनिता विजयकुमार आहे.

वनिता हिने कोरियोग्राफर रॉबर्ट याच्यासोबत चौथ्या लग्नाची घोषणा केली आहे. वनिता आणि रॉबर्ट यांच्या लग्नाची तारिख देखील समोर आली आहे. येत्या ५ ऑक्टोबर रोजी वनिता आणि रॉबर्ट लग्न करणार आहेत. वनिता हिने इन्स्टाग्राम स्टोरीवर रॉबर्ट याला प्रपोज करताना एका फोटो पोस्ट केला आहे. ज्यामध्ये अभिनेत्री गुडघ्यांवर बसून रॉबर्टला प्रपोज करताना दिसत आहे.

वनिता हिच्याबद्दल सांगायचं झालं तर, अभिनेत्री दिग्गज तामिळ अभिनेते विजय कुमार यांची दुसरी पत्नी मंजुला यांची मुलगी आहे. वनिता हिने अनेक मालिका आणि सिनेमांमध्ये महत्त्वाची भूमिका साकारत चाहत्यांचं मनोरंजन केलं आहे.


वनिता कायम तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत असते. वनिता हिचं पहिलं लग्न २००० मध्ये अभिनेता आकाश याच्यासोबत झालं होतं. वनिता आणि आकाश यांना दोन मुलं आहेत. दोन मुलांच्या जन्मानंतर २००५ मध्ये वनिता आणि आकाश यांनी घटस्फोटाची घोषणा केली. पहिल्या घटस्फोटानंतर अभिनेत्रीने दुसरं लग्न २००७ मध्ये केलं. वनिता हिने दुसरं लग्न उद्योजक आनंद जय राजन याच्यासोबत केलं. दोघांना एक मुलगी देखील आहे. पण अभिनेत्रीचं दुसरं लग्न देखील टिकलं नाही. २०१२ मध्ये वनिता आणि आनंद जय राजन यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या घटस्फोटानंतर वनिता हिने २०२० मध्ये तिसरं लग्न केलं. वनिता हिने दोन मुलांचा बाप असलेल्या पीटर पॉल याच्यासोबत लग्न केलं. पण अभिनेत्रीचं तिसरं लग्न देखील फार काळ टिकलं नाही. लग्नाच्या ४ महिन्यांनंतर वनिता आणि पीटर यांचे मार्ग वेगळे झाले. आता अभिनेत्री वनिता चौथ्या लग्नाच्या तयारीत आहे. ■ ■ ■

## मलायका आरोराचं मराठीत पदार्पण
# येक नंबरमध्ये थिरकणार....

नुकताच येक नंबर या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. या चित्रपटाच्या ट्रेलरचा गाजावाजा सर्वत्र होत आहे. ट्रेलर प्रेक्षकांच्या प्रचंड पसंतीस उतरत असून त्यावर कौतुकाचा वर्षावही होत आहे. सोशल मीडियावर व्ह्यूजचा आकडाही दिवसेंदिवस वाढतच आहे. प्रेक्षकांकडून असा भरभरून प्रतिसाद मिळत असतानाच आता या चित्रपटातील शीर्षकगीत प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या गाण्याला अजय-अतुल यांचं संगीत आणि शब्द लाभले असून या जबरदस्त गाण्याला जोनिता गांधीने आवाज दिला आहे. तर रॅप सौरभ अभ्यंकरचं आहे. गणेश आचार्य यांनी या गाण्याचं नृत्यदिग्दर्शन केलंय.

या गाण्याची खासियत म्हणजे अवघ्या बॉलिवूडला भुरळ घालणारी अभिनेत्री मलायका अरोरा या गाण्याच्या माध्यमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे.

या रॅपसाँगमधून मलायका तिच्या अदाकारीने रसिकांना घायाळ करणार आहे आणि यात तिला साथ लाभणार आहे महाराष्ट्राचा लाडका अभिनेता सिद्धार्थ जाधवची. हे आयटम साँग ऐकायला जितकं एनर्जेटिक आहे तितकंच ते पाहायलाही कमाल आहे. प्रत्येकाला ठेका धरायला लावणाऱ्या या गाण्यात सिद्धार्थ एका अनोख्या अंदाजात दिसत आहे. या गाण्याबद्दल अजय गोगावले म्हणाला, पूर्वी चित्रपटात हमखास आयटम साँग असायचे. हा प्रकार हल्ली जरा कमी झाला होता. मात्र पुन्हा एकदा आम्हाला येक नंबरच्या निमित्ताने आयटम साँग करण्याची संधी मिळाली. या चित्रपटात आयटम साँग असलं तरी ते विनाकारण नाही. कारण मुळात कथेची गरज होती. परंतु आपल्याकडे नृत्य म्हटलं की मराठी ठेका, आपली एक मराठी शैली येते. परंतु आम्हाला यात काहीतरी वेगळं करायचं होतं. त्यामुळे याचाच आधार घेत आम्ही रॅप, हिपहॉप पद्धतीने हे गाणं करण्याचा एक नवीन प्रयत्न केला आहे. ■ ■



## १२ व्या अल्बमनंतर निवृत्त होईल कोल्डप्ले बँड



ब्रिटीश बँड कोल्डप्लेचा गायक ख्रिस मार्टिन याने सांगितले की त्यांचा 12 वा स्टुडिओ अल्बम रिलीज केल्यानंतर त्यांचा बँड निवृत्त होईल. ख्रिसने झेन लोवला दिलेल्या मुलाखतीत याचे कारणही स्पष्ट केले आहे.

तो म्हणाला, आम्ही बँड म्हणून फक्त 12 अल्बम रिलीज करणार आहोत. हे करण्यामागचा आमचा उद्देश चाहत्यांना सर्वोत्तम दर्जा देणे हा आहे. आमची गाणी सुधारण्यासाठी आम्ही सतत प्रयत्न करत असतो. हॅरी पॉटरचे फक्त सात सीझन असल्याने इतर कलाकारांकडून प्रेरणा घेऊन आम्ही हा निर्णय घेतला आहे.

ख्रिस म्हणाला की अल्बममध्ये बँड म्हणून काम करणे चांगले आहे पण खूप कठीण आहे. बँडशी संबंधित लोकांनी स्वतःसाठीही वेळ काढावा अशी त्यांची इच्छा आहे. ख्रिसच्या मते, कोल्डप्ले बँड म्हणून 12 वा अल्बम हा त्याचा शेवटचा असेल, परंतु तो त्याच्या बँडमेट जॉनी बकलँड, गाय बेरीमन आणि विल चॅम्पियनसह इतर प्रकल्पांवर काम करत राहील.

कोल्डप्लेचा 10 वा अल्बम मून म्युझिक 4 ऑक्टोबर रोजी रिलीज होणार आहे. आजकाल कोल्डप्ले बँड जानेवारी 2025 मध्ये भारतात होणाऱ्या त्यांच्या कॉन्सर्टबद्दल चर्चेत आहे.

2016 मध्ये मुंबईत कोल्डप्ले सादर करण्यात आला. 80 हजार लोक या शोचा भाग बनले, ज्यामध्ये अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींचा समावेश होता.

कोल्डप्ले बँडची सुरुवात 1997 मध्ये लंडनमध्ये झाली. कोल्डप्लेला 39 नामांकनांमध्ये 7 वेळा ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे. ख्रिस मार्टिन, जॉनी बकलँड, गाय बॅरीमन, विल चॅम्पियन आणि फिल हार्वे हे या बँडचे सदस्य आहेत. ■ ■ ■